# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

सभा क्र. २१/२०१२ | दिनांक ०८.१२.२०१२
स्थळ - शिर्डी कार्यालय | वेळ- सकाळी ११.०० वाजता

श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सभा शनिवार दि.०८.१२.२०१२ रोजी सकाळी ११.०० वाजता शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहात आयोजित करण्यात आली असलेबाबत, इकडील जा.नं. एसएसएस-वशी-०४-४०६४-२०१२, दिनांक ०६ डिसेंबर, २०१२ रोजीचे पत्राने सर्व सदस्यांना कळविण्यात आले होते. त्यानुसार सदरहू सभा शनिवार दि.०८.१२.२०१२ रोजी सकाळी ११.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहात मा.अध्यक्ष, श्री.जयंत दत्तात्रय कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

०१. मा.श्री.जयंत दत्तात्रय कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर, अध्यक्ष
०२. मा.डॉ.संजीवकुमार, जिल्हाधिकारी, सदस्य

डॉ.यशवंतराव वसंतराव माने,
उपकार्यकारी अधिकारी

सभेच्या सुरुवातीस श्रीसाईबाबांची प्रार्थना करणेत येऊन शासन अधिनियमातील कलम ११ (२) नुसार आवश्यक गणपूर्ती असल्याने सभेचे कामकाज मा.अध्यक्ष श्री.जयंत दत्तात्रय कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आले.

सदरहू सभेस मा.अध्यक्ष महोदय यांच्या पुर्व परवानगीने मा.श्री.किशोर मोरे, सदस्य तथा कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी हे अनुपस्थित होते, त्याची नोंद घेण्यात येऊन, समितीने त्यांना अनुपस्थित राहणेची अनुमती दिली.

सभा सुरु झाल्यानंतर प्रथमतः टेक्नीकल बीड व फायनान्शीयल बीड उघडणेसाठी दोन गट तयार करणेत येऊन त्यांचेकडून विविध खरेदीसाठी विहीत मुदतीत आलेल्या निविदा/कोटेशन्स/ दरपत्रके सभेसमोर समक्ष उघडण्यात आले.

यानंतर विषय पत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरू करणेत आली.

विषय नं.०१ **दिनांक ०३.११.२०१२ रोजी शिर्डी येथे किराणा माल खरेदीकामी नमुने निवडीबाबत निवड समितीचा अहवाल.**

निर्णय क्र.९५३ प्रसादालय, मंदिर व कॅन्टीन विभागासाठी ०५ महिन्यांकरिता किराणा मालाचे प्राप्त झालेले नमुने निवडणेकामी श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सभा शनिवार दि.०३.११.२०१२ रोजी सकाळी ११.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील कार्यालयात (साईनिवास अतिथीगृहात) आयोजित करण्यात आली असलेबाबत इकडील जा.नं. एसएसएस-वशी-०४-३४२७-२०१२, दिनांक ०१ नोव्हेंबर, २०१२ रोजीचे पत्राने सर्व सदस्यांना कळविण्यात आले होते.

तसेच, किराणा मालाचे प्राप्त झालेले नमुने निवडणेकामी तज्ञ म्हणून दोन प्रतिनिधी पाठवणेबाबत, मा.डॉ.आर.एस. पाटील, डायरेक्टर ऑफ रिसर्च, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहूरी यांना जा.नं. एसएसएस- वशी-०४-३३८२-२०१२, दि.२७ ऑक्टोबर २०१२ चे पत्राने कळविण्यात आले होते.

मा.व्यवस्थापन (त्रिसस्यीय) समितीने दि.०२.११.२०१२ रोजी निविदाधारकांचा लिफाफा नं.२ (टेक्नीकल बीड) उघडून कागदपत्रांची पडताळणी करणे व दि.०३.११.२०१२ किराणा मालाचे नमुने निवडणे यासाठी संबंधीत क्षेत्रातील तज्ञांची खालीलप्रमाणे समिती गठीत करुन सदर समितीला नमुने निवडण्याचे अधिकार देण्यात आले.

**अ) लिफाफा नं.२ (टेक्नीकल बीड) उघडून कागदपत्रांची पडताळणी करणे समिती-**

१. श्री.जे.व्ही.वझे, वरिष्ठ लेखापाल, लेखाशाखा विभाग
२. श्री.योगेश जाधव, अंतर्गत लेखापरिक्षक

**ब) आलेल्या नमुन्यातून योग्य नमुने निवडणेसाठीची समिती.**

१. श्री.पी.बी.बोरावके, विशेष कार्य अधिकारी
२. श्री.विक्रम कड,प्रोफेसर,फुड सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी विभाग,महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी
३. डॉ.पी.एम.कोटेचा, असिस्टंट प्रोफेसर, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी
४. श्री.आर.एम.कोते, वरिष्ठ लिपीक, श्री साई प्रसादालय
५. श्री.डी.बी.सांबारे, आचारी, श्री साई प्रसादालय
६. श्री.पी.जी.कर्डीले, आचारी, श्री साई प्रसादालय

सदरहू किराणा मालाचे नमुने निवडणेसाठी निवड समितीची सभा शनिवार दि.०३.११.२०१२ रोजी सकाळी ११.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहात सुरु करण्यात आली.

०१ **सन २०१२-१३ (माहे नोव्हेंबर- २०१२ ते मार्च- २०१३ अखेर) या कालावधीसाठी प्रसादालय, कॅन्टीन व मंदिर या विभागांसाठी धान्य, किराणा माल खरेदीकामी प्राप्त झालेले मालाचे नमुने निवडणे.**

**प्रस्ताव-** सन २०१२-१३ चे माहे नोव्हेंबर-१२ ते मार्च-२०१३ अखेर पाच महिन्यांसाठी प्रसादालय व कॅन्टीन विभागाचे दैनंदिन वापरासाठी आवश्यक किराणा माल खरेदीसाठी वर्तमानपत्रात जाहिरात देवून निविदा मागविणेस मा.त्रीसदस्य समितीचे दि.२५.०८.२०१२ चे सभेतील निर्णय क्र.७१९ अन्वये तत्वत: मान्यता मिळालेली आहे. तसेच मा.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांनी दि.१६.१०.२०१२ रोजी उपरोक्त कार्यवाहीस मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार दि.२२-२३.१०.२०१२ रोजीचे वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिर निविदा प्रसिद्ध करुन दि.२२.१०.२०१२ ते दि.३१.१०.२०१२ अखेर शिर्डी कार्यालय व मुंबई कार्यालय येथून निविदा विक्री करण्यात आली आहे. मुदतीअंती शिर्डी कार्यालयातून ५३ व मुंबई कार्यालयातून ०८ अशा एकुण ६१ निविदांची विक्री झालेली होती. निविदा व नमुने स्विकारण्याची अंतिम दि.०१.११.२०१२ अशी होती. त्यानुसार मुदतीअंती ५० निविदा व त्यांचे मालाचे नमुने प्राप्त झालेले आहेत.

निविदाधारकांनी दिलेले लिफाफा नं.०२ मध्ये दिलेल्या कागदपत्राची पडताळणी संस्थानचे लेखाशाखा व संस्थानने नियुक्त केलेल्या प्रि ऑडीटर यांचे मार्फत करण्यात आली. निविदेत नमुद केलेल्या कागदपत्रांची पुर्तता न करणाऱ्या (राष्ट्रीयकृत बँकेचे डी.डी.नसणे, डी.डी.ऐवजी चेक जोडणे, कागदपत्रांची पुर्तता नसणे इ.) निविदाधारकांची माहिती स्वतंत्र टिपणीद्वारे सादर केलेली आहे.

आलेल्या नमुन्यातून योग्य नमुने निवडणेकामी गठीत केलेल्या समितीच्या सदस्यांनी दि.०३.११.२०१२ रोजी मालाची निवड केली त्या नमुना निवडीकामी खालीलप्रमाणे निवड तज्ञ समिती सदस्य उपस्थित होते.

१. श्री.पी.बी.बोरावके, विशेष कार्य अधिकारी
२. श्री.विक्रम कड,प्रोफेसर,फुड सायन्स अॅण्ड टेक्नोलॉजी विभाग,महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी
३. डॉ.पी.एम.कोटेचा, असिस्टंट प्रोफेसर, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी
४. श्री.आर.एम.कोते, वरिष्ठ लिपीक, श्री साई प्रसादालय
५. श्री.डी.बी.सांबारे, आचारी, श्री साई प्रसादालय
६. श्री.पी.जी.कर्डीले, आचारी, श्री साई प्रसादालय

तज्ञ समितीने निवडलेल्या मालाची यादीनुसार निवडण्यात आलेल्या मालाच्या निविदाधारकांनुसार (Party wise) तसेच मालानुसार (Item wise) दोन स्वतंत्र याद्या तयार करण्यात आलेल्या आहेत.

निवड समितीने खालीलप्रमाणे नमुन्यांची निवड करुन अहवाल दिला आहे.

| अ.क्र. | मालाचा तपशिल | पुरवठा करावयाचे अंदाजे परिमाण क्विंटलमध्ये/ नगामध्ये | एकुण प्राप्त नमुन्यांची संख्या | कागदपत्रांची पुर्तता - नसल्याने नाकारण्यात आलेले नमुने | निवडलेले नमुने संख्या | नापसंत नमुने संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | गहु आटा (अन्नपुर्णा/ शक्तीभोग/ सम्राट/कॅप्टन कुक) | ९,००० | ६ | १ | ४ | १ |
| २ | हरबरा (गावरान) | ६५० | ५ | १ | ३ | १ |
| ३ | मोहरी | ३० | ५ | १ | ३ | १ |
| ४ | सफेद तिळ | १ | २ | ० | २ | ० |
| ५ | मेथी | १.५० | ४ | ० | ३ | १ |
| ६ | खसखस (लाल बदामी) | १२५ | ३ | ० | २ | १ |
| ७ | साखर,(स्पेशल एम - ३०) | ९,००० | ३ | १ | २ | ० |
| ८ | तांदुळ, (सोना मसुरी नवीन/ जुना) आंध्रा | जुना - २०००<br>नवीन - ३५००<br>**एकुण- ५५००** | ८ | ० | ४ जुना<br>४ नवा | ० |
| ९ | हरबराडाळ (बिगर पॉलीश, कडक वाळलेली) | ४,५०० | ९ | १ | ५ | ३ |
| १० | तुरडाळ (लातुर फटका, वाळलेली) | १,२५० | ११ | १ | ५ | ५ |
| ११ | मुगडाळ - बोल्ड | १७० | १० | २ | ४ | ४ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १२ | उडीददाळ -सफेद | १.०० | २ | १ | ० | १ |
| १३ | वाटाणा, हिरवा इंम्पोर्टेड | ३८५ | ८ | १ | ३ | ४ |
| १४ | मुग, आखखा | ४५० | ९ | २ | ३ | ४ |
| १५ | मठ | ४५५ | १० | २ | ३ | ५ |
| १६ | रवा, मध्यम | ४२० | ६ | १ | ४ | १ |
| १७ | मैदा | ४३५ | ७ | १ | ६ | ० |
| १८ | हिरा बेसन | ४ | १ | १ | ० | ० |
| १९ | गुळ, कोल्हापूरी, तांबडा | १५५ | ४ | १ | २ | १ |
| २० | शेंगदाणा, वाळलेला, बोल्ड | २५० | ५ | ० | ३ | २ |
| २१ | साबुदाणा, डबलहत्ती, मिल्कव्हाईट | १७० | ६ | १ | ५ | ० |
| २२ | भगर | ४ | १ | १ | ० | ० |
| २३ | खोबरेवाटी, राजापुरी, काळी पाठ वाळलेली | ८० | ४ | १ | ३ | ० |
| २४ | काजु पाकळी, २ पाकळी वाळलेली | १३० | ५ | ० | ३ | २ |
| २५ | मगज बी | ४ | २ | ० | २ | ० |
| २६ | बदाम बी, मोठी साईज | ०.५० | २ | १ | १ | ० |
| २७ | हळद, अखंड वाळलेली | ६५ | ८ | १ | ४ | ३ |
| २८ | मिरची - गुंटूर, अखंड लाल देठासह | ११० | ५ | ० | ३ | २ |
| २९ | धने, गावरान अखंड | १०० | १० | १ | ४ | ५ |
| ३० | हिरवी विलायची, बोल्ड | ३५ | ८ | १ | ३ | ४ |
| ३१ | जीरे, डायमंट कट | ३५ | ७ | १ | ३ | ३ |
| ३२ | सुंठ, वाळलेली | २ | ४ | ० | ३ | १ |
| ३३ | शहाजिरे | १ | ४ | ० | ३ | १ |
| ३४ | मसाला विलायची | १ | ४ | ० | २ | २ |
| ३५ | लवंग | १ | ४ | ० | २ | २ |
| ३६ | दालचिनी | १.१० | ४ | ० | २ | २ |
| ३७ | खसखस | १.३० | ४ | ० | २ | २ |
| ३८ | काळे मिरे | ०.५० | २ | ० | २ | ० |
| ३९ | नाकेश्वर | १ | १ | ० | १ | ० |
| ४० | तेजपान | १ | ३ | ० | २ | १ |
| ४१ | दगडफुल | ०.६० | २ | ० | २ | ० |
| ४२ | चक्रीफुल | १ | ३ | ० | ३ | ० |
| ४३ | जायफळ | ०.२० | ३ | ० | ३ | ० |
| ४४ | जायपत्री | १ | ४ | ० | ३ | १ |
| ४५ | बडीशोप, हिरवी बारीक | ४ | ४ | ० | २ | २ |
| ४६ | पापड, लिज्जत डायमंड कट | ४० | ३ | १ | १ | १ |
| ४७ | हिंग पावडर, नागछाप ॲगमार्क | १० | ४ | ० | ३ | १ |
| ४८ | हिंग खडा, नागछाप ॲगमार्क | १ | २ | ० | १ | १ |
| ४९ | कच्चे पोहे | ५ | २ | १ | १ | ० |
| ५० | भाजके पोहे | १५ | १ | १ | ० | ० |
| ५१ | डाळया | ४ | ३ | १ | २ | ० |
| ५२ | चिंच, फोडलेली | १० | ३ | ० | ३ | ० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ५३ | आमसुल (ओलसर) | १५ | ३ | ० | ३ | ० |
| ५४ | जिलेबी रंग, बुश बोक/मार्सन, लेमन फुड कलर, आयएसआय | २ | १ | ० | १ | ० |
| ५५ | सुतळी, बारीक थ्री प्लाय | ४ | १ | ० | १ | ० |
| ५६ | पत्रावळ प्लेन, कटींग, कच्ची बदाम | ८,००० नग | १ | ० | १ | ० |
| ५७ | पत्रावळ चार कप्प्याची, एल.डी.फोम | ४,००,००० नग | १ | ० | १ | ० |
| ५८ | खडे मिठ | १७ | १ | १ | ० | ० |
| ५९ | मीठ, फ्रि फ्लो, आयोडाईज्ड, अन्नपुर्णा, | ६५० | ४ | १ | ३ | ० |
| ६० | मसुर - आख्खा | १६० | ९ | १ | ३ | ५ |
| ६१ | मठदाळ | ३० | ५ | १ | ३ | १ |
| ६२ | कुंकु | ३ | २ | १ | १ | ० |
| ६३ | **खादयतेल,** सुर्यफुल मका, रिफाईड, ॲगमार्क | २,५०० | ५ | १ | २ | २ |
| ६४ | **वनस्पती** तुप, जेमिनी ब्रॅण्ड, | २८० | ५ | १ | ४ | ० |
| ६५ | **चहा पावडर,** ब्रुक बॉण्ड/ टाटा/सपट | ११५ | ५ | १ | ४ | ० |
| ६६ | **कॉफी फिल्टर,** ब्रुक बॉण्ड, कॅफे, गोल्ड | १५ | १ | ० | १ | ० |
| ६७ | बिस्कीटे - ग्लुकोज<br>लहान पुडा<br>पार्ले ब्रिटानीया सनफिस्ट | ५,३०,००० नग किंवा आवश्यकते-नुसार | ४ | ० | ४ | ० |
| ६८ | बिस्कीटे - ग्लुकोज<br>मोठा पुडा<br>पार्ले ब्रिटानीया सनफिस्ट | ३५,००० नग किंवा आवश्यकतेनुसार | ४ | ० | ४ | ० |
| ६९ | बिस्कीटे - नमकी<br>लहान पुडा<br>(मॉको/टाईमपास/सॅकी)<br>पार्ले ब्रिटानीया सनफिस्ट | ८०,००० नग किंवा आवश्यकतेनुसार | ४ | ० | ४ | ० |
| ७० | बिस्कीटे - सॅक्स<br>(क्रॅकजॅक/५०-५०/<br>स्वीट ॲण्ड सॉल्ट) लहान पुडा<br>पार्ले ब्रिटानीया सनफिस्ट | १,१०,००० नग किंवा आवश्यकते-नुसार | ४ | ० | ४ | ० |
| ७१ | बिस्कीटे मारी (शुगर फ्री)<br>लहान पुडा<br>पार्ले ब्रिटानीया सनफिस्ट | ४०,००० नग किंवा आवश्यकतेनुसार | ४ | ० | ४ | ० |
| **पॅकेज्ड ड्रिंकींग वॉटर** | | | | | | |
| आयएसआय प्रमाणित | | | | | | |
| ७२ | १ लिटर बाटली | १०,००,००० नग किंवा आवश्यकते-नुसार | ७ | ३ | ४ | ० |
| ७३ | ५०० मिली बाटली | १,००,००० नग किंवा आवश्यते-नुसार | ७ | ३ | ४ | ० |
| ७४ | **पेपर कप,** पॉली इथिलीन कोटेड, १०० मिली क्षमता, १८० GSM (+-५) | १,५०,००,००० नग किंवा आवश्यकते-नुसार | २ | १ | १ | ० |

| प्लॅस्टीक पिशवी | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ७५ | साईज ४"x ६", २०० गेज, एल.डी., व्हर्जीन फुड ग्रेड, ५० मायक्रो. | २५ | ४ | २ | २ | ० |
| ७६ | साईज ५"x ६.५", (लाडू पिशवी), छपाईसह ४ रंगात, व्हर्जीन फुड ग्रेड, ५० मायक्रो., २०० गेज, पी.पी. | २५० | ४ | २ | २ | ० |
| ७७ | साईज ८"x १०" छपाईसह १ रंगात व्हर्जीन फुड ग्रेड, ५० मायक्रो. २०० गेज, एल.डी. | ८५ | ४ | २ | २ | ० |
| ७८ | **टोंड गाय दूध** होमोजीनाईज्ड व पाश्चराईज्ड ३.५ फॅट, ८.५ एसएनएफ ५०० मिली पॅकिंग | अंदाजे ८,००,००० लिटर गरजेनुसार | ४ | १ | ३ | ० |
| ७९ | **गावरान तुप (गायीचे)** | ४,५०० | ८ | ३ | ३ | २ |

उपरोक्त निवडीचे वेळी श्री.बी.डी.साबळे, प्रशासकीय अधिकारी, श्री.ई.एन.वाघ, विशेष कार्य अधिकारी, श्री.आर.एस.साबळे, विशेष कार्य अधिकारी, श्री.डी.टी.उगले, अधिक्षक खरेदी, श्री.यु.पी. गोंदकर, अधिक्षक साई प्रसादालय विभाग इ.उपस्थित होते.

निवडलेले नमुने ११ बॉक्समध्ये सिलबंद करण्यात आलेले आहेत. नाकारण्यात आलेले नमुने स्वतंत्र गोण्यांमध्ये ठेवण्यात आलेले आहेत. तसेच खाजगी बँकेचे डी.डी., चेक, कागदपत्रांच्या त्रुटीमुळे ज्यांचे नमुने निवडण्यात आले नाहीत, त्यांचे नमुन्यांचे बॉक्स आहे त्या स्थितीमध्ये स्वतंत्र ठेवण्यात आलेले आहेत.

दि.०८.१०.२०१२ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार मे.राहुल एंटरप्रायझेस, नाशिक यांनी दोन वेळा कार्नेलो खाद्यतेलाचा पुरवठा करण्यास असमर्थता दर्शविलेली असल्याने त्यांना यापुढील ३ वर्षासाठी खाद्यतेल पुरवठा करण्यासबंधी खरेदी प्रक्रियेत सहभाग घेता येणार नाही, तसेच कार्नेलो कंपनीचे खाद्यतेल एक वर्षासाठी कोणत्याही पुरवठाधारकाकडून संस्थानसाठी खरेदी करण्यात येऊ नये असे ठरले. त्यामुळे मे.राहुल एंटरप्रायझेस, नाशिक यांनी कार्नेलो व किर्तीगोल्ड खाद्यतेलाचे नमुने देऊनही त्यांचे नमुन्यांबाबत विचार करण्यात आला नाही.

उपरोक्त संपुर्ण नमुना निवडीच्या प्रक्रियेचे ध्वनीक्षेपण विभागामार्फत चित्रीकरण करण्यात आलेले आहे.

निवडण्यात आलेल्या ३४ निविदाधारकांपैकी गावरान तुपासाठी निवडण्यात आलेल्या नमुन्यांच्या निविदाधारकांना (३) दि.०८.११.२०१२ रोजी सायं.०५.०० वा. मा.जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे त्रीसदस्य समिती समोर चर्चा वाटाघाटीसाठी उपस्थित राहणेबाबत कळविण्यात आलेले आहे. त्यावेळी उपरोक्त निविदाधारकांचे लिफाफा क्र.१ (मुळ निविदा) उघडून त्यांचेशी दरांबाबत चर्चा वाटाघाटी करण्यात येऊन गावरान तुप खरेदीबाबतचा निर्णय घेण्यात येईल.

तसेच गावरान तुपा व्यतिरिक्त इतर निवडण्यात आलेल्या किराणा मालाचे निविदाधारकांना दि.१०.११.२०१२ रोजी सकाळी ११.०० वा. संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथिगृहातील मिटींग कक्षात त्रीसदस्य समितीपुढे चर्चा वाटाघाटीसाठी उपस्थित राहणेबाबत दुरध्वनीद्वारे कळविण्यात आलेले आहे. त्यावेळी उपरोक्त निविदाधारकांचे लिफाफा क्र.१ (मुळ निविदा) उघडून त्यांचेशी दरांबाबत चर्चा वाटाघाटी करण्यात येऊन खरेदी करावयाचे किराणा मालाबाबत निर्णय होणेस विनंती.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त निवडण्यात आलेल्या नमुनेधारकांना व्यवस्थापन समितीचे पूढील सभेपूढे समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात येऊन अंतिम निर्णय घेण्यात यावा.

तसेच, निविदेमध्ये नमुद केलेल्या कागदपत्रांची पुर्तता न करणाऱ्या खालील १३ निविदाधारकांना चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलाविणेत येऊ नये, अशी निवड समितीने शिफारस केलेली आहे.

| अ. नं. | कोटेशनधारकाचे नांव | अ.नं. | कोटेशनधारकाचे नांव |
|---|---|---|---|
| १ | मे.साई बेव्हरेजेस, सुपा | ८ | मे.राजकमल इंडस्ट्रीज, जळगांव |
| २ | मे.स्टार पॅकेजिंग, दमण | ९ | मे.सुमन पेपर प्रॉडक्टस, औरंगाबाद |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | मे.गोदावरी खोरे नामदेवरावजी परजणे पा. ता.सह. दुध उत्पा.संघ लि.कोपरगांव | १० | मे.रामनाथ जगन्नाथ अॅण्ड कंपनी, नाशिक |
| ४ | मे.दिलीप चिमाजी कालेकर, शिर्डी | ११ | मे.रश्मी बेव्हरेजस, नाशिक |
| ५ | मे.श्री वारणा सहकारी दुध उत्पादक प्रक्रिया संघ लि, वारणानगर | १२ | मे.एस.व्ही.एंटरप्रायझेस, पुणे |
| ६ | मे.श्री शिवसाई केटर्स अॅण्ड लेबर कॉन्ट्रॅक्टर, शिर्डी | १३ | मे.ओम गुरुदेव एजन्सीज, शिर्डी |
| ७ | मे.राज प्लॅस्टिक, अहमदनगर | | |

उपरोक्तप्रमाणे दिनांक०३.११.२०१२ रोजी शिर्डी येथे किराणा माल खरेदीकामी नमुने निवडीबाबत निवड समितीचे अहवालाच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन निवड समितीच्या शिफारसीस मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

---

**विषय नं.०२** दिनांक १२.११.२०१२ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त.

**निर्णय क्र. ९५४** दिनांक १२.११.२०१२ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन सदरहू इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.

---

**विषय नं.०३** दिनांक ३०.११.२०१२ रोजी अहमदनगर येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त.

**निर्णय क्र. ९५५** दिनांक ३०.११.२०१२ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन सदरहू इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.

---

**विषय नं.०४** **श्री साईनाथ रुग्णालयामध्ये ओ.पी.डी.केबीनचे सध्याचे एम.एस.खिडक्यांचे जागी अॅल्युमिनियम स्लायडिंग खिडक्या बसविणेकामी प्राप्त कोटेशन उघडून त्यावर निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालय इमारत क्र. ०२ इमारतीचे तळमजल्यावर व पहिल्या मजल्यावर असलेल्या वैद्यकिय अधिकाऱ्यांच्या केबिन्समधील एम.एस.खिडक्यांचे शटर्स काढुन त्या जागी अॅल्युमिनियम स्लायडींग खिडक्या करुन घेणेकामी येणारे रु. १,१२,५००/- मात्रचे खर्चास व सदरचे काम विहीत पध्दतीने दरपत्रके मागवून करुन घेणेस मा. त्रिसदस्य समितीचे दिनांक १४ जुलै, २०१२ रोजीचे सभेत मान्यता देणेत आली आहे.

उपरोक्त मान्यतेनुसार अशा प्रकारचे काम करणारे खालील आठ ठेकेदाराकडून इकडील जा. नं. २३३१/२०१२ दि. २४.०८. २०१२ रोजीचे कोटेशन मागणी पत्राने कोटेशन मागविणेत आले होते.

| अ. नं. | कोटेशन सादरकर्त्याचे नांव / पत्ता | अ. नं. | कोटेशन सादरकर्त्यांचे नांव / पत्ता |
|---|---|---|---|
| ०१ | यशश्री अॅल्युमिनिअम अॅण्ड ग्लास सेंटर, कोपरगांव | ०५ | मॉडर्न फॅब्रिकेशन वर्क्स, श्रीरामपूर |
| ०२ | रविंद्र रबर प्रोडक्ट अॅण्ड फॅब्रिकेशन, श्रीरामपूर | ०६ | त्रिमीती इंटेरियर्स, नाशिक |
| ०३ | मगर जायभावे असोशिएटस, नाशिक | ०७ | राजहंस ग्लास हाउस, राहाता |
| ०४ | विमल ग्लास अॅड अॅल्युमिनिअम, कोपरगांव | ०८ | कांचन ग्लास हाउस, कोपरगांव |

उपरोक्त ठेकेदारांपैकी खालील ठेकेदारांनी सिलबंद कोटेशन सादर केले आहेत.

| अ. नं. | कोटेशन सादरकर्त्यांचे नांव / पत्ता | आवक नंबर / दिनांक |
|---|---|---|
| ०१ | यशश्री अॅल्युमिनिअम अॅण्ड ग्लास सेंटर, कोपरगांव | ८१२२ / २८.०८.२०१२ |
| ०२ | रविंद्र रबर प्रोडक्ट अॅण्ड फॅब्रिकेशन, श्रीरामपूर | ८२९५ / ३१.०८.२०१२ |
| ०३ | मॉडर्न फॅब्रिकेशन वर्क्स, श्रीरामपूर | ८२९७ / ३१.०८.२०१२ |

उपरोक्त प्रमाणे विहीत मुदतीत प्राप्त झालेले ०३ सिलबंद कोटेशन आजचे सभेत उघडण्यात येऊन कोटेशन सादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ. नं. | कोटेशन सादरकर्त्याचे नांव / पत्ता | कोटेशनमधील दर रु. | चर्चा/वाटाघाटी नंतर देऊ केलेले दर रु. |
|---|---|---|---|
| ०१ | यशश्री अॅल्युमिनिअम अॅण्ड ग्लास सेंटर, कोपरगांव | १,४८,५००/- (३०६.६९ प्र.स्के. फुट) | अनुपस्थित |
| ०२ | रविंद्र रबर प्रोडक्ट अॅण्ड फॅब्रीकेशन, श्रीरामपूर | १,२१,०५० (२५०.०० प्र.स्के. फुट) | १,१४,९९८/- (२३७.५० प्र.स्के. फुट) |
| ०३ | मॉडर्न फॅब्रिकेशन वर्क्स, श्रीरामपूर | १,२५,८९२/- (२६०.०० प्र.स्के. फुट) | अनुपस्थित |

**निर्णय क्र.९५६ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयामध्ये ओ.पी.डी.केबीनचे सध्याचे एम.एस. खिडक्यांचे जागी ॲल्युमिनियम स्लायडिंग खिडक्या बसविणेकामी मे. रविंद्र रबर प्रोडक्ट ॲण्ड फॅब्रीकेशन, श्रीरामपूर यांचे रु.१,१४,९९८/- मात्र निम्नतम दर स्विकारण्यात येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.०५** **श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल येथील तळमजल्याच्या वर्ग खोल्यांचे खिडक्यांना अॅल्युमिनियम स्लायडिंग खिडक्या बसविणेकामी प्राप्त कोटेशन उघडून त्यावर निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा इंग्लिश मिडीअम स्कुल इमारतीचे तळमजल्यावरील एकुण ०८ वर्ग खोल्यांच्या ३२ खिडक्यांना ॲल्युमिनीअम स्लायडींग खिडक्या करणेकामी रु. १,३६,०८०/- मात्रचे खर्चास व सदरचे काम विहीत पध्दतीने दरपत्रके मागवून करुन घेणेस मा. त्रिसदस्य समितीचे दिनांक १४ जुलै, २०१२ रोजीचे सभेत मान्यता देण्यात आली आहे.

उपरोक्त मान्यतेनुसार इकडील दिनांक १४ ऑगस्ट, २०१२ रोजीचे टिपणी अन्वये, अशा प्रकारचे काम करणारे खालील आठ ठेकेदारांकडून इकडील जा. नं. २३१०/२०१२ दि. २२ ऑगस्ट, २०१२ रोजीचे कोटेशन मागणी पत्राने कोटेशन मागविणेत आले होते.

| अ. नं. | कोटेशन सादरकर्त्याचे नांव / पत्ता | अ. नं. | कोटेशन सादरकर्त्याचे नांव / पत्ता |
|---|---|---|---|
| ०१ | यशश्री ॲल्युमिनिअम ॲण्ड ग्लास सेंटर, कोपरगांव | ०५ | मॉडर्न फॅब्रिकेशन वर्क्स, श्रीरामपूर |
| ०२ | रविंद्र रबर प्रोडक्ट ॲण्ड फॅब्रीकेशन, श्रीरामपूर | ०६ | त्रिमीती इंटेरियर्स, नाशिक |
| ०३ | मगर जायभावे असोशिएटस, नाशिक | ०७ | राजहंस ग्लास हाउस, राहाता |
| ०४ | विमल ग्लास ॲड ॲल्युमिनिअम, कोपरगांव | ०८ | कांचन ग्लास हाउस, कोपरगांव |

उपरोक्त ठेकेदारांपैकी खालील ठेकेदारांनी सिलबंद कोटेशन सादर केले आहेत.

| अ. नं. | कोटेशन सादरकर्त्याचे नांव / पत्ता | आवक नंबर / दिनांक |
|---|---|---|
| ०१ | यशश्री ॲल्युमिनिअम ॲण्ड ग्लास सेंटर, कोपरगांव | ७८९९ / २३.०८.२०१२ |
| ०२ | रविंद्र रबर प्रोडक्ट ॲण्ड फॅब्रीकेशन, श्रीरामपूर | ८२९६ / ३१.०८.२०१२ |
| ०३ | मॉडर्न फॅब्रिकेशन वर्क्स, श्रीरामपूर | ८२९४ / ३१.०८.२०१२ |

उपरोक्त प्रमाणे विहीत मुदतीत प्राप्त झालेले ०३ सिलबंद कोटेशन आजचे सभेत उघडण्यात येऊन कोटेशन सादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ. नं. | कोटेशन सादरकर्त्याचे नांव / पत्ता | कोटेशनमधील दर | चर्चा/ वाटाघाटीनंतर देऊ केलेले दर |
|---|---|---|---|
| ०१ | यशश्री ॲल्युमिनिअम ॲण्ड ग्लास सेंटर, कोपरगांव | १,८४,००८/- (३३००/- चौ.मी.) | अनुपस्थित (३०६.६९ चौ.फुट) |
| ०२ | रविंद्र रबर प्रोडक्ट ॲण्ड फॅब्रीकेशन, श्रीरामपूर | १,४६,९९५/- (२४५/- चौ.फुट) | मुळ दरावर ५% कमी (१,३९,६५०/-) |
| ०३ | मॉडर्न फॅब्रिकेशन वर्क्स, श्रीरामपूर | १,५८,९९५/- (२६५/- चौ.फुट) | अनुपस्थित |

**निर्णय क्र.९५७ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल येथील तळमजल्याच्या वर्ग खोल्यांचे खिडक्यांना अॅल्युमिनियम स्लायडिंग खिडक्या बसविणेकामी मे. रविंद्र रबर प्रोडक्ट ॲण्ड फॅब्रीकेशन, श्रीरामपूर यांचे रु.१,३९,६५०/- मात्र (मुळ दरावर ५% कमी) हे निम्नतम दर स्विकारण्यात येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

---

विषय नं.०६ श्री साईबाबा हॉस्पिटल मुख्य प्रवेशव्दाराच्या उजव्या बाजूकडील **भागात शेड उभारणी करणेकामी प्राप्त झालेले कोटेशन उघडून त्यावर निर्णय होणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा हॉस्पीटल इमारतीच्या मुख्य प्रवेशव्दाराच्या उजव्या बाजूकडील भागातील खिडकीतुन बाहेरील बाजूने केसपेपर देणेत येणार आहे. त्यासाठी सदर बाजूस असलेल्या मोकळया जागेत इमारती जवळ रुग्णांना उन, वारा व पाऊसापासून संरक्षण होणेसाठी श्री साईबाबा हॉस्पीटलचे मुख्य प्रवेशव्दारचे उजव्या (दक्षिण) बाजुस मोकळया जागेत ४७'-६"x२०' आकाराचे स्ट्रक्चर तयार करुन त्यावर ॲवेनिंग शेडची उभारणी करणेकामी येणारे रु. १,५२,०००/- खर्चास व सदरहू कामी विहित पध्दतीने दरपत्रके मागवून सदरचे काम करुन घेणेस दिनांक १८ जुलै, २०१२ रोजीचे मा. त्रिसदस्य समितीचे सभेत निर्णय क्रमांक ५७६ अन्वये, प्रशासकिय मान्यता मिळालेली आहे.

उपरोक्त प्रमाणे झालेले निर्णयानुसार, सदरहू कामी इकडील विभागाचे दिनांक २५ जुलै, २०१२ रोजीचे प्रशासकिय मान्यतेनुसार अशा प्रकारचे शेडचे काम करणारे खालील आकरा ठेकेदारांकडून इकडील जा. नं. २३३०/२०१२ दिनांक २४ ऑगस्ट, २०१२ रोजीचे कोटेशन मागणी पत्राने कोटेशन मागविणेत आले होते.

| Sr. no. | Name of Contractors | Sr. no. | Name of Contractors |
|---|---|---|---|
| 01. | Mecanco Enterprises, Pune | 07. | Trimiti Intreiors, Nashik |
| 02. | Citadel architectural solutions Pvt. Ltd. Mumbai | 08. | Puja steel corporation Mumbai |
| 03. | Pallavi Agencies. Nashik | 09. | Ravindra rubber product and fabricators Shrirampur |
| 04. | Super fabrication, Rahata | 10. | Durga Trading Corporation, Aurangabad. |
| 05. | Shri. Anand & Sheikoar, Nashik | 11. | Milind S pachorekar, Niphad |
| 06. | Chaudhari Venetion Blinds, Chembur, Mumbai | | |

वरिल ठेकेदारांपैकी खालील ०३ ठेकेदारांनी सिलबंद कोटेशन सादर केले आहेत.

| Sr. No. | Name of Contractors | Inward No & Date |
|---|---|---|
| 01. | Durga Trading Corporation, Aurangabad. | 8293 / 31.08.2012 |
| 02. | Ravindra rubber product and fabricators Shrirampur | 8509 / 04.09.2012 |
| 03. | Milind S pachorekar, Niphad | 8898 / 12.09.2012 |

उपरोक्त प्रमाणे विहीत मुदतीत प्राप्त झालेले ०३ सिलबंद कोटेशन आजचे सभेत उघडण्यात येऊन कोटेशन सादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ. नं. | कोटेशन सादरकर्त्यांचे नांव / पत्ता | कोटेशनमधील दर | चर्चा/ वाटाघाटीनंतर देऊ केलेले दर |
|---|---|---|---|
| ०१ | दुर्गा ट्रेडींग कार्पोरेशन, औरंगाबाद | २,१८,५००/- (२३०.०० प्र.स्के.फुट) | १,९०,०००/- (२००.०० प्र. स्के.फुट) |
| ०२ | रविंद्र रबर प्रोडक्ट अॅन्ड फॅब्रीकेशन, श्रीरामपूर | २,३७,५००/- (२५०.०० प्र.स्के.फुट) | २,२३,२५०/- (२३५.०० प्र.स्के.फुट) |
| ०३ | मिलींद एस.पाचोरकर, निफाड | ५,७७,१२५/- (६०७.५० प्र.स्के.फुट) | अनुपस्थित |

निर्णय क्र. ९५८ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल मुख्य प्रवेशव्दाराच्या उजव्या बाजूकडील भागात शेड उभारणीकामी मे.दुर्गा ट्रेडींग कार्पोरेशन, औरंगाबाद यांचे रु.२००/- मात्र प्र. स्के.फुट हे निम्नतम दर स्विकारण्यात येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा असे ठरले.**

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.०७** **श्री साईनाथ रुग्णालयासाठी मॉरच्युरी रुमचे बांधकाम करणेकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडून त्यावर निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** साईनाथ रुग्णालयात सध्या मॉर्च्युरी बॉक्स गायनिक वॉर्डचे समोरील मोकळ्या जागेत रुग्णालय इमारतीत ठेवण्यात येतात. करिता मृतदेह ठेवणेसाठी स्वतंत्र मॉच्युरी बांधकाम करणेसाठी येणारे अंदाजे रु.२,९४,९९०/- खर्चास व सदरचे काम विहीत पद्धतीने दरपत्रके / निविदा मागवुन करून घेणेस मा. त्रिसदस्य समितीचे दि.१४ जुलै, २०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४९४ अन्वये मान्यता देणेत आली आहे.

सदरहू कामी इकडील विभागामार्फत निविदा फॉर्म तयार करणेत येऊन, याकामी सकाळ, अहमदनगर या वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करण्यात येवून दि.१० सप्टेंबर, २०१२ ते दिनांक १५ सप्टेंबर, २०१२ अखेर कोरे निविदा विक्रीची मुदत देऊन निविदा मागविण्यात आल्या असून, सदरचे विहित मुदतीत खालील ठेकेदारांनी कोरे निविदा फॉर्म विकत घेतले आहेत.

१. श्री. बी. पी. शिंदे, पढेगांव ता. कोपरगाव
२. श्री. एस. जी. गायकवाड, राहाता
३. श्री. राहूल प्रकाश जोशी, नाशिक
४. पी. बी. जाधव, संगमनेर
५. श्री. आनंदराम मोतीलाल परदेशी, जळके खुर्द ता. नेवासा

वरिल पाच ठेकेदारानी कोरे निविदा फॉर्म घेऊन, विहीत मुदतीत (दिनांक १८ सप्टेंबर, २०१२) अ. नं. ५ व्यतिरीक्त चार ठेकेदारांनी सिलबंद निविदा सादर केल्या आहेत.

उपरोक्त प्रमाणे विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या ०४ सिलबंद निविदा आजचे सभेत उघडण्यात येऊन निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ. नं. | निविदासादरकर्त्यांचे नांव / पत्ता | निविदेतील दर | चर्चा/ वाटाघाटीनंतर देऊ केलेले दर |
|---|---|---|---|
| ०१ | श्री. बी. पी. शिंदे, पढेगांव ता. कोपरगांव | ४ % अधिक | निविदा दरावर १ % अधिक |
| ०२ | श्री. एस. जी. गायकवाड, राहाता | ८% अधिक | अनुपस्थित |
| ०३ | श्री. राहूल प्रकाश जोशी, नाशिक | २०% अधिक | अनुपस्थित |
| ०४ | पी. बी. जाधव, संगमनेर | २५% अधिक | अनुपस्थित |

**निर्णय क्र. ९५९ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयासाठी मॉच्युरी रुमचे बांधकाम करणेकामी श्री. बी. पी. शिंदे, पढेगांव ता. कोपरगांव यांचे निविदा दरावर १ % अधिक हे निम्नतम दर स्विकारण्यात येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.०८ साईनगर जनरेटर कक्ष व धर्मशाळा जनरेटर कक्षालगत संडास बाथरुम बांधणे व पेव्हिंग ब्लॉक्स बसविणेकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडून त्यावर निर्णय होणेबाबत.**

प्रस्ताव- संस्थानचे साईनगर/ धर्मशाळा जनरेटर कक्षालगत टॉयलेट बांधणे व पेव्हिंग ब्लॉक्स बसविणे कामासाठी मा. त्रिसदस्य समितीचे दिनांक १८ जुलै, २०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ५७९ अन्वये खालील प्रमाणे निर्णय झालेला आहे.

"प्रस्तावात नमूद केल्यानुसार साईनगर जनरेटर कक्ष व धर्मशाळा जनरेटर कक्षालगत संडास बाथरुम बांधणे व पेव्हिंग ब्लॉक्स बसविणे इत्यादी कामे विहित पद्धतीने दरपत्रके / निविदा मागवून करून घेण्यास व याकामी येणारे अदाजे रक्कम रु.३,८७,३८२/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली."

उपरोक्त निर्णयानुसार सदरहू कामी इकडील विभागामार्फत निविदा फॉर्म तयार करणेत येऊन, याकामी सकाळ, अहमदनगर या वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करण्यात येवून दि.१० सप्टेंबर, २०१२ ते दि. १५ सप्टेंबर, २०१२ अखेर कोरे निविदा विक्रीची मुदत देऊन निविदा मागविण्यात आल्या असून, सदरचे विहित मुदतीत खालील ठेकेदारांनी कोरे निविदा फॉर्म विकत घेतले आहेत:

१. श्री. बी. पी. शिंदे, पढेगांव ता. कोपरगांव
२. श्री. एस. जी. गायकवाड, राहाता
३. श्री. राहूल प्रकाश जोशी, नाशिक
४. श्री. आनंदराम मोतीलाल परदेशी, जळके खुर्द ता. नेवासा
५. पी. बी. जाधव, संगमनेर

वरिल पाच ठेकेदारानी कोरे निविदा फॉर्म घेऊन, विहीत मुदतीत (दिनांक १८ सप्टेंबर, २०१२) सिलबंद निविदा सादर केल्या आहेत.

उपरोक्त प्रमाणे विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या ०४ सिलबंद निविदा आजचे सभेत उघडण्यात येऊन निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| **अ. नं.** | **निविदासादरकर्त्यांचे नांव / पत्ता** | **निविदेतील दर** | **चर्चा/ वाटाघाटीनंतर देऊ केलेले दर** |
|---|---|---|---|
| ०१ | श्री. बी.पी. शिंदे, पढेगांव ता. कोपरगांव | ३ % अधिक (३,९९,००३/-) | निविदा दरावर १ % कमी (३,८३,५०८/-) |
| ०२ | श्री. एस. जी. गायकवाड, राहाता | ९ % अधिक (४,२२,२४६/-) | अनुपस्थित |
| ०३ | श्री. राहूल प्रकाश जोशी, नाशिक | ६० % अधिक (६,१९,८११/-) | अनुपस्थित |
| ०४ | पी. बी. जाधव, संगमनेर | २५ % अधिक (४,८४,२२७/-) | अनुपस्थित |
| ०५ | श्री. आनंदराम मोतीलाल परदेशी, जळके खुर्द ता. नेवासा | १० % कमी (३,४८,६४४/-) | निविदा दरावर १० % कमी (३,४८,६४४/-) |

**निर्णय क्र.९६० यावर सविस्तर चर्चा होऊन, साईनगर जनरेटर कक्ष व धर्मशाळा जनरेटर कक्षालगत संडास बाथरुम बांधणे व पेव्हिंग ब्लॉक्स बसविणेकामी श्री. आनंदराम मोतीलाल परदेशी, जळके खुर्द ता. नेवासा यांचे निविदा दरावर १० % कमी निम्नतम दर स्विकारण्यात येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.०९** **श्री साईनाथ रुग्णालयातील प्रसाधनगृहात कमोड टाईपचे संडास भांडे** बसविणेकामी प्राप्त **झालेल्या निविदा उघडून त्यावर निर्णय होणेबाबत. (रु.५,००,०००/-)**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालयातील प्रसाधनगृहात इंडियन टाईप ऐवजी कमोड टाईपचे संडास भांडे बसविणे व इतर अनुषंगीक कामे विहित पध्दतीने करणेस व त्यासाठी येणारे अंदाजे रु. २,३९,८९५/- खर्चास मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव मा. त्रिसदस्य समितीचे दिनांक ०६ एप्रिल, २०१२ रोजीचे सभेत सादर करणेत आला होता. त्यावर निर्णय क्र.३०३ अन्वये खालील प्रमाणे निर्णय झालेला आहे.

"... प्रस्तावीत केल्याप्रमाणे प्रत्येक मजल्यावर ४ कमोड संडासची व्यवस्था करणेऐवजी त्यामध्ये दुपटीने वाढ करून प्रत्येक मजल्यावर ८ कमोड संडासची व्यवस्था करण्यात यावी. याकामी विहीत पद्धतीने वृत्तपत्रात जाहिरात प्रसिद्ध करून सिलबंद निविदा मागविण्यात याव्यात. याकामी येणारे अंदाजे खर्च रूपये ५ लाख मात्र पर्यंतचे सर्वसमावेशक खर्चास मान्यता देणेत आली. "

उपरोक्त निर्णयानुसार श्री साईनाथ रुग्णालय इमारतीमध्ये असलेले इंडीयन भांड्याऐवजी प्रत्येक मजल्यावर आठ (०८ नग) याप्रमाणे दोन्हीही इमारतीत एकुण ४८ नग कमोड टाईपचे संडास भांडे बसविणे कामासाठी सन २०११-१२ चे दरसुचीनुसार (DSR) रु.४,९९,८००/- मात्र खर्चाचे निविदा फॉर्म करुन याकामी सार्वमत, अहमदनगर या वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करण्यात येवून दि.०७.०८.२०१२ ते १३.०८.२०१२ अखेर कोरे निविदा विक्रीची मुदत देऊन निविदा मागविण्यात आल्या होत्या. परंतू सदरचे मुदतीमध्ये कुणीही कोऱ्या निविदा नेलेल्या नसल्याने, याकामी पुन्हा आठ दिवसाच्या मुदतीची संक्षिप्त फेर जाहिरात प्रसिध्द करुन दिनांक १० सप्टेंबर, २०१२ ते दिनांक १५ सप्टेंबर, २०१२ अखेर कोरे निविदा विक्रीची मुदत देऊन निविदा मागविण्यात आल्या असून, सदरचे विहित मुदतीत खालील ठेकेदारांनी कोरे निविदा फॉर्म विकत घेतले आहेत:

१. श्री. बी. पी. शिंदे, पढेगांव ता. कोपरगांव
२. श्री. एस. जी. गायकवाड, राहाता
३. श्री. राहूल प्रकाश जोशी, नाशिक
४. श्री. आनंदराम मोतीलाल परदेशी, जळके खुर्द ता. नेवासा

वरिल चार ठेकेदारानी कोरे निविदा फॉर्म घेऊन, विहीत मुदतीत दिनांक १८ सप्टेंबर, २०१२ रोजी सिलबंद निविदा सादर केल्या आहेत.

उपरोक्त प्रमाणे विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या ०४ सिलबंद निविदा आजचे सभेत उघडण्यात येऊन निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ. नं. | निविदासादरकर्त्यांचे नांव / पत्ता | निविदेतील दर | चर्चा/ वाटाघाटीनंतर देऊ केलेले दर |
|---|---|---|---|
| ०१ | श्री. बी. पी. शिंदे, पढेगांव ता. कोपरगांव | ३ % अधिक (५,१४,७९४/-) | निविदा दरावर २ % कमी (४,८९,८०४/-) |
| ०२ | श्री. एस. जी. गायकवाड, राहाता | ९ % अधिक (५,४४,७८२/-) | अनुपस्थित |
| ०३ | श्री. आनंदराम मोतीलाल परदेशी, जळके खुर्द ता. नेवासा | ५ % कमी (४,७४,८१०/-) | निविदा दरावर ५% कमी (रु.४,७४,८१०/-) |
| ०४ | श्री. राहूल प्रकाश जोशी, नाशिक | ४० % अधिक (६,९९,७२०/-) | अनुपस्थित |

निर्णय क्र.९६१ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील प्रसाधनगृहात कमोड टाईपचे संडास भांडे बसविणेकामी श्री. आनंदराम मोतीलाल परदेशी, जळके खुर्द ता. नेवासा यांचे रु.४,७४,८१०/- मात्र (निविदा दरावर ५% कमी) हे निम्नतम दर स्विकारण्यात येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.१०** **साईप्रसाद निवासस्थान विभाग कार्यालयासमोर रुम बुकींग काऊंटरकरीता ओनिंग फॅब्रीक वापरुन शेड तयार करण्याचे कोटेशन उघडणेबाबत.**

**प्रस्ताव-** उपरोक्त विषयांकित कामाकरीता येणारे अंदाजे रु.९७,५००/- चे खर्चास व सदरचे काम अशा प्रकारचे काम करणारे ठेकेदार यांचेकडून विहीत पध्दतीने कोटेशन मागावून करुन घेणेस मा. त्रिसदस्यीय समितीचे दि.१८/०७/२०१२ चे सभेत नि.क्र. ५७५ अन्वये मान्यता देणेत आलेली आहे. त्यानुसार इकडील जा.नं. २०५५ दि.०७/०८/२०१२ चे कोटेशन पत्रान्वये खालील ठेकेदार यांना दि.१६/०८/२०१२ पर्यंत सिलबंद कोटेशन सादर करणेबाबत कळविणेत आले होते.

१. त्रिमिती इंटेरीअर, नाशिक
२. मे. रविंद्र रबर प्रॉडक्टस् ॲडफॅब्रिकेशन, श्रीरामपूर
३. दुर्गा ट्रेडींग, कार्पोरेशन, औरंगाबाद

४. मेकॅन्को इंटरप्रायजर्स, पुणे
५. सिक्स्थ सेन्स इंटेरीअर्स अॅण्ड डेव्हलपर्स, पुणे
६. चौधरी व्हेनिलिशीयन ब्लाईड, मुंबई
७. पुजा स्टील कार्पोरेशन, मुंबई

उपरोक्तपैकी खालील ठेकेदार यांचे सिलबंद कोटेशन प्राप्त झाले आहेत.

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव | आवक नंबर दिनांक | शेरा |
|---|---|---|---|
| ०१ | दुर्गा ट्रेडींग कार्पोरेशन, औरंगाबाद | ७५४० दि.१४/०८/२०१२ | सिलबंद पाकीट |
| ०२ | मेकॅन्को इंटरप्रायजेस, पुणे | ७५४१ दि.१४/०८/२०१२ | सिलबंद पाकीट |
| ०३ | सिक्स्थ सेन्स इंटेरीअर्स अॅण्ड डेव्हलपर्स, पुणे | ७६१३ दि.१६/०८/२०१२ | ई.मेलव्दारे प्राप्त |

उपरोक्त प्रमाणे विहीत मुदतीत प्राप्त झालेले ०३ सिलबंद कोटेशन आजचे सभेत उघडण्यात येऊन कोटेशन सादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ. नं. | कोटेशन सादरकर्त्याचे नांव / पत्ता | कोटेशनमधील दर | चर्चा/ वाटाघाटीनंतर देऊ केलेले दर |
|---|---|---|---|
| ०१ | दुर्गा ट्रेडींग कार्पोरेशन, औरंगाबाद | १,३२,९१२/- | १,३२,९१२/- |
| ०२ | सिक्स्थ सेन्स इंटेरीअर्स अॅण्ड डेव्हलपर्स, पुणे | ९३,९७४/- | अनुपस्थित |
| ०३ | मेकॅन्को इंटरप्रायजेस, पुणे | १,५७,१४८/- | अनुपस्थित |

निर्णय क्र.९६२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईप्रसाद निवासस्थान विभाग कार्यालयासमोर रुम बुकींग काऊंटरकरीता ओनिंग फॅब्रीक वापरुन शेड तयार करणेकामी मे. सिक्स्थ सेन्स इंटेरीअर्स अॅण्ड डेव्हलपर्स, पुणे यांचे कोटेशनमधील रु.९३,९७४/- मात्र निम्नतम दर स्विकारण्यात येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

---

विषय नं.११ **साईआश्रम प्रकल्पाचे भाग-२ येथील हॉलसाठी कॉटस् खरेदीकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडून त्यावर चर्चा/ वाटाघाटीव्दारे निर्णय होणेबाबत.**

प्रस्ताव- शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई व श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांचे संयुक्त विद्यमाने "साई आश्रम" या भक्तनिवास प्रकल्पाचे बांधकाम पूर्णत्वास येत आहे.

साई आश्रम प्रकल्पाचे भाग २ येथील हॉलसाठी एम.एस.(सी.आर.सी.ए) कॉटस् खरेदीकामी मा. व्यवस्थापन समितीचे दि.२८/०४/२०१२ रोजीचे सभेतील नि.क्र.३६४ अन्वये रु.१,८५,६०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे.

त्यानुसार दि.२७/०८/२०१२ रोजीचे वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती, त्यामध्ये निविदा विक्रीसाठी दि.२७/०८/२०१२ ते दि.१०/०९/२०१२ पर्यंत मूदत देण्यात आली होती, विहीत मूदतीत खालील ०४ (चार) ठेकेदार यांनी कोरे निविदा फॉर्म घेतले होते.

१. स्पेसवूड फर्निशर्स, प्रा.ली., नागपूर
२. गोदरेज अॅण्ड बाईस् मॅनीफॅक्चरींग कं. लि., पुणे
३. पवार ईलेक्ट्रो सिस्टीमस् प्रा.लि., नाशिक
४. एर्गोमॅक्स (इंडिया) प्रा.लि., चेन्नई

तसेच सिलबंद निविदा सादर करणेसाठी दि.१८/०९/२०१२ अखेर मूदत देण्यात आली होती. परंतू दि.१२/०९/२०१२ रोजी अयोजीत करण्यात आलेल्या निविदपूर्व बैठकीमध्ये सिलबंद निविदा सादर करण्याची मूदत दि.२५/०९/२०१२ अखेर वाढविण्यात आली होती. सदरचे कालावधीमध्ये उपरोक्त चारही ठेकेदार यांनी सिलबंद निविदा सादर केलेल्या असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | ठेकेदारांचे नांव | आवक क्र. दिनांक |
|---|---|---|
| ०१. | स्पेसवूड फर्निशर्स, प्रा.ली., नागपूर | ९५९७/ दि.२५/०९/२०१२ |
| ०२. | गोदरेज अॅण्ड बाईस् मॅनीफॅक्चरींग कं. लि., पुणे | ९५९६/ दि.२५/०९/२०१२ |
| ०३. | पवार ईलेक्ट्रो सिस्टीमस् प्रा. लि., नाशिक | ९५९९/ दि.२५/०९/२०१२ |
| ०४. | एर्गोमॅक्स (इंडिया) प्रा.लि., चेन्नई | ९६०१/ दि.२५/०९/२०१२ |

उपरोक्त प्रमाणे विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या ०४ सिलबंद निविदा आजचे सभेत उघडण्यात येऊन निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ. नं. | निविदासादरकर्त्याचे नांव / पत्ता | निविदेतील दर (रु.) |
|---|---|---|
| ०१ | गोदरेज अॅण्ड बाईस् मॅनीफेक्चरींग कं. लि., पुणे | १,३४,४५,९५२/- (रु.५,३८७/-प्र.नग) |
| ०२ | स्पेसवूड फर्निशर्स, प्रा.ली., नागपूर | १,२९,७९,२००/- (रु.५,२००/-प्र.नग) |

| | | |
|---|---|---|
| ०३ | एर्गोमॅक्स (इंडिया) प्रा.लि., चेन्नई | १,४९,२३,५८४/- (रु.५,९७९/-प्र.नग) |
| ०४ | पवार ईलेक्ट्रो सिस्टमस् प्रा. लि., नाशिक | १,२१,०३,१०४/- (रु.४,८४९/-प्र.नग) |

निर्णय क्र.९६३ **निविदासादरकर्त्यांनी सादर केलेल्या कॉटस्च्या नमुन्यांची समितीने पहाणी केली. यानंतर चर्चा होऊन, खरेदी करावयाच्या कॉटस्चा वापर हा साईआश्रम प्रकल्पाचे भाग-२ येथील डॉरमेटरी हॉल्समध्ये करावयाचा असल्याने ते मजबूत होण्याचे दृष्टीने सदर कॉटस्चे डिझाईन सुधारित करुन त्यानुसार निविदासादरकर्त्यांकडून एक नमुना अगोदर तयार करुन घ्यावा व सदरचे नमुने पाहुन अंतीम निर्णय घेण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

---

विषय नं.१२ **साई आश्रम भाग १ व २ परिसराचे प्रवेशव्दाराजवळ प्रकल्पाच्या नावाचे LED बोर्ड बनवून लावणेकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडणेबाबत. (रु.१८,००,०००/-)**

प्रस्ताव- संस्थानचे मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं. १०७, १०८ व १०९ मध्ये व मौजे निमगांव को-हाळे येथील गट नं. १७२ पैकी मधील जागेत साईभक्तांचे निवासव्यवस्थेकरीता साई आश्रम प्रकल्प उभरणेत आला आहे. सदर प्रवेशव्दाराजवळ प्रकल्पाचे नांवाचे LED बोर्ड तयार करुन साईआश्रम भाग-१ व भाग-२ येथे मराठी व इंग्रजी अक्षरात लावणेसाठी प्रत्येकी ५ बोर्ड (एकूण १० बोर्ड) तयार करावयाचे आहेत. याकामी येणारे रक्कम रु.१८,००,०००/- मात्रचे खर्चास मा. व्यवस्थापन समितीचे दि.२५/०८/२०१२ रोजीचे सभेत मान्यता मिळाली आहे.

यानुसार सदरहूकामी स्थानीक वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिद्ध करणेत आली असून सदरहू कामी खालील तिन ठेकेदारांनी सिलबंद निविदा सादर केल्या आहेत.

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव | आवक क्र. दिनांक |
|---|---|---|
| ०१ | योगीटेक सर्व्हीसेस, नाशिक | ११०९४ दि.२०/१०/२०१२ |
| ०२ | श्री. गणेश डिजीटल प्रा.लि.,पुणे | ११०९३ दि.२०/१०/२०१२ |
| ०३ | सोमवंशी आर्टस, (साईकला अँड)राहाता | १११८० दि.२२/१०/२०१२ (मूदतीनंतर प्राप्त) |

उपरोक्त पैकी अ.नं. १ व २ चे ठेकेदार यांनी दि.२०/१०/२०१२ पर्यंतचे विहीत मूदतीत सिलबंद निविदा सादर केल्या असून अ.नं.३ चे ठेकेदार यांनी विहीत मूदतीनंतर निविदा सादर केली आहे.

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या ०३ सिलबंद निविदा आजचे सभेत उघडण्यात येऊन निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ. नं. | निविदासादरकर्त्याचे नांव / पत्ता | निविदेतील दर (रु.) | चर्चा/ वाटाघाटीनंतर देऊ केलेले दर (रु.) |
|---|---|---|---|
| ०१ | योगीटेक सर्व्हीसेस, नाशिक | ३५,२६,५०७/- (सॅमसंग ) | २८,२६,०००/- |
| ०२ | श्री. गणेश डिजीटल प्रा.लि.,पुणे | ११,०५,९००/- (सॅमसंग ) ८,६६,५००/- (Rons) | १०,९०,०००/- |
| ०३ | सोमवंशी आर्टस, (साईकला अँड) राहाता | १५,७१,०००/- | ११,००,०११/- |

निर्णय क्र.९६४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, साई आश्रम भाग १ व २ परिसराचे प्रवेशव्दाराजवळ प्रकल्पाच्या नावाचे LED बोर्ड बनवून लावणेकामी श्री. गणेश डिजीटल प्रा.लि.,पुणे यांचे रु.१०,९०,०००/- मात्रचे (सॅमसंग कंपनीचे LED Lights सह) निम्नतम दर स्विकारण्यात येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

---

विषय नं.१३ **श्री द्वारकामाई धुनीसाठी लागणाऱ्या गोवरी-सरपण साठयाकरीता स.नं.१२४ मध्ये शेड तयार करणेकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडून त्यावर निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानचे मध्यवर्ती भांडार इमारतीचे परिसरामध्ये ४५०० चौ. फुट. क्षेत्र असलेले तीन फुट उंचीच्या भिंतीवर पत्रे तसेच छतास कलरकोटेड शीट, एम.एस ग्रील व्हेंटीलेटर, रोलींग शटर इत्यादिसह शेड तयार करणेकामी सन २०११-१२ चे (DSR) दरसुचीनुसार येणारे अंदाजे रुपये १४,३५,६००/- खर्चास व सदरचे कामी विहीत पध्दतीने जाहिरात प्रसिध्द करुन निविदा मागविणेस मा. त्रिसदस्य समितीचे दि. २५ ऑगस्ट, २०१२ रोजीचे सभेत निर्णय क्र. ६६९ अन्वये मान्यता देणेत आली आहे.

उपरोक्त प्रमाणे झालेले निर्णयानुसार, इकडील विभागामार्फत निविदा फॉर्म तयार करणेत येऊन, याकामी जनसंपर्क कार्यालयामार्फत दिनांक २३ ऑक्टोबर, २०१२ रोजीचे नगर टाईम व श्रीरामपूर टाईम या वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करण्यात येवून दि. २२ ऑक्टोबर, २०१२ ते दिनांक २९ ऑक्टोबर, २०१२ कोरे निविदा विक्रीची मुदत देऊन निविदा मागविण्यात आल्या असून, सदरचे विहित मुदतीत खालील ठेकेदारांनी कोरे निविदा फॉर्म विकत घेतले आहेत.

१. डॅश इंटेरियर, मुंबई

२. श्री. बाबासाहेब पंढरीनाथ शिंदे, पढेगांव

३. श्री. अभिजीत मनोज जावळे, कोपरगांव

वरिल तिन ठेकेदारानी कोरे निविदा फॉर्म घेऊन, विहीत मुदतीत (दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१२) सिलबंद निविदा सादर केल्या आहेत.

उपरोक्त प्रमाणे विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या ०३ सिलबंद निविदा आजचे सभेत उघडण्यात येऊन निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ. नं. | निविदासादरकर्त्यांचे नांव / पत्ता | निविदेतील दर (रु.) | चर्चा/ वाटाघाटीनंतर देऊ केलेले दर (रु.) |
|---|---|---|---|
| ०१ | डॅश इंटेरियर, मुंबई | १५ % अधिक (१६,५०,९४०/-) | अनुपस्थित |
| ०२ | श्री. बाबासाहेब पंढरीनाथ शिंदे, पढेगांव | ३ % अधिक (१४,७८,६६८/-) | ३ % अधिक (१४,७८,६६८/-) |
| ०३ | श्री. अभिजीत मनोज जावळे, कोपरगांव | १९.११ % अधिक (१७,८८,५७६/-) | १६ % अधिक (१६,६५,२९६/-) |

**निर्णय क्र.९६५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री द्वारकामाई धुनीसाठी लागणाऱ्या गोवरी-सरपण साठ्याकरीता स.नं.१२४ मध्ये शेड तयार करणेकामी श्री.** बाबासाहेब पंढरीनाथ शिंदे, पढेगांव यांचे **निविदा दरावर ३% अधिक हे निम्नतम दर स्विकारण्यात येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.१४** **श्री साईबाबा भक्तनिवास इमारतीमधील कार्यालयाचे नुतनीकरण, अंतर्गत सजावटीसाठी फर्निचर तयार करणेकामी प्राप्त झालेल्या निविदांबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानचे श्री साईबाबा भक्तनिवासस्थान इमारतीमध्ये असलेले कार्यालय व रुम वाटप काउंटरचे नुतनिकरण व फर्निचरचे काम करुन घेणेकामी येणारे अंदाजे रुपये ११,१०,०००/- मात्र खर्च अपेक्षित खर्चास व सदरचे काम विहीत पध्दतीने निविदा मागवून करुन घेणेस मा. त्रिसदस्य समितीचे दिनांक २५ ऑगस्ट, २०१२ रोजीचे सभेत निर्णय क्रमांक ६६७ अन्वये मान्यता देणेत आलेली आहे.

उपरोक्त प्रमाणे झालेले निर्णयानुसार, इकडील विभागामार्फत निविदा फॉर्म तयार करणेत येऊन, याकामी जनसंपर्क कार्यालयामार्फत दिनांक २३ऑक्टोबर, २०१२ रोजीचे नगर टाईम व श्रीरामपूर टाईम या वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करण्यात येवून दि. २२ ऑक्टोबर, २०१२ ते दिनांक २९ ऑक्टोबर, २०१२ कोरे निविदा विक्रीची मुदत देऊन निविदा मागविण्यात आल्या असून, सदरचे विहित मुदतीत खालील ठेकेदारांनी कोरे निविदा फॉर्म विकत घेतले आहेत.

१.त्रिमीती इंटेरियर्स, नाशिक २.डॅश इंटेरियर, मुंबई

वरिल दोन ठेकेदारानी कोरे निविदा फॉर्म घेऊन, विहीत मुदतीत (दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१२) सिलबंद निविदा सादर केल्या आहेत.

उपरोक्त प्रमाणे विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या ०२ सिलबंद निविदा आजचे सभेत उघडण्यात येऊन निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ. नं. | निविदासादरकर्त्यांचे नांव / पत्ता | निविदेतील दर (रु.) | चर्चा/ वाटाघाटीनंतर देऊ केलेले दर (रु.) |
|---|---|---|---|
| ०१ | डॅश इंटेरियर, मुंबई | ०५ % कमी (११,६५,५००/-) | अनुपस्थित |
| ०२ | त्रिमीती इंटेरियर्स, नाशिक | १० % अधिक (१२,२१,०००/-) | ०६ % कमी (११,७६,६००/-) |

**निर्णय क्र.९६६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा भक्तनिवास इमारतीमधील कार्यालयाचे नुतनीकरण, अंतर्गत सजावटीसाठी फर्निचर तयार करणेकामी मे.त्रिमीती इंटेरियर्स, नाशिक यांचे रु.११,७६,६००/- मात्र (निविदा दरावर ६% कमी) हे निम्नतम दर स्विकारण्यात येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

---

विषय नं.१५ **श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयामधील वार्षिक (सन २०१२-२०१३) छपाई व कार्यालयीन स्टेशनरी खरेदीकामी प्राप्त निविदा उघडणेबाबत. (रु.१८,५७,२९२/-)**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटल व श्रीसाईनाथ रुग्णालयामध्ये सर्व वार्ड / विभागात दैनंदिन वापरासाठी लागणारे वार्षिक (सन २०१२ - २०१३) छपाई व कार्यालयीन स्टेशनरी खरेदीकामी मा.त्रिसदस्यीय समिती सभा दि. १४.०७.२०१२ निर्णय क्र. ५०९ अन्वये याकामी येणाऱ्या एकूण रु. १८,५७,२९२/- चे खर्चास व वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागविणेस मान्यता मिळाली होती.

त्यानुसार सदरचे छपाईकामी महाराष्ट्र टाईम्स- अहमदनगर या वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात आली होती तसेच संस्थानचे संकेत स्थळावर देखील जाहिरात देण्यात आली होती. त्यानुसार संस्थानचे शिर्डी व मुंबई येथील कार्यालयात दि.२०.०८.२०१२ ते ३०.०८.२०१२ पर्यंत निविदा विक्री ठेवण्यात आली होती तर सिलबंद निविदा स्विकारण्याची अंतीम तारीख ०५.०९.२०१२ ठेवण्यात आली होती.

त्यानुसार शिर्डी व मुंबई कार्यालयात प्राप्त झालेल्या सिलबंद निविदांचा तपशिल खालीलप्रमाणे -

**अ) छपाई -**

| अ.नं. | ठिकाण | प्राप्त झालेल्या निविदा |
|---|---|---|
| १ | शिरडी कार्यालय | ०५ |
| २ | मुंबई कार्यालय | ०३ |
| | एकूण निविदा | ०८ |

| अ.नं. | पुरवठा धारकाचे नाव | प्राप्त झालेल्या निविदा |
|---|---|---|
| १ | में. अविराज पॅकवेल, कोपरगांव | (१ बंद निविदा प्राप्त ०३.०९.२०१२) |
| २ | में. ओम प्रिंटर्स, कोपरगांव | (१ बंद निविदा प्राप्त ०४.०९.२०१२) |
| ३ | में. प्रभात ऑफसेट, येवला | (१ बंद निविदा प्राप्त ०५.०९.२०१२) |
| ४ | में. रोहन प्रिंटर्स अँण्ड स्टेशनर्स, औरंगाबाद | (२ बंद निविदा प्राप्त ०५.०९.२०१२) |
| ५ | में. गणेश ग्राफीक्स अँण्ड डीटीपी सेंटर, कोपरगांव | (१ बंद निविदा प्राप्त ०३.०९.२०१२) |
| ६ | में. क्लासिक स्टेशनर्स कं., मुंबई | (१ बंद निविदा प्राप्त ०५.०९.२०१२) |
| ७ | में. शेल स्टेशनर प्रिंटर कॉम्प्युटर., मुंबई | (१ बंद निविदा प्राप्त ०५.०९.२०१२) |
| ८ | में. श्री ग्राफी, पुणे | (१ बंद निविदा प्राप्त ०५.०९.२०१२) |

**ब) कार्यालयीन स्टेशनरी -**

| अ.नं. | ठिकाण | प्राप्त झालेल्या निविदा |
|---|---|---|
| १ | शिरडी कार्यालय | ०३ |
| २ | मुंबई कार्यालय | ०२ |
| | एकूण निविदा | ०५ |

| अ.नं. | पुरवठा धारकाचे नाव | प्राप्त झालेल्या निविदा |
|---|---|---|
| १ | में. साई एजन्सी, श्रीरामपूर | (१ बंद निविदा प्राप्त ०५.०९.२०१२) |
| २ | में. साई अँटोमेशन, अहमदनगर | (१ बंद निविदा प्राप्त ०५.०९.२०१२) |
| ३ | में. ज्योती बुक सेलर्स अँण्ड स्टेशनर्स, नाशिक | (१ बंद निविदा प्राप्त ०५.०९.२०१२) |
| ४ | में. क्लासिक स्टेशनर्स कं., मुंबई | (१ बंद निविदा प्राप्त ०५.०९.२०१२) |
| ५ | में. श्री ग्राफी, पुणे | (१ बंद निविदा प्राप्त ०५.०९.२०१२ |

तरी वरीलप्रमाणे अ व ब मिळूण प्राप्त झालेल्या एकूण १३ सिलबंद निविदा हया मा. त्रिसदस्यीय समिती सभेपुढे समक्ष उघडून मिळणेस मान्यता असावी .

**निर्णय क्र.९६७ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयामधील वार्षिक (सन २०१२-२०१३) छपाई व कार्यालयीन स्टेशनरी खरेदीकामी प्राप्त झालेल्या एकूण १३ सिलबंद निविदा आजचे सभेपुढे समक्ष उघडण्यात येऊन, त्यांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन तो पुढील सभेपुढे सादर करण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.१६ श्री साईबाबा रुग्णालयातील GICU विभागासाठी CNS (Central Nursing Station) खरेदीकामी प्राप्त कोटेशन उघडून चर्चा / वाटाघाटी करुन निर्णय घेणेबाबत. (रु.२,६०,०००/-)**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयातील GICU विभागासाठी सन २००५ मध्ये CNS (Central Nursing Station) खरेदी करुन कार्यान्वित करण्यात आलेली होती सदर CNS (Central Nursing Station) वर क्रिटीकल रुग्णांचा ब्लडप्रेशर हार्टरेट व इतर सर्व बाबी मॉनिटरींग केल्या जातात. सध्या

GICU विभागाकडे असलेला ८ बेडचा CNS (Central Nursing Station) MCH-०२८३ हे सन २००५ मध्ये रक्कम रु.१,२५,०००/- इतक्या रक्कमेत खरेदी करण्यात आलेले अूसन ते आतापर्यंत दोन वेळेस दुरुस्त करुन घेण्यात आलेले असून सदर सिस्टीमचा PC व Windows सन १९९८ मधील Version च्या असून त्या दुरुस्त करण्यासाठी लागणारे स्पेअर पार्ट बाजारामध्ये व कंपनीच्या स्टोअर्समध्ये देखील उपलब्ध नाही त्यामुळे उपरोक्त सिस्टीम सध्या दुरुस्त होऊ शकत नाही. तसेच श्री साईबाबा रुग्णालयातील EDP विभाग हा देखील सदर सिस्टीम दुरुस्त करु शकत नाही. त्यामुळे ती सध्या Working Condition मध्ये नाही.

सदर CNS (Central Nursing Station) हा Working Condition मध्ये नसल्यामुळे डॉक्टरांना रुग्णांचे मॉनीटर प्रत्येक वेळेस कॉट जवळ जाऊन समक्ष करावे लागते. त्यामुळे दैनंदिन कामाची व रुग्णांची गैरसोय होत आहे. त्यामुळे GICU विभागाने एक CNS (Central Nursing Station) ची दि.१७/०४/२०१२ चे मागणी पत्रान्वये मागणी केलेली आहे. त्यावर रुग्णालयाचे बायोमेडिकल विभागाने ८ बेडचा किंवा १६ बेडचा मॉनीटर घेण्याबाबत शिफारस केलेली आहे. सध्या GICU मध्ये एकूण (तातडीचे दोन बेड धरुन) १२ बेड आहे परंतु १२ बेडचा CNS येत नाही. ८ किंवा ८ च्या पटीत म्हणजे १६ बेडचा येतो. ८ बेडची किंमत रु.२,१०,०००/- आहे तर १६ बेडची किंमत रु.२,६०,०००/- आहे म्हणजेच आर्थिक दृष्ट्या १६ बेडचा CNS घेणे फायदेशीर राहिल शिवाय भविष्यात बेडची संख्या वाढविल्यास तेथे देखील त्याचा फायदा होऊ शकेल.

GICU विभागामध्ये L & T कंपनीचे मॉनिटर असल्यामुळे L & T कंपनीचाच CNS - १६ Bed चा घ्यावा लागणार आहे. L & T कंपनीचे मॉनिटर साठी दुसऱ्या कंपनीचे CNS Compatible होत नाही. त्यामुळे सदरचे CNS खरेदीकामी अंदाजे खर्चासाठी L & T कंपनीचे अधिकृत विक्रेते मे.एक्सल कार्पोरेशन, नाशिक यांच्याकडे दराबाबत चौकशी केली असता त्यांनी १६ Bed चे एक CNS करीता अंदाजे रु.२,६०,०००/- इतका खर्च येईल असे कळविले आहे.

त्यानुसार दि.१८/०७/२०१२ रोजीचे मा. त्रीसदस्य समिती सभेत श्री साईबाबा हॉस्पिटलमधील GICU विभागाकरीता लागणारे एक नग CNS (Central Nursing Station) L & T कंपनीचेच घ्यावे लागणार असल्याने थेट उत्पादक कंपनी L & T, Pune यांचेकडून कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.२,६०,०००/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार इकडील पत्र क्र.२६८८ दि.२८/०८/२०१२ अन्वये थेट उत्पादक कंपनी L & T, Pune यांचेकडून दि.२०/०९/२०१२ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते. परंतु कंपनीने स्वतः कोटेशन न देता त्यांचे अधिकृत विक्रेते Excel Corporation, Nashik यांचे मार्फत बंद कोटेशन पाठविलेले आहे.

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले ०१ बंद कोटेशन आजचे सभेपुढे उघडण्यात येऊन, कोटेशनधारकांस चर्चा/ वाटाघाटीसाठी समक्ष बोलाविण्यात असता, त्यांनी चर्चा/ वाटाघाटीअंती देऊ केलेल्या सुटीचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr. No. | Description | Qty. | Excel Corporation, Nashik | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | Make | Model | Rate Per in Rs. | Rate After Negotiation | Total Amt. in Rs. |
| 1 | CNS (Central Nursing Station) -16 Bed | 1 | L & T | Skyline 55 (16 Bed) | 295000 Less buyback of old CNS Rs. 25000 = 270000.00 | 255000.00 | 255000.00 |
| | Total Amt. in Rs. | | | | 270000.00 | | 255000.00 |
| | CMC | | | | | 5% of total order value & thereafter 1% escalation every year | |
| | Warranty | | | | | 2 Year | |

**निर्णय क्र.९६८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, M/s. Excel Corporation, Nashik यांना जुना CNS रु.२५०००/- मात्र या किंमतीत परत करुन त्यांचेकडून नविन CNS रु.२,५५,०००/- मात्र या किंमतीत स्विकारण्यात यावा. तसेच, ०१ वर्षाचा वॉरंटी कालावधी संपल्यानंतर त्यांचेकडे आवश्यकतेनुसार वरील दराने CMC करण्यात यावी असे ठरले.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.१७** **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वॉर्ड/विभागाकरीता फर्निचर खरेदी करणेकामी प्राप्त निविदा उघडून चर्चा / वाटाघाटी करुन निर्णय घेणेबाबत. (रु.८,३०,४६४/-)**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वॉर्ड / विभागाने विविध प्रकारच्या हॉस्पिटल / कार्यालयीन फर्नीचरची मागणी केलेली आहे. रुग्णालयात रुग्णांची संख्या वाढल्यामुळे कॉटची संख्या देखील वाढत आहे, त्यामुळे तेथे नविन फर्नीचरची मागणी केलेली आहे तसेच बऱ्याच वॉर्ड / विभागातील फर्नीचर हे वापरुन खराब झालेले आहे, त्यामुळे त्यांनी नविन फर्नीचर मिळणेबाबत मागणी केलेली आहे.

मा. त्रीसदस्य समिती सभा दि. ०६/०४/२०१२ निर्णय क्र.३११ अन्वये फर्नीचर खरेदीकामी विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन सिलबंद निविदा मागवुन खरेदीस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु. ८,३०,४६४/- (अक्षरी रु. आठ लाख तीस हजार चारशे चौसष्ट मात्र) चे खर्चास मान्यता मिळालेली होती.

त्यानुसार सदरच्या खरेदीची रक्कम जास्त असल्याने जास्तीत जास्त प्रतिसाद मिळणेकामी सदरची जाहिरात महाराष्ट्र टाईम्स-मुंबई, पुणे, लोकमत- नाशिक, औरंगाबाद या वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्यात आली होती, तसेच संस्थानचे संकेत स्थळावर देखील निविदा देण्यात आली होती.

निविदा विक्रीची मुदत दि.२०/०८/२०१२ ते ३०/०८/२०१२ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.०५/०९/२०१२ अखेर ठेवण्यात आली होती. तसेच एकूण १९ उत्पादक कंपन्या / पुरवठा धारक यांना इकडील पत्र क्र.२५६८ दि.१७/०८/२०१२ अन्वये जाहिराती बाबत अवगत करणेकामी पत्र पाठविण्यात आले होते.

त्यास अनुसरुन शिर्डी येथील कार्यालयात ०५ निविदा प्राप्त झालेल्या आहे, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr.no. | Name of Tenderer | Received Date |
|---|---|---|
| 1 | Sai Enterprises, Shrirampur | 04/09/2012 |
| 2 | Unitech Steel Engineering, Miraj | 04/09/2012 |
| 3 | Austin Healthcare, Pune | 05/09/2012 |
| 4 | Divisional Manager, Nashik | 05/09/2012 |
| 5 | Metro Metal Industries, Aurangabad | 06/09/2012 |

वरीलपैकी अ.नं.३ यांची निविदा दि.०६/०९/२०१२ रोजी म्हणजे एक दिवस उशिरा प्राप्त झालेली आहे, परंतु सर्व निविदा बंद स्थितीत असल्यामुळे सदर निविदेचा देखील विचार करावा असे नम्र मत आहे.

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या ०५ सिलबंद कोटेशन आजचे सभेत उघडण्यात येऊन कोटेशन सादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| Sr. No. | Name of items | Qty. | M/s. Sai Enterprises, Shrirampur | | | M/s. Unitech Steel Engineering, Miraj | | | M/s. Austin Healthcare, Pune | | | M/s. MSSIDC, Nashik | | | M/s. Metro Metal industries, Aurangabad | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | Make / Model | Rate Per in Rs. | Rate After Negotiation | Make / Model | Rate Per in Rs. | Rate After Negotiation | Make / Model | Rate Per in Rs. | Rate After Negotiation | Make / Model | Rate Per in Rs. | Rate After Negotiation | Make / Model | Rate Per in Rs. | Rate After Negotiation |
| 1 | Cardiac Ward care Overbed Table - Overall approx. size: 1120mm L x 450mm W x 965mm H. MS tubular framework mounted on four twin wheel, non rusting castors, 50mm dia. Top 780mmL x 450mm W made of laminated board. Pretreated and powder coated. Supplied in kdc. | 9 | | N.Q. | | | 2813.00 | 2675.00 | Shree Hospital | 7762.50 | 7762.50 | | N.Q. | | | 2757.00 | Absent |

| | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | Gayatri Surgicals | 4190.63 | 4190.63 | | | | | | |
| 2 | **Bedside Locker** - Approx. size: 400mm square. Height: 620mm. Machine pressed CRCA steel sheet locker box with door. Superimposed SS top with raised edge on three sides. MS tubular legs with rubber feet. Pretreated and powder coated. | 50 | | N.Q. | | | 2306.00 | 2200.00 | Shree Hospital | 2756.25 | 2758.25 | | 1772 00 | 1772.00 | | 1857.00 | |
| | | | | | | | | | Gayatri Surgicals | 3602.50 | 3802.50 | | | | | | |
| 3 | **S.S. Stool for Patient (Round Shape Revolving Stool)** Overall Size : 11.5" die x 21" - 29" Stainless Steel structure with superimposed stainless steel top. Height adjustable from 425 to 675 mm with the help of smooth screw mechanism. | 25 | | N.Q. | | | 2061.00 | 1975.00 | Shree Hospital | 1940.63 | 1940.63 | | 1069.00 | 1069.00 | | 1407.00 | |
| | | | | | | | | | Gayatri Surgicals | 2283.75 | 2283.75 | | | | | | |

| | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | **Modern Bed Fixed Height, Fowler position** supplied with Sliding safety side Rails (Pair) epoxy powder coated & Telescopic I.V.Rod S.S.- Overall approx. Size 2070mm L x 910mm W x 600 mmH. Four section perforated top. Two separate screws for backrest and kneerest adjustments. SS tubular head and foot bows with laminated panels. Four swivel castors, 100mm dia., two with brake. Four IV rod locations Pretreated and powder coated. supplied in kdc. | 4 | | N.Q. | | | 14063.00 | 13360.00 | Shree Hospital | 20925.00 | 20925.00 | | 26100.00 | 26100.00 | | 14344.00 | |
| | | | | | | | | | Gayatri Surgicals | 23765.63 | 23765.63 | | | | | | |
| 5 | **Patient Simple Beds - Sizes 72" X 36" X 22"** Made from 18 Swg. Uniformly perforated sheet mattress Bed frame made in 60 x 30mm Rect.ERW tube. leggings made in 30mm X 30mm ERW Square tube Bows completely stainless steel 30mm Dia. Optionally | 4 | | N.Q. | | | 6750.00 | 6415.00 | Shree Hospital | 14962.50 | 14962.50 | | 20250.00 | 20250.00 | | 4557.00 | |

| | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | available with S.S. Side rails for patient safety, Stainless Steel head and foot and bows telescopic Adjustable I.V. Rod, 100 mm dia. Revolving castors. Pretreated & epoxy powder Coated Supplied in KDC. | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | Gayatri Surgicals | 13308.75 | 13308.75 | | | | | | |
| 6 | **Iron Stool** | 20 | Godrej Round Top with 305mm dia & overall height 455mm | 1007.00 | 949.00 | | N.Q. | | Shree Hospital | **1046.25** | **1046.25** | | **84400** | **84400** | | 535.00 | |
| | | | **Delux Make 12" x 12" x 18" H** | **562.00** | | | | | Gayatri Surgicals | **1237.50** | **1237.50** | | | | | | |
| 7 | **Shoes Rack** | 2 | Godrej Model 202M Two Seater Size 600W x395L x 490H (mm) | 4725.00 | 4439.00 | | N.Q. | | Gayatri Surgicals | 3037 50 | 3037.50 | | 1350.00 | 1350.00 | | 3938.00 | |
| | | | Nilkamal | 2999.00 | | | | | Gayatri Surgicals | 3431.25 | 3431.25 | | | | | | |
| | | | | | | | | | Gayatri Surgicals | 3993.75 | 3993.75 | | | | | | |
| 8 | **Personnel Locker** Unit 6 Door With Lock (Base) | 9 | Godrej Size:380Wx457Dx1830H (mm) | 12774.00 | 11730.00 | Over all Size: 975 W x 450 D x1100L each door size: 300x450. In 185 wg epoxy powder coated | 11813.00 | 11813.00 | Gayatri Surgicals | 17111.25 | 17111.25 | | 13500.00 | 13500.00 | | [illegible]0 | |
| | | | Delux Size: 380W x457 Dx1630H (mm) | 10666.00 | | | | | Gayatri Surgicals | 28516.75 | 28518.75 | | | | | | |

| | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 9 | S S Cupboard 6 Feet - Cupboard Stainless Steel - Size: 1981mm x 914mm x 483mm. Gauge of Steel 18 with four compartment. | 29 | Godrej Storewek Plain with 4 shelves (Welded) Size: 916W x 485D x 1981 H (mm) | 16671.00 | 16299.00 | | 27563.00 | 26185.00 | Shree Hospital 99x13 | 26853.75 | 26853.75 | | 45000.00 | 45000.00 | | 46969.00 | |
| | | | Godre Slimline 4S (Knock down) Size: 900W x 507D x 1950 H (mm) | 14173.00 | | | | | | | | | | | | | |
| | | | Delux Make 4 adjustable shelves Size: 914W x483 D x 1981 H (mm) | 9799.00 | | | | | | | | | | | | | |
| 10 | I.V. Stand with Castor (Heavy) | 4 | | N.Q. | | | 731.00 | 731.00 | Shree Hospital / 9293 | 2688.75 | 2688.75 | | 1294.00 | 129400 | Aluminium Base | 1069.00 | |
| | | | | | | | | | Gayatri Surgicals | 209250 | 209250 | | | | | | |
| 11 | Mayos Trolley - Adjustable height of SS tray from 760mm to 1270mm Tray size approx.: 560mmL x 400mm W. SS tubular frame mounted on four swivel, twin wheel non rusting castors, 50mm dia. | 1 | | N.Q. | | | 4444.00 | 4225.00 | Shree Hospital / 9923 | 567000 | 5670.00 | | 309400 | 3094.00 | | 2419.00 | |
| | | | | | | | | | Gayatri Surgicals | 3431.25 | 3431.25 | | | | | | |

| | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 12 | **Revolving Chair full back rest with side arm with wheel** | 7 | Godrej Revolving Chair high back rest with arm rest Model PCH 7001 Size: 65Wx65Dx 105 to 117H (cm) | 12258.00 | 11299.00 | | N.Q. | | Shree Hospital / 99x21 | 5231.25 | 5231.25 | | 7313.00 | 7313.00 | PHK 75 | 6188.00 | |
| | | | Nilkamal Revolving Chair with high back rest with arm rest Model Boss High Back Size: 680Dx610W x 1255H (mm) | 11900.00 | | | | | Gayatri Surgicals | 5703.75 | 5703.75 | | | | | | |
| | | | Nilkamal Revolving Chair with high back rest with arm rest Model Apollo High Back Size: 810Dx595W x 910H (mm) | 5750.00 | | | | | | | | | | | | | |
| 13 | **Revolving Chair half back rest with side arm with wheel** | 26 | Godrej Revolving Chair Mid back rest with arm rest Model PCH 7046R Size: 64Wx64Dx 87 to 99.5H (cm) | 4400.00 | 3999.00 | | N.Q. | | Shree Hospital / 99x21 | 4623.75 | 4623.75 | | 4762.00 | 4762.00 | PTL 268 | 3544.00 | |
| | | | Nilkamal, Mid Back with arm rest Model Blaze Size: 580D x 620W x 830H (mm) | 5100.00 | | | | | Gayatri Surgicals | 3234.38 | 3234.36 | | | | | | |

| | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | Nilkamal, Mid Back with arm rest Model Charm Size: 580D x 550W x 890H (mm) | 3900.00 | | | | | | | | | | | | | |
| | | | Nilkamal, Mid Back with arm rest Model Nano Size:600D x 500W x 900H (mm) | 3100.00 | | | | | | | | | | | | | |
| 14 | **E.C.G. Machine Trolley** • All Stainless Steel • W - 355mm x D 480mm x H 665mm • Three Tray & 50mm Dia Wheels | 1 | | N.Q. | | | N.Q. | | Shree Hospital / 9233 | 4387.50 | 4387.50 | | 4500.00 | 4500.00 | | N.Q. | |
| | | | | | | | | | Gayatri Surgicals | 8550.00 | 8550.00 | | | | | | |
| 15 | **Dressing Trolley** - Overall approx. size: 1010mm L x 510mm W x 900mm H (shelf size: 750mmL x 500mm W). SS tubular frame mounted on four castors, 200mm dia. Two SS shelves with protective railings on all four sides. With SS bowl and SS bucket. Supplied in kdc. | 1 | | N.Q. | | | 6975.00 | 6625.00 | Shree Hospital / 9933 | 10462.50 | 10462.50 | | 6186.00 | 6168.00 | | 6919.00 | |
| | | | | | | | | | Gayatri Surgicals | 12375.00 | 12375.00 | | | | | | |

| | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 16 | **Stainless Steel Medicine Trolley -** Crash Cart trolley - Overall approx. size: 960 mmL x 500mm W x 1545mm H. SS tubular frame. Six coloured removable bins and two polystrene lockable storage units with three drawers each. The top drawers have containers of different sizes. Four swivel castors, 125mm dia., two with brake. Complete with corner buffers, powder coated oxygen cylinder holder cardiac massage board, SS IV rod and SS shelves. Supplied in kdc | 1 | | N.Q. | | | 21375.00 | 20350.00 | Shree Hospital / 9513 | 23118.75 | 23118.75 | | 23625.00 | 23625.00 | | 19688.00 | |
| | | | | | | | | | Gayatri Surgicals | 28518.75 | 28518.75 | | | | | | |
| | **Total Amt. In Rs.-** | | | | | | | | | | | | | | | | |
| | **Warranty -** | | | | | | | | | | | | | | | | |
| | **Payment -** | | | | | | | | | | | | | | | | |
| | **Delivery -** | | | | | | | | | | | | | | | | |

**निर्णय क्र.९६९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वॉर्ड/ विभागाकरीता फर्निचर खरेदी करणेकामी उपरोक्त पुरवठाधारकांकडील नमुने समक्ष पाहुन निर्णय घेण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.१८** **श्री साईबाबा हॉस्पिटलकरीता नव्याने खरेदी कराव्या लागणाऱ्या संगणक व संगणकीय साहित्याचे कोटेशन्स उघडून चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय घेणेबाबत. (रु. ४,७५,०००/-)**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलकरीता आवश्यकतेनुसार लागणारे संगणक संच,प्रिंटर्स व युपीएस इ.साहित्य खरेदी करणेसाठी पुरवठाधारकांकडुन संस्थानचे विहीत पध्दतीनुसार कोटेशन मागवून विहित पध्दतीने संगणकिय साहित्य खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रूपये ४,७५,०००/-+ टॅक्स (अक्षरी रूपये चार लाख पंच्याहत्तर हजार +टॅक्स मात्र) चे खर्चास दि. २५/०८/२०१२ रोजीचे मा. त्रिसदस्यीय समितीचे सभेत मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार दि.०४/०९/२०१२ रोजीचे मंजुर टिपणी नुसार श्री साईबाबा हॉस्पिटल करीता नव्याने खरेदी कराव्या लागणा-या संगणक व संगणकिय साहित्याचा तपशिल संस्थानचे वेब

साईटवरती प्रसिध्द करण्यात आला होता. त्यानुसार एकुण ०५ पुरवठाधारकांचे कोटेशन प्राप्त झाले असून त्यांचा तपशील खालील प्रमाणे-

१) Pushpam Software Pvt.Ltd (कोटेशन प्राप्त दि- १४/०९/२०१२)
२) Sai Siddhi Printers, Kopargaon (कोटेशन प्राप्त दि- १५/०९/२०१२)
३) Racca Infotech Pvt.Ltd., Nashik (कोटेशन प्राप्त दि- १४/०९/२०१२)
४) Minitech System (I) Pvt.Ltd. Nashik (कोटेशन प्राप्त दि- १५/०९/२०१२)
५) Sujata Computers Pvt.Ltd., Pune (कोटेशन प्राप्त दि- १५/०९/२०१२)

उपरोक्त प्रमाणे विहीत मुदतीत प्राप्त झालेले ०५ सिलबंद कोटेशन आजचे सभेत उघडण्यात येऊन कोटेशन सादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ. नं. | कोटेशन सादरकर्त्याचे नांव / पत्ता | कोटेशनमधील दर रु. | चर्चा/ वाटाघाटीनंतर देऊ केलेले दर रु. |
|---|---|---|---|
| ०१ | पुष्पम सॉफ्टवेअर प्रा.लि., | ३,६१,०९०/- | अनुपस्थित |
| ०२ | साई सिध्दी प्रिंटर्स, कोपरगाव | ३,९२,५००/- | अनुपस्थित |
| ०३ | राक्का इन्फोटेक प्रा.लि., नाशिक | ३,६२,०००/- | ३,२८,०००/- |
| ०४ | मिनीटेक सिस्टीम (इं.) प्रा.लि., नाशिक | ३,६९,२५०/- | ३,४३,७०३/- |
| ०५ | सुजाता कॉम्प्युटर्स प्रा.लि., पुणे | ३,८२,११०/- | ३,८२,११०/- |

निर्णय क्र.९७० **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलकरीता नव्याने खरेदी कराव्या लागणाऱ्या संगणक व संगणकीय साहित्य** खरेदीकामी मे.राक्का इन्फोटेक प्रा.लि., नाशिक **यांचे रु.३,२८,०००/- मात्र हे निम्नतम दर** स्विकारण्यात येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, **असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

विषय नं.१९ **श्री साईबाबा रुग्णालयातील वॉर्ड/ओ.टी मधील सोफे दुरुस्तीबाबतचे प्राप्त कोटेशन्स उघडून चर्चा / वाटाघाटी करुन निर्णय घेणेबाबत. (रु.६२,१००/-)**

प्रस्ताव- श्री साईबाबा रुग्णालयातील डिलक्स रुमला सन २००६ ला एकुण ५ सोफे देण्यात आलेले आहेत सध्या ते सोफे फाटलेले असल्याने दुरुस्त करुन मिळावे याकरीता त्या विभागाच्या इन्चार्ज सिस्टरांनी डि.पी.नं.७२२ दि.२२/११/२०११ अन्वये मागणी केली आहे त्यामुळे सर्वच वॉर्ड व ओ.टी च्या सोफ्यांची पाहणी केली असता एकुण २३ बदलावे लागतील जेणे करुन एकत्रीत काम करुन घेतल्यावर खर्च देखील कमी येईल व वारंवार प्रस्ताव ठेवण्याची गरज पडणार नाही.

तरी उपरोक्तप्रमाणे सोफ्यांचे कुशनचे काम करुन घेणेकरीता विहीत पध्दतीने कोटेशन मागवुन खरेदीस व याकामी येणारा खर्च अंदाजे रु.६२,१००/- चे खर्चास मान्यता मिळाली असुन त्यास अनुसरुन इकडील पत्र क्र.५७०२ दि.३१/०१/२०१२ अन्वये एकुण ८ पुरवठाधारकांकडुन दि.११/०२/२०१२ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते व त्यास अनुसरुन ५ पुरवठाधारकांकडुन बंद कोटेशन प्राप्त झालेले होते. सदर पुरवठाधारकांना मा.व्य.सभा दि. ०६/०४/२०१२ चे सभेत कोटेशन धारकांना सभेपुढे नमुने घेऊन समक्ष बोलविण्यात आले होते व त्यावेळी दोनच पुरवठाधारक उपस्थित होते. प्राप्त कोटेशन धारकांचे नमुने व दर समाधानकारक न वाटल्याने त्यासभेत नि.क्र.२६६ अन्वये सदर सोफे दुरुस्तीकामी लागणारे रेक्झीन व फोम हे वैद्यकीय संचालक यांनी समक्ष जाऊन खरेदी करावे व इतर दुरुस्तीचे दर मागवून दुरुस्ती करुन घ्यावी असा निर्णय झालेला आहे.

सदर निर्णयाप्रमाणे इकडील पत्र क्र.२४५८ दि.१३/०८/२०१२ अन्वये एकुण आठ पुरवठाधारकांना प्रत्यक्ष जाऊन कोटेशन पत्र देण्यात आले. चार कोटेशनधारकांचे सिलबंद कोटेशन पत्र व नमुने प्राप्त झालेले आहेत त्यापैकी मे.विष्णु कुशन मेकर,नाशिक व मे.ॲडव्हेंचर मॅट्रेसेस, अहमदनगर यांनी स्वा.हुन कोटेशन पत्र दिलेले आहे ते बंद स्थितीत असुन जास्तीत जास्त तुलनात्मक दर मिळण्याचे दृष्टिने ते हि विचारात घ्यावे असे नम्र मत आहे.

| अ.नं. | पुरवठा धारकाचे नाव | प्राप्त दिनांक | प्राप्त स्थिती |
|---|---|---|---|
| १ | मे.व्यंकटेश फर्निशींग,राहाता | २०/०८/२०१२ | बंद स्थितीत |
| २ | मे.रामपुरवाला,अहमदनगर | २०/०८/२०१२ | बंद स्थितीत |
| ३ | मे.विष्णु कुशन मेकर,नाशिक | २०/०८/२०१२ | बंद स्थितीत |
| ४ | मे.ॲडव्हेंचर मॅट्रेसेस,अहमदनगर | २२/०८/२०१२ | बंद स्थितीत |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले ०४ कोटेशन आजचे सभेपुढे उघडण्यात येऊन कोटेशनधारकांना चर्चा/वाटाघाटीसाठी समक्ष बोलविण्यात आले होते. त्यापैकी मे.ॲडव्हेंचर मॅट्रेसेस,

अहमदनगर हे एकमेव कोटेशनधारक चर्चा/वाटाघाटीसाठी उपस्थित होते. त्यांनी देवू केलेली सुट व अनुपस्थित कोटेशनधारकांचे मुळ दर घेऊन खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ. न. | तपशील | किंमत प्रति नग सर्व करांसह रु. | एकुण रक्कम रु. | चर्चा/ वाटाघाटी नंतरचे दर | चर्चा/ वाटाघाटी नंतरचे एकुण रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|
| १ | मे.व्यंकटेश फर्निशींग, राहाता | १७८५.०० | ४१०४०.०० | १७८५.०० | ४१०५५.०० |
| २ | मे.रामपुरवाला, अहमदनगर | २१४५.०० | ४९३३५.०० | २१४५.०० | ४९३३५.०० |
| ३ | मे.विष्णु कुशन मेकर, नाशिक | २०६०.०० | ४७३८०.०० | २०६०.०० | ४७३८०.००० |
| ४ | मे.ॲडव्हेंचर मॅट्रेसेस, अहमदनगर (३२ Density) | २०३७.०० | ४६८४५.०० | <u>१७००.००</u> | <u>३९१००.००</u> |
| | | | | एकुण- | ३९१००.०० |

निर्णय क्र.९७१ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील वार्ड/ओ.टी मधील सोफ्यांची दुरुस्ती करणेकामी मे.ॲडव्हेंचर मॅट्रेसेस, अहमदनगर यांचे निम्नतम दर प्रति नग रु. १७००/- (३२ Density) प्रमाणे एकूण २३ नग सोफ्यांची दुरुस्तीसाठी येणाऱ्या एकूण रु. ३९,१००/- चे खर्चास व कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

विषय नं.२० **श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी.एस ओ.टी न.०२ करीता कार्डीयाक इन्स्ट्रूमेंट खरेदी कामी प्राप्त झालेल्या निविदा उघडणे बाबत. (रु.१६,४६,६९४/-)**

प्रस्ताव- **अ-** श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी.एस. ऑपरेशन थिएटर नं. २ विभागाने दि.१४/१२/२०११ रोजीचे मागणीपत्रकान्वये खालील इन्स्ट्रुमेंटची मागणी केलेली होती.

| Sr. No. | Name of Item | Make | Qty. | App. Rate per in Rs. | App.Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Stream line micro Scissors - L-180mm 45$^0$ Round Handle Blade 10mm | Scanlan | 2 | 114229.50 | 228459.00 |
| 2 | Jacobson Micro Scissor- L-210mm Ang Sharp fine 45$^0$ Round | Scanlan | 4 | 104527.50 | 418110.00 |
| 3 | Jameson Prestige Scissor - Super cut curved L-180mm | Scanlan | 1 | 61215.00 | 61215.00 |
| | | | **Total Amt. in Rs.** | | **707784.00** |

**ब-** तसेच दि.०१/०२/२०१२ रोजीचे मागणी पत्रकान्वये खालील इन्स्ट्रुमेंटची मागणी केलेली होती.

| Sr. No. | Name of Item | Qty. | App. Rate per in Rs. | App.Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | Forward Spring Pot Long | 02 | 51450.00 | 102900.00 |
| | Forward Spring Pot Small | 01 | 45675.00 | 45675.00 |
| 2 | Backward Spring Pot Long | 03 | 60165.00 | 180495.00 |
| | Backward Spring Pot Small | 01 | 56490.00 | 56490.00 |
| 3 | Ring Tip 6/0 | 01 | 27825.00 | 27825.00 |
| 4 | Ring Tip 7/0 Long | 02 | 30975.00 | 61950.00 |
| | Ring Tip 7/0 Small (Regular) | 02 | 29400.00 | 58800.00 |
| 5 | Needle Holder 6/0 Long & Heavy | 04 | 42735.00 | 170940.00 |
| 6 | Needle Holder 7/0 Long | 03 | 42735.00 | 128205.00 |
| | Needle Holder 7/0 Small (Regular) | 01 | 41160.00 | 41160.00 |
| 7 | Gerald Forceps Long | 03 | 9240.00 | 27720.00 |
| | Gerald Forceps Small | 01 | 11550.00 | 11550.00 |
| 8 | Vascular Scissor (Silver End or Black End) | 02 | 12600.00 | 25200.00 |
| | | | **Total Amt. in Rs.** | **938910.00** |

उपरोक्त प्रस्ताव अ मधील इन्स्ट्रुमेंटकरीता मा. व्यवस्थापन समिती सभा दि.०६/०४/२०१२ रोजीचे सभेत निर्णय क्र.२९३ अन्वये विहित पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.७,०७,७८४/- चे खर्चास तसेच प्रस्ताव ब मधील इन्स्ट्रुमेंटकरीता मा. व्यवस्थापन

समिती सभा दि.१२/०६/२०१२ रोजीचे सभेत विहित पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.९,३८,९१०/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

सदरच्या खरेदीची रक्कम जास्त असल्याने जास्तीत जास्त प्रतिसाद मिळणेकामी सदरची जाहिरात महाराष्ट्र टाईम्स - मुंबई, पुणे नाशिक व औरंगाबाद या वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्यात आली होती, तसेच संस्थानचे संकेत स्थळावर देखील निविदा टाकण्यात आली होती. निविदा विक्रीची मुदत दि. २०/०८/२०१२ ते ३०/०८/२०१२ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकरण्याची अंतिम मुदत दि. ०५/०९/२०१२ अखेर ठेवण्यात आली होती. तसेच एकूण १२ उत्पादक कंपन्या/ पुरवठा धारक यांना इकडील पत्र क्र.२५६७ दि.१७/०८/२०१२ अन्वये जाहिराती बाबत अवगत करणेकामी पत्र पाठविण्यात आले होते.

त्यास अनुसरुन मुंबई कार्यालयात ०५ निविदा तर शिर्डी येथील कार्यालयात ०१ निविदा प्राप्त झालेली होती अशा एकूण ०५ निविदा प्राप्त झालेल्या होत्या. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे -

| Sr.No. | Name of Tenderer | Received Date |
|---|---|---|
| 1 | Zenith Surgical Co., Mumbai. | 05/09/2012 |
| 2 | Hansraj Nayar Medical India, Mumbai | 05/09/2012 |
| 3 | Esbee Dynamed Pvt. Ltd., Mumbai. | 05/09/2012 |
| 4 | Kalelkar Surgicals Industries, Mumbai. | 05/09/2012 |
| 5 | Biomedicon Systems(I) Pvt. Ltd., Mumbai | 05/09/2012 |
| 6 | Austin Healthcare, Pune | 05/09/2012 |

तरी वरीलप्रमाणे प्राप्त ०६ सिलबंद निविदा आजचे सभेपुढे समक्ष उघडून मिळावेत ही विनंती.

निर्णय क्र.९७२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी.एस ओ.टी न.०२ करीता कार्डीयाक इन्स्ट्रुमेंट खरेदी कामी प्राप्त झालेल्या ०६ निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन, त्यावर सदरचे इन्स्टुमेंट वापरणारे तज्ञ डॉक्टरांचा अभिप्राय घेण्यात यावा व निविदाधारकांना पुढील सभेपुढे चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

विषय नं.२१ **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील कर्मचाऱ्यांकरीता गणवेष खरेदीबाबतचे प्राप्त कोटेशन उघडून मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील रुग्णालयातील सर्व कर्मचाऱ्यांना सन २०१० मध्ये गणवेष वापरण्यासाठी देण्यात आले होते परंतु सदरचे गणवेष रोजच्या वापरामुळे वापरुन फाटलेले/खराब झालेले आहेत त्यामुळे साईनाथ रुग्णालयाने दि.२१/०१/२०१२ अन्वये गणवेषाची मागणी केलेली आहे तसेच श्री साईबाबा रुग्णालयाने दि.२०/०३/२०१२ अन्वये गणवेषाची मागणी केली आहे. गणवेषाची रक्कम धरताना दोन वर्षापुर्वी खरेदी केलेल्या किंमतीवर २० % वाढ गृहीत धरुन ते केवळ हिशोबासाठी धरणेत आलेले आहे. प्रत्यक्षात निविदामध्ये प्राप्त होणारे दर हया पेक्षा वेगळे येण्याची शक्यता आहे.

उपरोक्तप्रमाणे दोन्ही रुग्णालयाच्या सर्व मेडीकल, पॅरामेडीकल, व इतर सर्व कर्मचाऱ्यांना गणवेष खरेदीकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.३,४४,५९४/-(रु.तीन लाख चव्वेचाळीस हजार पाचशे चौऱ्यान्नव मात्र) चे खर्चास मान्यता मिळालेली आहे. गतवर्षाचा अनुभव विचारात घेता प्रत्यक्षात होणारा खर्च त्यापेक्षा कमी किंवा जास्त होऊ शकतो.

उपरोक्तप्रमाणे गणवेषाची खरेदी ही विहीत पध्दतीने कोटेशन मागवुन खरेदी करण्याच्या प्रस्तावास मा.त्रिसस्य समिती सभा दि.१८/०७/२०१२ चे सभेत मंजुरी मिळाली असुन त्याप्रमाणे इकडील पत्र क्र.२४६० दि.१४/०८/२०१२ अन्वये एकुण १५ पुरवठा धारकांना कोटेशन पत्र पाठविण्यात आले होते. कोटेशन स्विकारणेची अंतिम तारीख ३१/०८/२०१२ अखेर होती त्यास अनुसरुन खालीलप्रमाणे एकुण ६ पुरवठाधारकांचे कोटेशन व नमुने प्राप्त झालेले आहेत त्यापैकी अ.नं.१ यांचेच कोटेशन व नमुने वेळेत आले आहे. व अ.नं.२ ते ६ हे यांचे कोटेशन व नमुने हे उशिरा प्राप्त झाले आहे. सर्वच कोटेशन हे बंद स्थितीत आहे. परंतु जास्तीत जास्त तुलनात्मक दर मिळण्याचे दृष्टिने ते हि विचारात घ्यावे असे नम्र मत आहे.

| अ.नं. | पुरवठा धारकाचे नाव | प्राप्त दिनांक | प्राप्त स्थिती |
|---|---|---|---|
| १ | मे.रिशी एंटरप्रायजेस,नाशिक | २५/०८/२०१२ | बंद स्थितीत |
| २ | मे.केसीएम इंटरनॅशनल,जयपुर | ०५/०९/२०१२ | बंद स्थितीत |
| ३ | मे.जयहिंद कलेक्शन,अहमदनगर | ०६/०९/२०१२ | बंद स्थितीत |
| ४ | मे.दामिनी,राहुरी | १२/०९/२०१२ | बंद स्थितीत |
| ५ | मे.तुलसी एम्पोरीयम,सोनई | १२/०९/२०१२ | बंद स्थितीत |
| ६ | मे.निकीता डिस्ट्रिब्युटर्स,औरंगाबाद | १३/०९/२०१२ | बंद स्थितीत |

तरी उपरोक्तप्रमाणे सहा सिलबंद कोटेशन हे आजचे सभेपुढे समक्ष उघडुन मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.९७३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील कर्मचाऱ्यांकरीता गणवेष खरेदीकामी प्राप्त झालेले ०६ कोटेशन्स आजचे सभेपुढे समक्ष उघडण्यात आले, त्यांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन तो पुढील सभेपुढे सादर करण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२२** **श्री साईनाथ रुग्णालयाकरीता फोम गादया खरेदीकामी प्राप्त झालेले कोटेशन उघडून चर्चा/वाटाघाटी करुन निर्णय घेणेबाबत. (रु.३६,०००/-)**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालयातील चिल्ड्रन वॉर्डमध्ये एकुण २० खाटांची संख्या आहे. सदर वॉर्डसाठी दिनांक ०५/०१/२००५ मध्ये एकुण १२ फोम गादया खरेदी केल्या होत्या सदरच्या गादया सध्या वापरात आहे परंतु त्या वापरुन खुप प्रमाणात फाटलेल्या असल्याने तसेच सदर लिनन विभागात फोमच्या गादया शिल्लक नसल्याने त्यांनी डि.पी.नं.२५१५ दि.०१/०३/२०१२ अन्वये २० नग फोमच्या गादयांची मागणी केली आहे. सदर गादयांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | तपशील | आवश्यक नग | साईज |
|---|---|---|---|
| १ | फोम गादी | २० नग | लांबी ५३ इंच(१३६ सें.मी.) |
| | | | रुंदी ३४ इंच(३६ सेंमी.) x २ इंच |

उपरोक्तप्रमाणे साधारणतः एक नग गादी खरेदीकरीता अंदाजे रु.१८००/-प्रती नग प्रमाणे २० नग गादयांकरीता अंदाजे रु.३६०००/- चे खर्चास विहीत पध्दतीने कोटेशन मागवुन खरेदी करण्यास मा.त्रिसदस्य समिती सभा दि.१८/०७/२०१२ चे सभेत मान्यता मिळालेली आहे त्यानुसार सदर गादया विहीत पध्दतीने खरेदी करणेकामी इकडील पत्र क्र.२४५९ दि.१४/०८/२०१२ अन्वये एकुण १६ पुरवठाधारकांकडुन दि.३१/०८/२०१२ अखेर कोटेशन मागविणेत आले होते त्यापैकी एकुण सहा बंद कोटेशन प्राप्त झालेले आहेत. त्यापैकी अ.नं.१ व २ यांचे कोटेशन वेळेत प्राप्त झालेले आहे. अ.नं. ३ ते ६ हे कोटेशन उशिरा प्राप्त झालेले आहे व सर्वच कोटेशन हे बंद स्थितीत आहे तेव्हा जास्तीत जास्त तुलनात्मक दर मिळण्याचे दृष्टिने ते हि विचारात घ्यावे असे नम्र मत आहे.

| अ.नं. | पुरवठा धारकाचे नाव | प्राप्त दिनांक | प्राप्त स्थिती |
|---|---|---|---|
| १ | मे.मेट्रो मेटल इंडस्ट्रिज,औरंगाबाद | २८/०८/२०१२ | बंद स्थितीत |
| २ | मे.आकाश फर्निशींग,अहमदनगर | २७/०८/२०१२ | बंद स्थितीत |
| ३ | मे.क्वाली सर्ज,पुणे | ०१/०९/२०१२ | बंद स्थितीत |
| ४ | मे.कॉन्टॅक कंफोर्ट,अहमदनगर | ०६/०९/२०१२ | बंद स्थितीत |
| ५ | मे.प्रगती कुशन,राहाता | ०१/०९/२०१२ | बंद स्थितीत |
| ६ | मे.व्यंकटेश फर्निशींग,राहाता | ०१/०९/२०१२ | बंद स्थितीत |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले ०४ कोटेशन आजचे सभेपुढे उघडण्यात येऊन कोटेशनधारकांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते. त्यापैकी मे.अ‍ॅडव्हेंचर मॅट्रेसेस, अहमदनगर हे एकमेव कोटेशनधारक चर्चा/वाटाघाटीसाठी उपस्थित होते. त्यांनी देवू केलेली सुट व अनुपस्थित कोटेशनधारकांचे मुळ दर घेऊन खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | तपशिल | किंमत प्रति नग सर्व करांसह रु. | एकूण रक्कम रु. | चर्चा/वाटाघाटी नंतरचे दर | चर्चा/वाटाघाटी नंतरचे एकूण रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|
| १ | मे.मेट्रो मेटल इंडस्ट्रिज, औरंगाबाद | २१९३.७५ | ४३८७५.०० | २१९३.७५ | ४३८७५.०० |
| २ | मे.आकाश फर्निशींग, अहमद-नगर (Density Foam ४०) | १७५०.०० | ३५०००.०० | <u>१२५०.००</u> | <u>२५०००.००</u> |
| ३ | मे.क्वाली सर्ज,पुणे | २६४३.७५ | ५२८७५.०० | २६४३.७५ | ५२८७५.०० |
| ४ | मे.कॉर्टॅक कंफोर्ट, अहमदनगर (Density ३२) | २५४०.०० | ५०८००.०० | २५४०.०० | ५०८००.०० |
| | (Density ४०) | २७८४.०० | ५५६८०.०० | २७८४.०० | ५५६८०.०० |
| ५ | मे.प्रगती कुशन, राहाता | १५६५.०० | ३१३००.०० | १५६५.०० | ३१३००.०० |
| ६ | मे.व्यंकटेश फर्निशींग, राहाता | १४०५.०० | २८१००.०० | १४०५.०० | २८१००.०० |

निर्णय क्र.९७४ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयाकरीता फोम गादया खरेदीकामी मे.आकाश फर्निशींग, अहमदनगर यांचे निम्नतम दर प्रति नग रु. १२५०/- (Density Foam ४०) प्रमाणे एकूण २० नग फोम गादया खरेदीसाठी येणाऱ्या एकूण रु. २५००० /- चे खर्चास मान्यता देण्यात देऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

विषय नं.२३ **श्री साईबाबा रुग्णालयातील न्युरो ऑपरेशन थिएटर विभागासाठी Lead Apron Stand खरेदीकामी प्राप्त कोटेशन उघडून चर्चा / वाटाघाटी करुन निर्णय घेणेबाबत. (रु.३२,६२५/-)**

प्रस्ताव- श्री साईबाबा रुग्णालयातील न्युरो ऑपरेशन थिएटर विभागाने दि.०९/०१/२०१२ चे मागणी पत्रान्वये एक नग Lead Apron Stand ची मागणी केलेली आहे. सध्या त्यांचेकडे लेड अॅप्रॉन ठेवण्यासाठी Lead Apron Stand नाही त्यामुळे त्यांनी नविन Lead Apron Stand ची मागणी केलेली आहे.

सदर Lead Apron Stand खरेदीकामी अंदाजे खर्चासाठी मे.अनिता मेडीकल सिस्टीम प्रा.लि.,मुंबई यांचेकडून दूरध्वनीद्वारे दरपत्रक मागविले असता त्यांनी त्यांचे ई-मेल पत्र क्र.AMS:Q: ५१६:२०११-१२ दि.३०/०१/२०१२ अन्वये किरण कंपनीच्या ११ मॉडेलच्या Lead Apron Stand चे दरपत्रक पाठविलेले आहे. सदर दरपत्रक वापरणारे संबंधीत न्युरो सर्जन डॉ. मोदगी यांना दाखविले असता त्यांनी खालील मॉडेल घेण्याची शिफारस केलेली आहे.

त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr. No. | Description | Make | Qty. | Rate per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Mobile Storage Rack with 10 Hangers | Kiran | 1 | 32625.00 | 32625.00 |
| | | | | **Total Amt. in Rs.** | **32625.00** |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त दरानुसार एक नग Lead Apron Stand खरेदीकामी अंदाजे रु.३२,६२५/- इतका खर्च अपेक्षित आहे.

दि. ०६/०४/२०१२ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्र. २९८ अन्वये उपरोक्त Lead Apron stand विहीत पध्दतीने कोटेशन मागवुन खरेदीस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु. ३२६२५/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार इकडील पत्र क्र. २१०१ दि. २३/०७/२०१२ अन्वये एकुण ०५ अधिकृत विक्रेते / पुरवठाधारक यांचेकडुन दि. ०१/०८/२०१२ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते. त्यापैकी मे तिरुपती एन्टरप्रायजेस, पुणे यांनी दि. १६/०८/२०१२ चेइ ई- मेल पत्रान्वये सदर Lead Apron stand बनवत नसलेबाबत कळविले आहेत. सदर कोटेशन मागणी पत्रास अनुसरुन आणखी दोन कोटेशन प्राप्त झालेले आहेत.

१.) अनिता मेडीकल सिस्टिम प्रा. लि., मुंबई (सिलबंद कोटेशन प्राप्त दि. ०२/०८/२०१२)

२.) निर्मल एजन्सीज, अहमदनगर (फॅक्स कोटेशन प्राप्त दि. ०५/०९/२०१२)

तरी वरीलप्रमाणे दोन्ही कोटेशन हे मुदतीनंतर प्राप्त झालेले आहेत. त्यापैकी अ.नं. २ यांचे कोटेशन फॅक्सद्वारे प्राप्त झालेले आहेत. तर अ.नं. १ यांचे सीलबंद कोटेशन आहे.

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेले ०२ कोटेशन आजचे सभेत उघडण्यात येऊन कोटेशन सादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता दोन्हीही कोटेशनधारक सभेपुढे उपस्थित नव्हते. त्यांचे कोटेशनमधील प्राप्त दरांचा तपशील खालीलप्रमाणे-

| Sr. No. | Description | Anita Medical Systems Pvt. Ltd., Mumbai | | | | Nirmal Agencies, Ahmednagar | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Make / Model | Rate Per in Rs. | Rate After Nego-tiation | Total Amt. in Rs. | Make / Model | Rate Per in Rs. | Rate After Nego-tiation | Total Amt. in Rs. |
| 1 | Mobile Storage Rack with 10 Hangers | Kiran | 32063.00 | Absent | 32063.00 | Kiran | 47812.00 | Absent | 47812.00 |
| | Total Amt. in Rs. | | | | 32063.00 | | | | 47812.00 |

**निर्णय क्र.९७५ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील न्युरो ऑपरेशन थिएटर विभागासाठी Lead Apron Stand खरेदीकामी दोन्ही कोटेशनधारक चर्चा/ वाटाघाटीसाठी उपस्थित नसल्यामुळे मे. अनिता मेडीकल सिस्टीम प्रा. लि., मुंबई यांचे कोटेशनमधील प्रती नग रु.३२,०६३/- मात्र हे निम्नत्तम दर स्विकारण्यात येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

विषय नं.२४ श्री साईबाबा रुग्णालयातील जनरल ऑपरेशन थिएटर विभागाकरीता **Patient Warmer खरेदीकामी प्राप्त कोटेशन उघडून चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय घेणेबाबत. (रु.१,५१,८७५/-)**

प्रस्ताव- श्री साईबाबा रुग्णालयात जनरल ऑपरेशन थिएटर विभागाने दि.१८/०१/२०१२ रोजीचे मागणी पत्रकान्वये दोन नग Patient Warmer ची मागणी केलेली आहे. सध्या त्यांचेकडे एक Warmer असून त्यांना रिकव्हरी रुमकरीता आणखी एक नग Patient Warmer ची आवश्यकता आहे. शस्त्रक्रिया झालेनंतर किंवा शस्त्रक्रिया चालु असताना रुग्णास देण्यात येत असलेल्या इंजेक्शन किंवा सलाईनमुळे अथवा इतर कारणास्तव थंडी वाजून आल्यानंतर त्वरीत सदर मशिनव्दारे गरम हवा देऊन रुग्णास आराम मिळू शकतो.

सदर एक नग Patient Warmer विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणा-या अंदाजे खर्च रु.१,५१,८७५/- चे खर्चास दि.०६/०४/२०१२ रोजीचे मा. त्रीसदस्य समितीचे सभेत निर्णय क्र. २९४ अन्वये मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार इकडील पत्र क्र.२१०५ दि.२३/०७/२०१२ अन्वये एकुण ०६अधिकृत विक्रेते/ पुरवठा धारक यांचेकडून दि.०९/०८/२०१२ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते. त्यास अनुसरुन खालीलप्रमाणे ०३ कोटेशन प्राप्त झालेले आहेत-

१) M/s. B.L. Lifesciences Pvt. Ltd., Pune (E-mail letter dt.१०/०८/२०१२)
२) M/s. Prabha Surgicals, Navi Mumbai (बंद कोटेशन प्राप्त दि.१३/०८/२०१२)
३) M/s. Hansraj Nayyar Medical India, Mumbai (बंद कोटेशन प्राप्त दि.१३/०८/२०१२)

वरीलप्रमाणे दोन बंद कोटेशन व एक ई-मेल कोटेशन मुदतीनंतर प्राप्त झालेले आहे, परंतु तीनही कोटेशन तुलनात्मक दरांचे दृष्टीने विचारात घ्यावे असे नम्र मत आहे. तसेच श्री साईबाबा रुग्णालयाचे G.I.C.U. विभागासाठी देखील एक नग Patient Warmer जनरल ओ.टी. चे खरेदीमध्ये एक नग संख्या वाढवून चर्चा/ वाटाघाटी करणेस मा. त्रीसदस्य समिती सभा दि.१५/०९/२०१२ रोजीचे सभेत मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार एकुण दोन नगासाठी चर्चा / वाटाघाटी करुन निर्णय घेता येईल.

तरी वरीलप्रमाणे अ.नं.२ व ३ यांचे प्राप्त बंद कोटेशन आहेत. प्राप्त दोन सिलबंद कोटेशन आजचे सभेपुढे समक्ष उघडून तीनही कोटेशनधारकांना आजचे सभेपुढे चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविण्यात आलेले होते, त्यापैकी M/s. B.L. Lifesciences Pvt. Ltd., Pune व M/s. Hansraj Nayyar Medical India, Mumbai हे चर्चा/ वाटाघाटीसाठी उपस्थित होते, त्यांनी चर्चा/ वाटाघाटीअंती खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| Sr. no. | Description | M/s. B.L. Lifesciences Pvt. Ltd., Pune | | | M/s. Prabha Surgicals, Navi Mumbai | | | M/s. Hansraj Nayyar Medical India, Mumbai | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Make / Model | Rate Per in Rs. | Rate After Negotiation | Make / Model | Rate Per in Rs. | Rate After Negotiation | Make / Model | Rate Per in Rs. | Rate After Negotiation |
| 1 | Patient Warmer with Blanket | Bair Hagger | 90000.00 | 86000.00 | Covidien Model - 5800 | 135000.00 | Absent | Smith Medical Eq. 5000 + Blanket 50 Nos Free | 140000.00 | 120000.00 |
| | | | | 5 Blanket Free of cost per unit App.Worth Rs. 15x840 & Billing from Delhi | Blanket Cost Extra | 900.00 | | | | 50 Blanket Free of cost App Worth Rs. 50x950 |

**निर्णय क्र.९७६ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील जनरल ऑपरेशन थिएटर व जी.आय.सी.यु. या विभागांसाठी प्रत्येकी एक नग याप्रमाणे दोन नग Patient Warmer मे. बी.एल. लाईफसायन्स, पुणे यांचे प्रती नग रु. ८६०००/-, याप्रमाणे दोन नगांसाठी एकुण रक्कम रु.१,७२,०००/- + १० नग Blanket मोफत हे निम्नतम दर स्विकारण्यात येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

विषय नं.२५ श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील वॉर्ड/विभागाकरीता **S/S Cupboard खरेदी करणेबाबत. (रु.४३,६९२/-)**

प्रस्ताव- श्री साईबाबा रुग्णालयातील सेमी- २ व डायलेसीस विभागाने दि.१८/०७/२०१२ रोजीचे मागणीपत्रकान्वये प्रत्येकी एक नग S/S Cupboard ची मागणी केलेली आहे, तसेच श्री साईनाथ

रुग्णालयातील Surgery No.२ या वॉर्डने देखील दि.२१/०७/२०१२ रोजीचे डी.पी. अन्वये एक नग S/S Cupboard ची मागणी केलेली आहे, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ. नं. | मागणी | विभागाचे नाव | डी.पी.क्र. व दिनांक | संख्या | मागणीचे कारण | अंदाजे दर प्रती नग रु. | एकुण अंदाज रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | S/S Cup-board | Saibaba Hosp. Semi - II | १८/०७/२०१२ | ०१ | जुने कपाट खराब झाल्यामुळे औषधे व लिनन ठेवण्यासाठी नविन मागणी | १४५६४.०० | १४५६४.०० |
| | | Saibaba Hosp. Dialysis Dept. | १८/०७/२०१२ | ०१ | | १४५६४.०० | १४५६४.०० |
| | | Sainath Hosp. Surgery No.2 | १२०८-२१/०७/२०१२ | ०१ | | १४५६४.०० | १४५६४.०० |
| | | | | | | **एकुण रु.** | **४३,६९२.००** |

वरीलप्रमाणे फर्नीचर खरेदीकामी अंदाजे रु.४३,६९२/- इतका खर्च अपेक्षित आहे. श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वॉर्ड / विभागाकरीता हॉस्पिटल व ऑफीस फर्नीचर विहित पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागवून खरेदीकामीचा अंदाजे रक्कम रु.८,३०,४६४/- चा प्रस्ताव दि.०६/०४/२०१२ रोजीचे मा. त्रीसदस्य समितीचे सभेपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात आलेला होता. सदर प्रस्तावास निर्णय क्र.३११ अन्वये मान्यता मिळालेली असून त्यानुसार याकामी वर्तमान पत्रात जाहिरात देऊन दि.०५/०९/२०१२ अखेर निविदा मागविण्यात आलेल्या असून सदर निविदा उघडून पुढील निर्णय घेण्याबाबतची कार्यवाही चालु आहे. तेंव्हा सदरचे खरेदीमध्ये वरीलप्रमाणे लागणारे S/S Cupboard ची संख्या ३ नग वाढवून चर्चा / वाटाघाटी करुन खरेदी करता येईल.

तरी उपरोक्तप्रमाणे S/S Cupboard ची ३ नग संख्या वाढवून चर्चा / वाटाघाटीनंतरचे मंजुर दराने खरेदीस मान्यता असावी.

**निर्णय क्र.९७७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त विषय क्र.१७ मधील फर्निचर खरेदीमध्ये S/S Cupboard खरेदी करणेसाठी कोटेशन मागविणेत आलेले आहेत. सदर कोटेशनधारकांकडून श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील वॉर्ड/विभागाकरीता आवश्यक असलेले ०३ नग S/S Cupboard खरेदी करणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२६** **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये राजीव गांधी आरोग्य योजनेकामी इंटरनेट सुविधेकामी लागणारे हार्डवेअर संबंधी प्राप्त कोटेशन उघडून संबंधीत पुरवठाधारकांशी** दराबाबत **चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय घेणेबाबत. (रु.६,५०,०००/-)**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रूग्णालयामध्ये शासनाची राजीव गांधी आरोग्य योजनेकामी १० MBPS इंटरनेट लीज लाईन BSNL या कंपनी कडुन घेणेकामी दि.१५/०९/२०१२ रोजीचे मा. त्रिसदस्यीय सभेत मान्यता मिळाली आहे. तसेच याकामी लागणारे हार्डवेअर संस्थानचे विहीत पध्दतीनुसार कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रूपये ६,५०,०००/- +टॅक्स (अक्षरी रूपये सहा लाख पंन्नास हजार +टॅक्स मात्र) चे खर्चास नुसार दि.२५/०८/२०१२ रोजीचे मा. त्रिसदस्यीय सभेत मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार दि.०१/१०/२०१२ रोजीचे मंजुर टिपणी नुसार राजीव गांधी आरोग्य योजनेकामी इंटरनेट सुविधेकामी लागणारे हार्डवेअर संबधी साहित्याचा तपशिल संस्थानचे वेब साईटवरती प्रसिध्द करण्यात आला होता. त्यानुसार एकुण ०७ पुरवठाधारकांचे कोटेशन प्राप्त झाले असून त्यांचा तपशील खालील प्रमाणे-

१) Hindusthan Enermax, Nashik (कोटेशन प्राप्त दि- १५/१०/२०१२)
२) OSM Infotech, Pune (कोटेशन प्राप्त दि- १५/१०/२०१२)
३) Racca Infotech Pvt.Ltd., Nashik (कोटेशन प्राप्त दि- १५/१०/२०१२)
४) Minitech System (I) Pvt.Ltd. Nashik (कोटेशन प्राप्त दि- १५/१०/२०१२)
५) Pandhare Engg.Nashik (कोटेशन प्राप्त दि- १५/१०/२०१२)
६) Sanveer Infotech Pvt.Ltd., Pune (कोटेशन प्राप्त दि- १५/१०/२०१२)
७) Hi-tech Computer Services (N) Pvt.Ltd,Nashik (कोटेशन प्राप्त दि- १५/१०/२०१२)

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेले ०७ सिलबंद कोटेशन आजचे सभेत उघडण्यात येऊन कोटेशन सादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ. नं. | कोटेशन सादरकर्त्याचे नांव / पत्ता | कोटेशनमधील दर रु. | चर्चा/ वाटाघाटीनंतर देऊ केलेले दर |
|---|---|---|---|
| ०१ | Hindusthan Enermax, Nashik | १४,००,०००/- | अनुपस्थित |
| ०२ | OSM Infotech, Pune | ७,८९,९००/- | ७,८९,९००/- |
| ०३ | Racca Infotech Pvt.Ltd., Nashik | १४,३०,१५३/- | ११,५०,०००/- |
| ०४ | Minitech System (I) Pvt.Ltd. Nashik | १५,११,७८५/- | १४,८१,५४९/- |
| ०५ | Pandhare Engg.Nashik | १३,७५,०००/- | अनुपस्थित |
| ०६ | Sanveer Infotech Pvt.Ltd., Pune | १६,६७,०३०/- | १३,७५,०००/- |
| ०७ | Hi-tech Computer Services (N) Pvt.Ltd, Nashik | १४,६५,९१६/- | १३,९०,०००/- |

निर्णय क्र.९७८ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये गांधी आरोग्य योजनेकामी इंटरनेट सुविधेकामी लागणारे हार्डवेअर खरेदी करणेसाठी मे.ओएसएम इन्फोटेक, पुणे यांचे रु.७,८९,९००/- मात्र निम्नतम दर स्विकारण्यात येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**विषय नं.२७** **श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी.एस ओ.टी न.०१ करीता Heater Cooler मशिनसाठी Warmer Blanket खरेदीकामी चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय घेणेबाबत. (रु.४४,०१४/-)**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी.एस. ओ.टी. नं १ विभागात Heater Cooler मशिन सन २००५ मध्ये खरेदी करण्यात आलेली असून त्यावर रुग्णाचे ऑपरेशन चालू असतांना रुग्णाच्या शरीरातील तापमान कमी झाल्यावर त्यांचे तापमान वाढवणेसाठी उपरोक्त Blanket वापरण्यात येते. सध्या त्यांच्याकडे असलेले Heater Cooler मशिनसाठी लागणारे Blanket हे सन २००९ मध्ये खरेदी केलेले असून सध्या ते वापरुन लीक (Puncture) झालेले असल्यामुळे त्यांनी दि.०७/०५/२०१२ चे मागणीपत्रान्वये एक नग Warmer Blanket ची मागणी केलेली आहे.

सदर Heater Cooler मशिन हे Maquet कंपनीचे असल्यामुळे सदर मशिनकरिता Maquet कंपनीचेच Blanket खरेदी करावे लागणार आहे. त्यामुळे सदरचे Blanket खरेदीकामी M/s. Maquet Medical India Pvt.Ltd., Mumbai. यांचेकडून दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यानुसार M/s. Maquet Medical India Pvt.Ltd., Mumbai. यांनी पत्र क्र.MCC-WR/AWB१२-०८ दि.१५/०५/२०१२ चे पत्रान्वये सदर Warmar Blanket चे दर कळविलेले आहे.

त्याचा तपशिल खालीलप्रमाणे -

| Sr. no. | Description | Qty. | Rate Per in Rs | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|
| १ | Warmer Blanket | १ | ४४०१४.०० | ४४०१४.०० |
| **Total Amt. in Rs.** | | | | **४४०१४.००** |

उपरोक्त १ नग Heater Cooler मशिनसाठी लागणारे Blanket खरेदीकामी अंदाजे रु.४४०१४/- इतका खर्च अपेक्षित आहे.

सदर १ नग Blanket हे M/s. Maquet Medical India Pvt.Ltd., Mumbai यांचेकडुनच खरेदी करावे लागणार असल्यामुळे त्यांचेकडुन दरात अजुन सुट मिळणेकामी त्यांना मा. त्रीसदस्य समिती सभेपुढे समक्ष बोलावून चर्चा / वाटाघाटी करुन अंतीम निर्णय घेता येईल.

M/s. Maquet Medical India Pvt.Ltd., Mumbai यांनी दि.०७.१२.२०१२ रोजीचे ई-मेलव्दारे खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ. नं. | दरपत्रकधारकाचे नांव / पत्ता | दरपत्रकातील दर प्र.नग रु. | चर्चा/ वाटाघाटीनंतर देऊ केलेले दर प्र.नग रु. |
|---|---|---|---|
| ०१ | M/s. Maquet Medical India Pvt. Ltd., Mumbai | ४४,०१५/- | मुळ दरावर ५% सुट (रु. ४१,८१४.२५) |

निर्णय क्र.९७९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी.एस ओ.टी न.०१ करीता Heater Cooler मशिनसाठी Warmer Blanket खरेदीकामी मे.मॅक्वेट मेडीकल इंडिया प्रा.लि.मुंबई हे चर्चा/वाटाघाटीचे वेळी अनुपस्थित होते. परंतु त्यांनी दि. ०७/१२/२०१२ रोजीचे ई-मेल पत्रान्वये मुळ दरावर ५ % सुट देऊ केलेली आहे. याचा विचार करता त्यांचे दर प्रती नग**

**रु. ४१,८१४.२५** मात्र होतात. हे निम्नतम दर स्विकारुन त्यांना **कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.**
(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२८** **श्री साईबाबा रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागाकरीता Fully Automatic Biochemistry Analyser Machine खरेदीकामी प्राप्त निविदा उघडून चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय घेणेबाबत. (रु.११,०६,७००/-)**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागाने दि.२७/०४/२०१२ रोजीचे मागणी पत्रान्वये १ नग Fully Automatic Biochemistry Analyser मशिनची मागणी केलेली आहे. कारण सध्या सदर विभागाकडे Biochemistry Analyser साठी एक मशिन उपलब्ध असून ते सन २००५ मध्ये खरेदी केलेले आहे. त्यावर दररोज सरासरी प्रत्येक तासाला २०० ते २५० तपासण्या कराव्या लागतात त्यामुळे सदर मशिनवर जास्त प्रमाणात बोजा पडत आहे तसेच सदर मशिन मध्ये काही कारणास्तव अचानक बिघाड झाल्यास सर्व तपासण्याचे काम बंद पडते व कामाची गैरसोय होते. त्यामुळे अजून एक मशिन घेतल्यास तपासण्या विभागून जातील व दैनंदिन तपासण्यांना वेळ लागणार नाही तसेच जुन्या मशिनवर कामाचा बोजा देखील पडणार नाही.

श्री साईनाथ प्रयोगशाळा विभागासाठी मे. ट्रान्साशिया बायोमेडीकल लि., मुंबई यांचेकडून इकडील पत्र क्र.२७६५ दि.०९/०९/२०११ अन्वये एक नग Fully Automatic Biochemistry Analyser मशिन रु.११,०६,७००/- इतक्या रक्कमेत खरेदी करण्यात आलेले आहे. तेंव्हा श्री साईबाबा रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागासाठी खरेदी करावयाचे मशिनसाठी देखील अंदाजे रु.११,०६,७००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

उपरोक्त Full Automatic Biochemistry Analyser Machine करिता त्रीसदस्य समिती सभा दि.२५/०८/२०१२ रोजीचे सभेत विहित पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.११०६७००/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

सदरच्या खरेदीची रक्कम जास्त असल्याने जास्तीत जास्त प्रतिसाद मिळणेकामी सदरची जाहिरात महाराष्ट्र टाईम्स - पुणे व सकाळ मुंबई या वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्यात आली होती, तसेच संस्थानचे संकेत स्थळावर देखील निविदा टाकण्यात आली होती. निविदा विक्रीची मुदत दि. २०/०९/२०१२ ते ०१/१०/२०१२ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकरण्याची अंतिम मुदत दि. ०८/१०/२०१२ अखेर ठेवण्यात आली होती. तसेच एकुण १५ उत्पादक कंपन्या / पुरवठा धारक यांना इकडील पत्र क्र.३०९९ दि.२०/०९/२०१२ अन्वये जाहिराती बाबत अवगत करणेकामी पत्र पाठविण्यात आले होते.

त्यास अनुसरुन मुंबई कार्यालयात ०३ निविदा तर शिर्डी येथील कार्यालयात ०२ निविदा प्राप्त झालेली होती अशा एकूण ०५ निविदा प्राप्त झालेल्या होत्या. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे -

| Sr.No. | Name of Tenderer | Received Date |
|---|---|---|
| १ | Anand Chemiceutics, Pune | ०३-१०-२०१२. |
| २ | Austin Health Care, Pune | ०३-१०-२०१२. |
| ३ | Ark Dignostics Pvt, Ltd., Mumbai | ०८-१०-२०१२ |
| ४ | Trivitran Health care Pvt, Ltd., Mumbai | ०३-१०-२०१२ |
| ५ | Transasia Bio- Medicals Pvt, Ltd., Mumbai | ०८-१०-२०१२ |

तरी वरीलप्रमाणे प्राप्त ०५ सिलबंद कोटेशन आजचे सभेत उघडण्यात येऊन कोटेशन सादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| Sr. No. | Name of Items | Anand Chemiceutics, Pune | | | Transasia Bio-Medicais Pvt. Ltd., Mumbai | | | Trivitron Health care Pvt.Ltd., Mumbai | | | Austin Health Care, Pune | | | Ark Dignostics Pvt. Ltd., Mumbai | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Make / Model | Rate Per in Rs. | Rate After Negotiation | Make / Model | Rate Per in Rs. | Rate After Negotiation | Make / Model | Rate Per in Rs. | Rate After Negotiation | Make / Model | Rate Per in Rs | Rate After Negotiation | Make / Model | Rate Per in Rs. | Rate After Negotiation |
प्रस्ताव- मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १४-०७-२०१२ चे सभेतील विषय नं. ७१ निर्णय क्र.५१७ अन्वये दर्शन लाईनमध्ये भक्तांसाठी एअर कुलर खरेदी करणेकामी रक्कम रुपये ४,५०,०००/- मात्र खर्चास व वर्तमानपत्रात जाहिरात देऊन टेंडर मागविणेस मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार टेंडर विक्रीसाठी दिनांक ११-०९-२०१२ रोजी दैनिक सामना या वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात आली होती. तसेच वेबसाईटवर अपलोड केल्याची तारीख ११-०९-२०१२अशी होती. वेबसाईटवर ही जाहिरात दि.१८-०९-२०१२ पर्यंत ठेवण्यात आली होती. टेंडरची विक्री दिनांक ११-०९-२०१२ ते दिनांक १७-०९-२०१२ अशी होती. टेंडर विकत घेणा-यांची यादी खालीलप्रमाणे.

| अ.नं. | टेंडर विकत घेणारे टेंडरधारकाचे नांव |
|---|---|
| ०१) | मे.कॅपसन रिसोर्सेस कॉर्पोरेशन,अहमदाबाद (गुजरात) |
| ०२) | प्रिमिअम मोल्डींग, दमण (गुजरात) |
| ०३) | मे.साई कार्पोरेशन, वापी (गुजरात) |

वरीलप्रमाणे एकुण तीन जणांनी टेडर विकत घेतले होते. टेडर सबमिशन तारीख दि.१८-०९-२०१२ अशी होती. त्यानुसार मुदतीत खालीलप्रमाणे सर्व तीन टेंडर प्राप्त झाले आहेत.

| अ.नं. | टेंडरधारकाचे नांव |
|---|---|
| ०१) | प्रिमिअम मोल्डींग, दमण (गुजरात) |
| ०२) | मे.साई कार्पोरेशन, वापी (गुजरात) |
| ०३) | मे.कॅपसन रिसोर्सेस कॉर्पोरेशन,अहमदाबाद (गुजरात) |

उपरोक्तप्रमाणे दर्शन लाईनमध्ये भक्तांसाठी एअर कुलर खरेदी करणेकामी प्राप्त झालेले ०३ टेंडर आजचे सभेत उघडण्यात येऊन टेंडरधारकांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ. नं. | टेंडरधारकाचे नांव/ पत्ता | टेंडर मधील दर | चर्चा/ वाटाघाटीनंतर देऊ केलेले दर |
|---|---|---|---|
| ०१) | मे.प्रिमिअम मोल्डींग, दमण (गुजरात) | ६,००,०००/- | ५,४७,०००/- |
| ०२) | मे.साई कार्पोरेशन, वापी (गुजरात) | ५,७६,०००/- | ५,४७,२००/- |
| ०३) | मे.कॅपसन रिसोर्सेस कॉर्पोरेशन, अहमदाबाद (गुजरात) | ४,५०,०००/- | ४,५०,०००/- |

निर्णय क्र.९९२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, दर्शन लाईनमध्ये भक्तांसाठी एअर कुलर खरेदीकामी मे.कॅपसन रिसोर्सेस कॉर्पोरेशन, अहमदाबाद (गुजरात) यांचे रु.४,५०,०००/- मात्र निम्नतम दर स्विकारण्यात येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

---

**विषय नं.४१** **कॅन्टीनमधील जुने बॉटलकुलर बायबॅक करुन नविन बॉटलकुलर खरेदी करणेकामी प्राप्त झालेली टेंडर्स, उघडून टेंडरधारकांशी चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय होणेबाबत. (रु.२,७४,८०१/-)**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १८-०७-२०१२ चे सभेतील विषय नं. ३६ निर्णय क्र.६०८ अन्वये कॅन्टीनमधील जुने बॉटलकुलर बायबॅक करुन नवीन बॉटलकुलर खरेदी करणेकामी रक्कम रुपये २,७४,८०१/- मात्र खर्चास व टेंडर मागविणेस मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार टेंडर विक्रीसाठी दिनांक ११-०९-२०१२ रोजी दैनिक सामना या वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात आली होती. तसेच वेबसाईटवर अपलोड केल्याची तारीख ११-०९-२०१२अशी होती. वेबसाईटवर ही जाहिरात दि.१८-०९-२०१२ पर्यंत ठेवण्यात आली होती. टेंडरची विक्री दिनांक ११-०९-२०१२ ते दि. १७-०९-२०१२ अशी होती. टेंडर विकत घेणा-यांची यादी खालीलप्रमाणे.

| अ.नं. | टेंडर विकत घेणारे टेंडरधारकाचे नांव | अ.नं. | टेंडर विकत घेणारे टेंडरधारकाचे नांव |
|---|---|---|---|
| ०१) | मे.साई एच.व्ही.ए.सी.सिस्टिम, ठाणे | ०३) | मे.श्री गणेश सर्व्हिसेस, कोपरगांव |
| ०२) | मे.लकी रेफ्रीजरेशन, नाशिक | | |

वरीलप्रमाणे एकुण तीन जणांनी टेंडर विकत घेतले होते. टेंडर सबमिशन तारीख दि.१८-०९-२०१२ अशी होती. त्यानुसार मुदतीत खालीलप्रमाणे सर्व तीन टेंडर प्राप्त झाले आहेत.

| अ.नं. | टेंडरधारकाचे नांव |
|---|---|
| ०१) | मे.साई एच.व्ही.ए.सी.सिस्टिम, ठाणे |
| ०२) | मे.लकी रेफ्रीजरेशन, नाशिक |
| ०३) | मे.श्री गणेश सर्व्हिसेस, कोपरगांव |

उपरोक्तप्रमाणे कॅन्टीनमधील जुने बॉटलकुलर बायबॅक करुन नवीन बॉटलकुलर खरेदी करणेकामी प्राप्त झालेले ०३ टेंडर आजचे सभेत उघडण्यात येऊन टेंडरधारकांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ. नं. | टेंडरधारकाचे नांव/ पत्ता | टेंडर मधील दर | चर्चा/ वाटाघाटीनंतर देऊ केलेले दर |
|---|---|---|---|
| ०१) | मे.साई एच.व्ही.ए.सी. सिस्टिम, ठाणे | १,९४,८०१/- | १,८३,०००/- |
| ०२) | मे.लकी रेफ्रीजरेशन, नाशिक | १,८४,७५१/- | १,८०,०००/- |
| ०३) | मे.गिल एअरकंडिशनींग अॅण्ड रेफ्रीजरेशन सर्व्हिसेस, ठाणे | १,९३,५५१/- | अनुपस्थित |

निर्णय क्र.९९३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, कॅन्टीनमधील जुने बॉटलकुलर बायबॅक करुन नविन बॉटलकुलर खरेदी मे.लकी रेफ्रीजरेशन, नाशिक यांचे रु.१,८०,०००/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

---

**विषय नं.४२** **डिझेल वाहतुकीकरीता ट्रॉलीसह टाकी खरेदी करणेकामी प्राप्त झालेली कोटेशन उघडून टेंडरधारकांशी चर्चा / वाटाघाटी करुन निर्णय होणेबाबत. (रु.३,९०,०००/-)**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक १७-०७-२०१२ चे सभेतील विषय क्र.३८ निर्णय क्र.६१० अन्वये डिझेल वाहतुकीकरीता ट्रॉलीसह टाकी खरेदी करणेकामी रक्कम रुपये ३,९०,०००/- इतक्या खर्चास व कोटेशन मागविणेस मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार डिझेल वाहतुकीकरीता ट्रॉलीसह टाकी खरेदी करणेकामी कोटेशन मागविण्यात आले होते.त्यानुसार खालीलप्रमाणे ०६ कोटेशन प्राप्त झाले आहेत.कोटेशन तपशील खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | पार्टीचे नांव | शेरा |
|---|---|---|
| ०१) | मे.जयश्री इंटरनॅशनल, अंबड, नाशिक | ०१ कोटेशन बंद पाकीट. |
| ०२) | मे.युनायटेड इंजिनिअर्स, मुंबई | ०१ कोटेशन बंद पाकीट. |
| ०३) | मे.स्पायर टँकस् अॅण्ड वेसल्स प्रा.लि., नाशिक | ०१ कोटेशन बंद पाकीट. |
| ०४) | मे.रॉयल इंडस्ट्रीज, मुंबई | ०१ कोटेशन बंद पाकीट. |
| ०५) | मे.नेहा एन्टरप्राईजेस, वलसाड (गुजरात) | ०१ कोटेशन बंद पाकीट. |
| ०६) | मे.देवयानी एन्टरप्राईजेस, नाशिक | ०१ कोटेशन बंद पाकीट. |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेले ०६ कोटेशन आजचे सभेत उघडण्यात येऊन कोटेशन सादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ. नं. | कोटेशन सादरकर्त्यांचे नांव/ पत्ता | कोटेशनमधील दर | चर्चा/ वाटाघाटीनंतर देऊ केलेले दर |
|---|---|---|---|
| ०१) | मे.जयश्री इंटरनॅशनल, अंबड, नाशिक | ७,१०,६४०/- | अनुपस्थित |
| ०२) | मे.युनायटेड इंजिनिअर्स, मुंबई | ७,३९,८६८/- | ७,००,०००/- |
| ०३) | मे.स्पायर टँकस् अॅण्ड वेसल्स प्रा.लि., नाशिक | ६,५१,९३८/- | ६,३८,०००/- |
| ०४) | मे.रॉयल इंडस्ट्रीज, मुंबई | ७,५०,८२५/- | अनुपस्थित |
| ०५) | मे.नेहा एन्टरप्राईजेस, वलसाड (गुजरात) | ८,६५,९०७/- | अनुपस्थित |
| ०६) | मे.देवयानी एन्टरप्राईजेस, नाशिक | ६,९२,१३४/- | ६,८८,५००/- |

**निर्णय क्र.९९४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, डिझेल वाहतुकीकरीता ट्रॉलीसह टाकी खरेदी करणेकामी मे.स्पायर टँकस् अॅण्ड वेसल्स प्रा.लि., नाशिक यांचा रु.६,३८,०००/- मात्रचा निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

---

**विषय नं.४३** **समाधी मंदिरामध्ये श्रीं चे रथासाठी स्टेनलेस स्टील रेलींग तयार करुन बसविणेकामी प्राप्त झालेली कोटेशन उघडून कोटेशनधारकांशी चर्चा / वाटाघाटी करुन निर्णय होणेबाबत. (रु.६९,६००/-)**

**प्रस्ताव-** मा.त्रीसदस्य समितीचे दिनांक १४-०७-२०१२ चे सभेतील आयत्या वेळेचा विषय क्र.०७ निर्णय क्र.५६५ अन्वये समाधी मंदिरामध्ये श्रीं चे रथासाठी स्टेनलेस स्टील रेलींग तयार करुन बसविण्याचे काम बाहेरील फॅब्रिकेटर्स / वर्कशॉपधारक यांचेकडून कोटेशन मागवून करुन घेणेकामी अंदाजे रक्कम रु.६९,६००/- इतक्या खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार जा.नं.एसएसएस / विद्युत / २५३४/ २०१२ दि.०७-०९-२०१२ अन्वये कोटेशन्स मागविण्यात आली आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे ०४ कोटेशन प्राप्त झाली आहेत. कोटेशन तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नांव |
|---|---|
| ०१ | मे.सुपर फॅब्रीकेशन ॲण्ड फर्निचर्स, साकुरी-राहाता |
| ०२ | मे.साई इंडस्ट्रीज, कोपरगांव |
| ०३ | मे.साई इंजिनिअर्स, अंबड, नाशिक |
| ०४ | मे.शुभम स्टील रेलींग ॲण्ड फर्निचर, नाशिक |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेले ०४ कोटेशन आजचे सभेत उघडण्यात येऊन कोटेशन सादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ. नं. | कोटेशन सादरकर्त्याचे नांव/ पत्ता | कोटेशनमधील दर | चर्चा/ वाटाघाटीनंतर देऊ केलेले दर |
|---|---|---|---|
| ०१) | मे.सुपर फॅब्रीकेशन ॲण्ड फर्निचर्स, साकुरी-राहाता | ९५,६२५/- | ७०,०००/- |
| ०२) | मे.साई इंडस्ट्रीज, कोपरगांव | ७३,३२०/- | ८०,०००/- |
| ०३) | मे.साई इंजिनिअर्स, अंबड, नाशिक | १,०४,५२८/- | ६०,०००/- |
| ०४) | मे.शुभम स्टील रेलींग ॲण्ड फर्निचर, नाशिक | ७७,४९०/- | ७५,०००/- |

**निर्णय क्र.९९५ यावर सविस्तर चर्चा होऊन, समाधी मंदिरामध्ये श्री चे रथासाठी स्टेनलेस स्टील रेलींग तयार करुन बसविणेकामी मे.साई इंजिनिअर्स, अंबड, नाशिक यांचे रु.६०,०००/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

---

**विषय नं.४४ एअर सर्कीट ब्रेकरचे स्पेअरपार्टस खरेदी करणेकामी प्राप्त झालेली निविदा उघडून निविदाधारकांशी चर्चा / वाटाघाटी करुन निर्णय होणेबाबत. (रु.३,३०,५७०/-)**

**प्रस्ताव-** मंदिर परीसर, साईनगर + श्री साईबाबा हॉस्पीटल, धर्मशाळा + श्री साईनाथ रुग्णालय + व्दारावती, साईबाबा भक्तनिवासस्थान + शैक्षणिक संकुले व श्री साई प्रसादालय याठिकाणच्या एल.टी.पॅनेल व ए.एम.एफ.पॅनेल मधील सर्व्हिसिंग करतेवेळेस एअर सर्कीट ब्रेकरमधील काही स्पेअरपार्ट हे ब्रेकर सतत ऑन-ऑफ होण्याचे क्रियेमुळे खराब झाल्याने त्याजागी नविन बसविणे अत्यंत गरजेचे असल्याने एअर सर्कीट ब्रेकरचे स्पेअरपार्टस खरेदी करणेकामी निविदा मागविण्यास तसेच याकामी येणारे अंदाजे रक्कम रु.३,३०,५७०/- मात्र खर्चाचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीसमोर सादर करण्यात आला होता.या प्रस्तावास मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक १९-०२-२०१२ चे सभेतील विषय क्र.५२ निर्णय क्र.२२२ अन्वये मान्य करण्यात येऊन या कामासाठी निविदा मागवावेत असा निर्णय झाला होता. त्यानुसार निविदा मागविण्यात आल्या होत्या. खालीलप्रमाणे ०३ निविदा प्राप्त झालेल्या आहेत. निविदा तपशील खालीलप्रमाणे.

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव |
|---|---|
| ०१) | मे.श्री साईश्रध्दा इलेक्ट्रीकल्स , नाशिक |
| ०२) | मे.मानव इलेक्ट्रीकल, नाशिक |
| ०३) | मे.गुरु इंजिनिअरिंग ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स ,नाशिक |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेले ०३ निविदा आजचे सभेत उघडण्यात येऊन निविदा सादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ. नं. | निविदा सादरकर्त्याचे नांव/ पत्ता | कोटेशनमधील दर | चर्चा/ वाटाघाटीनंतर देऊ केलेले दर |
|---|---|---|---|
| ०१) | मे.श्री साईश्रध्दा इलेक्ट्रीकल्स , नाशिक | ४,३२,२७४/- | ४,१०,०००/- |
| ०२) | मे.मानव इलेक्ट्रीकल, नाशिक | ४,१०,६६१/- | ४,०७,०००/- |
| ०३) | मे.गुरु इंजिनिअरिंग ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स, नाशिक | ४,२७,२९२/- | ३,९५,०००/- |

**निर्णय क्र.९९६ यावर सविस्तर चर्चा होऊन, एअर सर्कीट ब्रेकरचे स्पेअरपार्टस खरेदी करणेसाठी मे.गुरु इंजिनिअरिंग ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स, नाशिक यांचे रु.३,९५,०००/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

---

**विषय नं.४५ साईआश्रम भाग-०१ व भाग-०२ येथे टोकन नंबरसाठी डिस्प्ले बोर्ड तयार करुन बसविणेकामी प्राप्त झालेली कोटेशन उघडून कोटेशनधारकांशी चर्चा / वाटाघाटी करुन निर्णय होणेबाबत. (रु.१,८०,०००/-)**

**प्रस्ताव-** मा.त्रीसदस्य समितीचे दिनांक १४-०७-२०१२ चे सभेतील विषय क्र.७० निर्णय क्र.५१६ अन्वये साईआश्रम भाग-०१ व भाग-०२ येथे टोकन नंबरसाठी डिस्प्ले बोर्ड तयार करुन बसविण्याचे काम कोटेशन मागवून करुन घेणेकामी अंदाजे रक्कम रु.१,८०,०००/- इतक्या खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार जा.नं.एसएसएस / विद्युत / २४१९ / २०१२ दि.३१-०८-२०१२ अन्वये कोटेशन्स मागविण्यात आली आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे ०३ कोटेशन प्राप्त झाली आहेत. कोटेशन तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नांव |
|---|---|
| ०१ | अल्टेक सिस्टिम्स,पुणे |
| ०२ | मे. केल्ट्रॉन, मुंबई |
| ०३ | मे. ट्रॅफिट्रॉनिक्स, पुणे. |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेले ०३ कोटेशन आजचे सभेत उघडण्यात येऊन कोटेशन सादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ. नं. | कोटेशन सादरकर्त्याचे नांव/ पत्ता | कोटेशनमधील दर रु. | चर्चा/ वाटाघाटीनंतर देऊ केलेले दर रु. |
|---|---|---|---|
| ०१) | अल्टेक सिस्टिम्स,पुणे | ४,७९,२५०/- | ४,७९,२५०/- |
| ०२) | मे. केल्ट्रॉन, मुंबई | ५,०४,०००/- | ५,०४,०००/- |
| ०३) | मे. ट्रॅफिट्रॉनिक्स, पुणे. | ४,४९,०००/- | ४,४०,०२०/- |

**निर्णय क्र.९९७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम भाग-०१ व भाग-०२ येथे टोकन नंबरसाठी डिस्प्ले बोर्ड तयार करुन बसविणेकामी मे. ट्रॅफिट्रॉनिक्स, पुणे यांचे रु.४,४०,०२०/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

---

**विषय नं.४६** **श्री साईनाथ रुग्णालय तळमजल्यावरील संडास, बाथरुमचे खिडक्यांना लोखंडी जाळया तयार करुन बसविणेकामी प्राप्त झालेली कोटेशन उघडून कोटेशनधारकांशी चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय होणेबाबत. (रु.१,२९,९५०/-)**

**प्रस्ताव-** मा.त्रीसदस्य समितीचे दिनांक १८-०७-२०१२ चे सभेतील विषय क्र.३५ निर्णय क्र.६०७ अन्वये श्री साईनाथ रुग्णालय तळमजल्यावरील संडास, बाथरुमचे खिडक्यांना लोखंडी जाळया तयार करुन बसविण्याचे काम बाहेरील फॅब्रिकेटर्स / वर्कशॉपधारक यांचेकडून कोटेशन मागवून करुन घेणेकामी अंदाजे रक्कम रु.१,२९,९५०/- इतक्या खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार जा.नं.एसएसएस/ विद्युत / २४०३ / २०१२ दि.२९-०८-२०१२ अन्वये कोटेशन्स मागविण्यात आलेली आहेत. त्यानुसार खालीलप्रमाणे ०३ कोटेशन प्राप्त झाली आहेत. कोटेशनचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | कोटेशनधारकाचे नांव |
|---|---|
| ०१) | मे.साई इंडस्ट्रीज, कोपरगांव |
| ०२) | मे.सुपर फॅब्रिकेशन ॲण्ड फर्निचर, साकुरी-राहाता. |
| ०३) | मे.सुपर ॲग्रो इंडस्ट्रीज, गणेशनगर |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेले ०३ कोटेशन आजचे सभेत उघडण्यात येऊन कोटेशन सादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ. नं. | कोटेशन सादरकर्त्याचे नांव/ पत्ता | कोटेशनमधील दर | चर्चा/ वाटाघाटीनंतर देऊ केलेले दर |
|---|---|---|---|
| ०१) | मे.साई इंडस्ट्रीज, कोपरगांव | १,४३,६७६/- | १,३५,०००/- |
| ०२) | मे.सुपर फॅब्रिकेशन ॲण्ड फर्निचर, साकुरी-राहाता. | १,९३,६६८/- | १,९०,०००/- |
| ०३) | मे.सुपर ॲग्रो इंडस्ट्रीज, गणेशनगर | १,८२,३२५/- | १,४५,०००/- |

**निर्णय क्र.९९८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालय तळमजल्यावरील संडास, बाथरुमचे खिडक्यांना लोखंडी जाळया तयार करुन बसविणेकामी मे.साई इंडस्ट्रीज,** कोपरगांव **यांचे रु.१,३५,०००/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात** यावा, असे **ठरले.** (कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

---

**विषय नं.४७** **भक्तनिवास तळमाळा भुयारी मार्ग जिन्यात खिडक्यांना ग्रील तयार करुन बसविणेकामी प्राप्त झालेली कोटेशन उघडून कोटेशनधारकांशी चर्चा / वाटाघाटी करुन निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.त्रीसदस्य समितीचे दिनांक १४-०७-२०१२ चे सभेतील आयत्या वेळेचा विषय क्र.०६ निर्णय क्र.५६४ अन्वये भक्तनिवास तळमाळा भुयारी मार्ग जिन्यात खिडक्यांना ग्रील तयार करुन बसविण्याचे काम बाहेरील फॅब्रिकेटर्स / वर्कशॉपधारक यांचेकडून कोटेशन मागवून करुन घेणेकामी अंदाजे रक्कम रु.८४,६००/- इतक्या खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार जा.नं.एसएसएस / विद्युत / २५३३ / २०१२ दि.०७-०९-२०१२ अन्वये कोटेशन्स मागविण्यात आलेली आहेत. त्यानुसार खालीलप्रमाणे ०३ कोटेशन्स प्राप्त झाली आहेत. कोटेशनचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | कोटेशनधारकाचे नांव |
|---|---|
| ०१) | मे.सुपर फॅब्रिकेशन ॲण्ड फर्निचर, साकुरी-राहाता. |
| ०२) | मे.साई इंडस्ट्रीज, कोपरगांव |
| ०३) | मे.सुपर ॲग्रो इंडस्ट्रीज, गणेशनगर |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेले ०३ कोटेशन आजचे सभेत उघडण्यात येऊन कोटेशन सादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ. नं. | कोटेशन सादरकर्त्याचे नांव/ पत्ता | कोटेशनमधील दर | चर्चा/ वाटाघाटीनंतर देऊ केलेले दर |
|---|---|---|---|
| ०१) | मे.सुपर फॅब्रिकेशन ॲण्ड फर्निचर, साकुरी-राहाता. | ८६,०६२/- | ७५,०००/- |
| ०२) | मे.साई इंडस्ट्रीज, कोपरगांव | ८८,१४०/- | ७८,०००/- |
| ०३) | मे.सुपर ॲग्रो इंडस्ट्रीज, गणेशनगर | ९४,२५०/- | १,००,०००/- |

**निर्णय क्र.९९९ यावर सविस्तर चर्चा होऊन, भक्तनिवास तळमाळा भुयारी मार्ग जिन्यात खिडक्यांना ग्रील तयार करुन बसविणेकामी मे.सुपर फॅब्रिकेशन ॲण्ड फर्निचर, साकुरी-राहाता यांचे रु.७५,०००/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

---

**विषय नं.४८ श्री साईप्रसादालयाचे सोलर स्टीम कुकींगमधील सोलर प्रोजेक्ट इन्स्ट्रयुमेंट रिडींग घेणेसाठी लोखंडी जिना तयार करुन बसविणेकामी प्राप्त झालेली कोटेशन उघडून कोटेशनधारकांशी चर्चा / वाटाघाटी करुन निर्णय होणेबाबत. (रु.७८,१००/-)**

**प्रस्ताव-** मा.त्रीसदस्य समितीचे दिनांक १४-०७-२०१२ चे सभेतील विषय क्र.६९ निर्णय क्र.५१५ अन्वये श्री साईप्रसादालयाचे सोलर स्टीम कुकींगमधील सोलर प्रोजेक्ट इंन्स्ट्रयुमेंट रिडींग घेणेसाठी लोखंडी जिना तयार करुन बसविण्याचे काम बाहेरील फॅब्रिकेटर्स / वर्कशॉपधारक यांचेकडून कोटेशन मागवून करुन घेणेकामी अंदाजे रक्कम रु.७८,१००/- इतक्या खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार जा.नं.एसएसएस / विद्युत / २४०५ / २०१२ दि.२९-०८-२०१२ अन्वये कोटेशन्स मागविण्यात आलेली आहेत. त्यानुसार खालीलप्रमाणे ०३ कोटेशन्स प्राप्त झाली आहेत. कोटेशनचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | कोटेशनधारकाचे नांव |
|---|---|
| ०१) | मे.साई इंडस्ट्रीज, कोपरगांव |
| ०२) | मे.सुपर फॅब्रिकेशन ॲण्ड फर्निचर, साकुरी-राहाता. |
| ०३) | मे.सुपर ॲग्रो इंडस्ट्रीज, गणेशनगर |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेले ०३ कोटेशन आजचे सभेत उघडण्यात येऊन कोटेशन सादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ. नं. | कोटेशन सादरकर्त्याचे नांव/ पत्ता | कोटेशनमधील दर | चर्चा/ वाटाघाटीनंतर देऊ केलेले दर |
|---|---|---|---|
| ०१) | मे.साई इंडस्ट्रीज, कोपरगांव | ७३,६३२/- | ६६,०००/- |
| ०२) | मे.सुपर फॅब्रिकेशन ॲण्ड फर्निचर, साकुरी-राहाता. | ७६,२७५/- | ६१,०००/- |
| ०३) | मे.सुपर ॲग्रो इंडस्ट्रीज, गणेशनगर | ८७,०००/- | ८०,०००/- |

**निर्णय क्र.१००० यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालयाचे सोलर स्टीम कुकींगमधील सोलर प्रोजेक्ट इन्स्ट्रयुमेंट रिडींग घेणेसाठी लोखंडी जिना तयार करुन बसविणेकामी मे.सुपर फॅब्रिकेशन ॲण्ड फर्निचर, साकुरी-राहाता यांचे रु.६१,०००/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

---

**विषय नं.४९** साईनगर १०१० के.व्ही.ए. जनरेटर शेडच्या **साईडने पत्रे बसविणेकामी** प्राप्त झालेली कोटेशन उघडून कोटेशनधारकांशी चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय **घेणेबाबत. (रु.२,०६,६००/-)**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १९-०२-२०१२ चे सभेतील विषय क्र.५३ निर्णय क्र.२२३ अन्वये साईनगर १०१० केव्हीए जनरेटर शेडच्या साईडने पत्रे बसविण्याचे काम बाहेरील फॅब्रिकेटर्स / वर्कशॉपधारक यांचेकडून कोटेशन मागवून करुन घेणेकामी अंदाजे रक्कम रु.२,०६,६००/- इतक्या खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार जा.नं.एसएसएस /विद्युत/२४०४/२०१२दि.२९-०८-२०१२ अन्वये कोटेशन्स मागविण्यात आलेली आहेत. त्यानुसार खालीलप्रमाणे ०३ कोटेशन्स प्राप्त झाली आहेत.कोटेशनचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | कोटेशनधारकाचे नांव |
|---|---|
| ०१) | मे.साई इंडस्ट्रीज, कोपरगांव |
| ०२) | मे.सुपर फॅब्रिकेशन अॅण्ड फर्निचर, साकुरी-राहाता. |
| ०३) | मे.सुपर अॅग्रो इंडस्ट्रीज, गणेशनगर |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेले ०३ कोटेशन आजचे सभेत उघडण्यात येऊन कोटेशन सादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ. नं. | कोटेशन सादरकर्त्याचे नांव/ पत्ता | कोटेशनमधील दर | चर्चा/ वाटाघाटीनंतर देऊ केलेले दर |
|---|---|---|---|
| ०१) | मे.साई इंडस्ट्रीज, कोपरगांव | १,८६,०५६/- | १,००,०००/- |
| ०२) | मे.सुपर फॅब्रिकेशन अॅण्ड फर्निचर, साकुरी-राहाता. | १,१२,८९३/- | १,१२,०००/- |
| ०३) | मे.सुपर अॅग्रो इंडस्ट्रीज, गणेशनगर | १,६७,०००/- | १,५०,०००/- |

**निर्णय क्र.१००१ यावर सविस्तर चर्चा होऊन, साईनगर १०१० के.व्ही.ए. जनरेटर शेडच्या साईडने पत्रे बसविणेकामी मे.साई इंडस्ट्रीज, कोपरगांव यांचे रु.१,००,०००/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

---

**विषय नं.५० संस्थान परिसरातील नारळ फळे (शहाळे) विक्री करणेकामी प्राप्त झालेली दरपत्रके उघडून निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** बगीचा विभागामार्फत संस्थान परिसरामध्ये साठवण तलावाचे चारही बाजुने व पश्चिमेला आंबा-नारळ बागेत, धर्मशाळा परिसर, साईनगर, नवीन भक्त निवास परिसर, शैक्षणिक संकुल परिसरात एकुण १५०० नारळ झाडे लावण्यात आलेले आहे. सदर झाडांना मागील ४ ते ५ वर्षापासुन चांगल्या प्रमाणात फळे येण्यास सुरुवात झालेली आहे. मागील वर्षी या नारळ फळांची विक्री करणेकामी दरपत्रके मागवुन रु.८.५० प्रति नग हे दर मंजुर झालेनंतर श्री अशपाक पठाण, कोपरगांव व श्री. ज्ञानेश्वर मुरादे, खडकेवाके यांना मंजूर दराने नारळ फळांची विक्री करण्यात आली आहे. माहे-मार्च-२०१२ अखेर मंजुर दरांची मुदत संपलेली आहे.

चालू वर्षी नारळ फळांची विक्री करणेकामी मा. त्रीसदस्य सदस्य समितीचे सभेत निर्णय क्र.४२३ अन्वये मान्यता घेण्यात आलेली आहे. त्यानुसार नवीन दर घेणेसाठी स्थानिक फळविक्रेते / व्यापारी/ कृषि बाजार समिती,कोपरगांव,राहाता यांना समक्ष /दुरध्वनीवरुन व जा.न.एसएसएस/वशी-बगीचा/ १८७०/२०१२ दि.२८/०७/२०१२ अन्वये पत्र देवून खालील व्यापारी व सहकारी संस्था यांना कळविण्यात आले होते.

०१. कृषि बाजार समिती,कोपरगांव /राहाता
०२. श्री लाला जाफरखान पठाण,शिर्डी
०३. श्री अनिस युनूस शहा ,शिर्डी
०४. श्री इरफान शहा चंदुलाल,शिर्डी
०५. श्री समीर आब्दूला शेख ,शिर्डी
०६. श्री आशपाक रब्बाणी पठाण ,शिर्डी
०७. श्री साईबाबा संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप सोसायटी लि, शिर्डी

दरपत्रके देण्याची शेवटची तारीख ०५/०८/२०१२ अशी ठेवण्यात आलेली होती. परंतू मुदतीत एकही दरपत्रक प्राप्त झाले नसल्याने पुन्हा सदर व्यापारी/ फळविक्रेते यांना समक्ष/ दुरध्वनी वरुन दरपत्रके देणे बाबत संपर्क साधण्यात आला होता.

मुदती नंतर खालील ०३ दरपत्रके प्राप्त झालेली आहेत. प्राप्त झालेल्या दरपत्रकांचा तपशील खालील प्रमाणे-

| अ.न. | व्यापाऱ्यांचे नाव | आवक नंबर / दिनांक | शेरा |
|---|---|---|---|
| ०१ | श्री ज्ञानेश्वर नामदेव मुरादे, खडकेवाके | ७९६८/२४-०८-२०१२ | बंद लिफाफा |
| ०२ | श्री सोमनाथ नामदेव वाणी, नांदुर्खी | ८७११/ ०८-०९-२०१२ | बंद लिफाफा |
| ०३ | श्री विजय आंबादास वाणी, नांदुर्खी | ८७१२/ ०८-०९-२०१२ | बंद लिफाफा |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेले ०३ कोटेशन आजचे सभेत उघडण्यात येऊन कोटेशन सादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ. नं. | कोटेशन सादरकर्त्यांचे नांव/ पत्ता | कोटेशनमधील दर प्र.नग रु. पै. | चर्चा/ वाटाघाटीनंतर देऊ केलेले दर प्र.नग रु. पै. |
|---|---|---|---|
| ०१) | श्री ज्ञानेश्वर नामदेव मुरादे, खडकेवाके | ५.५० | ६.७५ |
| ०२) | श्री सोमनाथ नामदेव वाणी, नांदुर्खी | ६.०० | ७.५० |
| ०३) | श्री विजय आंबादास वाणी, नांदुर्खी | ७.०० | ८.०० |

**निर्णय क्र.१००२ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त कोटेशनधारकांनी सदरचे शहाळे विक्री करणेकामी संस्थान परिसरामध्ये जागा उपलब्ध करुन द्यावी, अशी अट घातल्यामुळे सदरहू विषय स्थगित ठेवणेत आला.** (कार्यवाही-बगीचा विभाग प्रमुख)

---

**विषय नं.५१ मौजे-कोऱ्हाळे येथील सर्व्हे नं.९७ मधील डाळींब बागेची खोती देणेबाबत प्राप्त झालेली दरपत्रके उघडून निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानने कोऱ्हाळे शिवारात दिनाक १४/०१/२०१२ रोजी संस्थानचे नवीन प्रकल्प राबविणेकामी ०१ हेक्टर ६२ आर क्षेत्र खरेदी करण्यात आलेले आहे. या क्षेत्रात मूळ शेतमालक यांनी या क्षेत्रात डाळींब बाग बसविण्यात आलेली आहे. संस्थाने सदरचे क्षेत्र खरेदी केल्यामुळे या क्षेत्रावरील डाळींब बागेसह खरेदी केलेले क्षेत्र संस्थानचे ताब्यात मिळालेले आहे. या क्षेत्रात अंदाजे ६०० डाळींब झाडे आहेत. सदरचे क्षेत्र हे शिर्डी शहरापासून ७ कि.मी अंतरावर आहे.

डाळींब बागेला फळ लागले नंतर या बागेची मोठया प्रमाणात काळजी घ्यावी लागते. वेळेवर खते देणे वेळो-वेळी आवश्यकते नुसार,वातावरणा नुसार झाडे औषधांची फवारणी करावी लागते. यासाठी खर्चही जास्त प्रमाणात येतो. यामुळे सदर बागेची ०२ वर्ष कालावधीसाठी खोती देता येईल. या कालावधी मध्ये बागेची देखभाल करणे, झाडांना पाणी देणे, बागेतील गवत काढणे , बागेची चाळणी करणे, आळे तयार करणे, फळे काढणे, खते व औषधे देणे ही जबाबदारी बागेची खोती घेणार यांचेवर राहील. त्यामुळे संस्थानला बागेची देखभाल करण्यासाठी कोणताही खर्च येणार नाही.

मौजे-कोऱ्हाळे येथील डाळींब बागेच्या जागेवर सध्या दुसऱ्या कोणत्याही कामाचा प्रस्ताव नसल्याने या बागेची ०२ वर्षाची कालावधीसाठी ऑक्टोबर- २०१२ ते सप्टेबर- २०१४ या कालावधीसाठी खोती घेणेसाठी दि.२३/१०/२०१२ अखेर ०४ दरपत्रक प्राप्त झालेले आहेत. प्राप्त झालेल्या दरप्रत्रकांचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.न. | कोटेशन धारकांचे नाव | आवक नंबर | दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री अरुण जयराम चौधरी, नांदुखी | ११२१४ | २३-१०-२०१२ | बंद लिफाफा |
| ०२ | श्री सुभाष कारभारी सदाफळ, राहाता | ११२१५ | २३-१०-२०१२ | बंद लिफाफा |
| ०३ | श्री सतिष भाऊसाहेब चौधरी , नांदुखी | ११२२३ | २३-१०-२०१२ | बंद लिफाफा |
| ०४ | श्री राजेंद्र दगडू जाधव, नांदुखी | ११२२४ | २३-१०-२०१२ | बंद लिफाफा |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेले ०४ कोटेशन आजचे सभेत उघडण्यात येऊन कोटेशन सादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ. नं. | कोटेशन सादरकर्त्यांचे नांव/ पत्ता | कोटेशनमधील दर रु. | चर्चा/ वाटाघाटीनंतर देऊ केलेले दर रु. |
|---|---|---|---|
| ०१ | श्री अरुण जयराम चौधरी, नांदुखी | ८५,०००/- | ८५,०००/- |
| ०२ | श्री सुभाष कारभारी सदाफळ, राहाता | ७०,०००/- | ७०,०००/- |
| ०३ | श्री सतिष भाऊसाहेब चौधरी , नांदुखी | ८०,०००/- | अनुपस्थित |
| ०४ | श्री राजेंद्र दगडू जाधव, नांदुखी | ७४,०००/- | ७४,०००/- |

**निर्णय क्र.१००३ यावर सविस्तर चर्चा होऊन, मौजे-कोऱ्हाळे येथील सर्व्हे नं.९७ मधील डाळींब बागेची श्री अरुण जयराम चौधरी, नांदुखी यांना रु.८५,०००/- मात्र या उच्चतम दराने २ वर्ष (ऑक्टोबर- २०१२ ते सप्टेबर- २०१४) कालावधीसाठी खोती देणेत यावी.**

**तसेच, प्रत्येक तीन महिन्याला त्यांचेकडून भरणा करुन घ्यावा व रु.२५,०००/- मात्र अनामत रक्कम त्यांचेकडून घेण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही-बगीचा विभाग प्रमुख)

---

**विषय नं.५२ शिर्डी येथील सर्व्हे नं.१२४ मधील चिक्कू बागेची खोती देणेकामी प्राप्त झालेली दरपत्रके उघडून निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** मौजे-शिर्डी, तालुका राहाता येथील सर्व्हे नं १२४ मधील ०१ हेक्टर २० आर क्षेत्र संस्थाने दिनांक १२/१०/२००७ खरेदी केलेले आहे. या क्षेत्रामध्ये फळबाग असून यामध्ये चिक्कू २०२ झाडे आहेत.

चिक्कू बागेची ०२ वर्षासाठीचा खोती देणे बाबत विचार करणे योग्य आहे. कारण या कालावधी मध्ये बागेची देखभाल करणे, झाडांना पाणी देणे, बागेतील गवत काढणे, बागेची चाळणी करणे, आळे तयार करणे, फळे काढणे, खते व औषधे देणे ही जबाबदारी बागेची खोती घेणार यांचेवर राहील. त्यामुळे संस्थानला बागेची देखभाल करण्यासाठी कोणताही खर्च येणार नाही.

संस्थान मालकीचा शिर्डी येथील चिक्कु फळांची नोव्हेंबर २०१२ ते जून २०१४ या कालावधीसाठी खोती देणेसाठी स्थानिक बागवान, फळविक्रीते यांच्याकडुन दरपत्रके मागविण्यात आलेली होती. दरपत्रके देण्याची शेवटची दिनांक २३/१०/२०१२ अशी होती.

दिनांक २३/१०/२०१२ अखेर ०५ दरपत्रके प्राप्त झालेली आहेत. प्राप्त झालेल्या दरत्रकांचा तपशिल खालील प्रमाणे

| अ.न. | कोटेशन धारकांचे नाव | आवक नंबर | दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१ | साहेबखॉ.सब्जेखाँ पठाण, साकुरी | ११२२२ | २३/१०/२०१२ | बंद लिफाफा |
| ०२ | रहेमतखॉ. सखरखॉ पठाण | ११२९० | २४/१०/२०१२ | बंद लिफाफा |
| ०३ | बब्बू रफिक पठाण,शिर्डी | ११३२६ | २५/१०/२००१२ | बंद लिफाफा |
| ०४ | रफिक शेख, माहेगांव देशमुख | ११३२७ | २५/१०/२००१२ | बंद लिफाफा |
| ०५ | मोजीब दिलनवाज पठाण,शिर्डी | ११३२८ | २५/१०/२००१२ | बंद लिफाफा |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेले ०३ कोटेशन आजचे सभेत उघडण्यात येऊन कोटेशन सादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ. नं. | कोटेशन सादरकर्त्याचे नांव/ पत्ता | कोटेशनमधील दर रु. | चर्चा/ वाटाघाटीनंतर देऊ केलेले दर रु. |
|---|---|---|---|
| ०१ | साहेबखॉ.सब्जेखाँ पठाण, साकुरी | १५,०००/- | १५,०००/- |
| ०२ | रहेमतखॉ. सखरखॉ पठाण | ६०,०००/- | अनुपस्थित |
| ०३ | बब्बू रफिक पठाण,शिर्डी | १,४०,०००/- | १,००,०००/- |
| ०४ | रफिक शेख, माहेगांव देशमुख | १,३५,०००/- | अनुपस्थित |
| ०५ | मोजीब दिलनवाज पठाण,शिर्डी | १,३०,०००/- | अनुपस्थित |

निर्णय क्र.१००४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी येथील सर्व्हे नं.१२४ मधील चिक्कू बागेची बब्बू रफिक पठाण,शिर्डी यांना रु.१,००,०००/- मात्र या उच्चतम दराने नोव्हेंबर २०१२ ते जून २०१४ या कालावधीसाठी खोती देणेत यावी.**

**तसेच, बब्बू रफिक पठाण, शिर्डी यांचेकडून रु.२०,०००/- मात्र अनामत रक्कम जमा करुन घेण्यात यावी व दोन वर्षामध्ये तीन टप्प्याने रकमेचा भरणा करुन घ्यावा, असे ठरले.**

(कार्यवाही-बगीचा विभाग प्रमुख)

---

**विषय नं.५३** **संस्थान वेबसाईट कामकाजासाठी आवश्यक असणारे सॉफ्टवेअर लायसेन्स कॉपी खरेदी करणेकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडणेबाबत. (रु.२,००,०००/-)**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थानची www.shrisaibabasansthan.org/www.sai.org.in या नावाने वेबसाईट दिनांक १९ नोव्हेंबर, १९९८ पासून ऑनलाईन आहे. आपल्या वेबसाईटवर वेळोवळी करण्यात येणाऱ्या बदलामुळे तसेच श्रींचे ऑन लाईन दर्शन व ऑनलाईन सर्व्हिसेस वेबसाईटवर उपलब्ध झाल्यामुळे साईभक्तांकडून वेबसाईटला अतिशय चांगल्या प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे. आपल्या वेबसाईटला दररोज दहा ते बारा हजार साईभक्त भेट देतात.

संस्थानची वेबसाईट ही १५ जीबी इतका डाटा व ६२५० पेजेस वेबसर्व्हरवर आहे. वेबसाईट इंटरनेटवरती अपलोड करणेकरीता जे साफ्टवेअर वापरण्यात येते. त्याची लायसन्स कॉपी संस्थानकडे असणे आवश्यक आहे. लायसन्स कॉपी नसल्यास संबंधीत सॉफ्टवेअरची कंपनी संस्थानवर कायदेशीर कारवाई करण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सदर लायसन्स कॉपी संस्थानचे विहित पध्दतीने कोटेशन मागवून न्युनतम निविदाधारकाकडून खरेदी करणेस व त्याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये २ लाख + टॅक्स पर्यंतचे खर्चास मा. व्यवस्थापन समितीचे दि. १२/०६/२०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ४३८ नुसार मान्यता घेण्यात आलेली आहे.

दिनांक १४/०८/२०१२ रोजीचे टिपणी अन्वये संस्थानचे वेबसाईटवर आवश्यक असणारे सॉफ्टवेअर विहित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस त्याबाबतची जाहिरात दिनांक ३१/०८/२०१२ अखेर वेबसाईटवर प्रसिध्द करुन सिलबंद निविदा दिनांक ०५/०९/२०१२ अखेर स्विकारण्यास मान्यता घेण्यात आली होती. त्यानुसार खालील निविदाधारकांच्या सिलबंद निविदा इकडील विभागास प्राप्त झालेल्या आहेत. त्यांचा तपशिल पुढीलप्रमाणे-

| अ.नं. | पुरवठादाराचे नावं | आवक क्र. दिनांक |
|---|---|---|
| ०१ | Sonia Enterprises | ८५७६ दिनांक ०५/०९/२०१२ |

| | | |
|---|---|---|
| ०२ | Pushpam Software Pvt. Ltd., Pune | ८५७७ दिनांक ०५/०९/२०१२ |
| ०३ | Shree Graphy, Pune | ०५/०९/२०१२ मुंबई कार्यालयाकडे प्राप्त<br>१३/०९/२०१२ शिर्डी कार्या. प्राप्त. |
| ०४ | Hightech Marketing Services, Pune | ८६१४ दिनांक ०६/०९/२०१२ |

प्राप्त निविदांपैकी अ.नं. ०४ ची निविदा विहित मुदतीनंतर प्राप्त झालेली आहे. सदर मुदतीनंतर प्राप्त झालेली निविदा विचारात घेण्यात यावी, असे नम्र मत आहे.

तरी प्राप्त झालेल्या निविदा मा. त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे उघडून न्युनत्तम निविदाधारकास कार्यादेश देणेच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत उघडणेत आल्या, त्यामध्ये निविदाधारकांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | पुरवठादाराचे नावं | निविदेतील दर |
|---|---|---|
| ०१ | Sonia Enterprises | २,६७,९३४/- |
| ०२ | Pushpam Software Pvt. Ltd., Pune | २,४३,५७६/- |
| ०३ | Shree Graphy, Pune | ३,८५,४५४/- |
| ०४ | Hightech Marketing Services, Pune | २,८०,११३/- |

**निर्णय क्र.१००५ यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान वेबसाईट कामकाजासाठी आवश्यक असणारे सॉफ्टवेअर लायसेन्स कॉपी खरेदी करणेकामी मे.पुष्पम सॉफ्टवेअर प्रा.लि., पुणे यांचे रु. २,४३,५७६/- मात्रचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन, सदर येणारे खर्चास मान्यता देण्यात आली व त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही-महिती तंत्रज्ञान विभाग प्रमुख)

---

**विषय नं.५४ साईआश्रम ०१ व ०२ येथे अंतर्गत इमारतीमध्ये फायबर केबल व त्या अनुषंगिक साहित्य खरेदी करणेसाठी प्राप्त झालेल्या निविदा उघडून चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय घेणेबाबत. (रु.२३,१०,०००/-)**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०६ एप्रिल, २०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ३५० नुसार, साई आश्रम १ व २ येथे अंतर्गत इमारतीमध्ये अंतर्गत दळणवळणासाठी लागणारी फायबर केबल टाकून व ती जोडण्यासाठी लागणारे साहित्य खरेदीसाठी अंदाजे २३,१०,००० खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे.

त्यास अनुसरुन, साई आश्रम १ व २ येथे अंतर्गत इमारतीमध्ये फायबर केबल व ती जोडण्यासाठी लागणारे साहित्य खरेदी करुन ती टाकून मिळणेसाठी विविध पुरवठादारांकडून सिलबंद निविदा मागविणेसाठी माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत जाहिरात तयार करण्यात आलेली होती. माहिती तंत्रज्ञान विभागाची दि. १७/०८/२०१२ रोजीची मंजूर टिपणी अन्वये संस्थानचे www.sai.org.in या अधिकृत वेबसाईटवर दिनांक २१ ऑगष्ट, २०१२ ते ३० ऑगष्ट, २०१२ पर्यंत जाहिरात प्रसिध्द करुन, सिलबंद निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दिनांक ०३ सप्टेंबर, २०१२ पर्यंत ठेवण्यात आलेली होती.

त्यानुसार खालील तपशिलाप्रमाणे विविध पुरवठादारांचे निविदा प्राप्त झालेले आहे.

| अ.नं. | पुरवठादाराचे नांव | आवक क्र.व दिनांक |
|---|---|---|
| ०१ | Manibhadra Electrical Pvt. Ltd., Mumbai (सदरची निविदा मुंबई कार्यालयाकडून उघडलेल्या स्थितीत प्राप्त झाली) | ८४०८ दि. ०३/०९/२०१२ |
| ०२ | Sai Infonet, Thane | ८४३३ दि. ०३/०९/२०१२ |
| ०३ | Minitek System (I) Pvt. Ltd., Nashik | ८३८८ दि. ०३/०९/२०१२ |
| ०४ | Sai Infonet, Thane | ८३८९ दि. ०३/०९/२०१२ |
| ०५ | Hindustan Enermax, Nashik | ८३९० दि. ०३/०९/२०१२ |
| ०६ | Raj Infotech Pvt. Ltd., Nashik | ८३९१ दि. ०३/०९/२०१२ |
| ०७ | Racca Infotech Pvt. Ltd., Nashik | ८५२२ दि. ०४/०९/२०१२ |
| ०८ | Micronova Impex Pvt. Ltd., Bangalore | ८५७८ दि. ०५/०९/२०१२ |

उपरोक्त दरपत्रकांपैकी अ.नं. ०१ चे निविदा मुंबई कार्यालयाकडून उघडलेले स्थितीत प्राप्त झालेले असून सदरचे निविदा आपले टेंडर मसुद्याप्रमाणे नसून ते अपूर्ण आहे. तसेच अ. नं. ०७ व ०८ हे निविदा विहीत मुदतीनंतर प्राप्त झालेल्या असून सदरच्या निविदा ग्राह्य धरण्यात याव्यात, असे नम्र मत आहे.

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेले ०८ कोटेशन आजचे सभेत उघडण्यात येऊन कोटेशन सादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ. नं. | कोटेशन सादरकत्याचे नांव/ पत्ता | कोटेशनमधील दर रु. | चर्चा/ वाटाघाटीनंतर देऊ केलेले दर रु. |
|---|---|---|---|
| ०१ | Manibhadra Electrical Pvt. Ltd., Mumbai | अपुर्ण | अनुपस्थित |
| ०२ | Sai Infonet, Thane | ११,७७,९०४/- | ११,३०,७८७/- |
| ०३ | Minitek System (I) Pvt. Ltd., Nashik | १२,११,००१/- | ११,८६,८७९/- |
| ०४ | Sai Infonet, Thane | ११,७७,९०४/- | ११,३०,७८७/- |
| ०५ | Hindustan Enermax, Nashik | १२,००,०००/- | अनुपस्थित |
| ०६ | Raj Infotech Pvt. Ltd., Nashik | ६,३५,३७४/- | ६,३५,३७४/- |
| ०७ | Racca Infotech Pvt. Ltd., Nashik | ९,७२,०००/- | ७,५०,०००/- |
| ०८ | Micronova Impex Pvt. Ltd., Bangalore | १५,५७,२८८/- | १३,२३,६४४/- |

निर्णय क्र.१००६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम ०१ व ०२ येथे अंतर्गत इमारतीमध्ये फायबर केबल व त्या अनुषंगिक साहित्य खरेदीकामी मे. राज इन्फोटेक प्रा.लि., नाशिक यांचे रु.६,३५,३७४/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत आले. तसेच, पुरवठा होणारे साहित्य टेंडरमधील अटी/ शर्तीनुसार आहे, याची खात्री करुन घेण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही-महिती तंत्रज्ञान विभाग प्रमुख)

---

**विषय नं.५५** **साईआश्रम-०१ व ०२ या इमारतीसाठी Door Mat Duroturf Premium (डोअर मॅट) तसेच Rubber Door Mats-Hollo Mat (काळया रंगाची रबरी मॅट) इत्यांदीचे खरेदीसाठी आलेले दरपत्रके उघडून चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय घेणेबाबत. (रु.२,७९,०००/-)**

**प्रस्ताव-** साईआश्रम १ व साईआश्रम २ चे बांधकाम पूर्ण होत असून लवकरच काही इमारतीमधील रुमचा भक्तांचे निवासव्यवस्थेसाठी वापर सुरु करावयाचा आहे. सध्या पावसाचे दिवस असल्याने, इमारतीचे आतील परीसरात प्रसन्नता रहावी, स्वच्छता रहावी याबाबत काळजी घेणे आवश्यक आहे. रस्त्यावरील चिखलाने भरलेल्या पायाने भक्त इमारतीचे आतील परिसरात आल्यास आतील परीसर खराब होईल. याबाबत दक्षता घेणेचे दृष्टीने इमारतीमध्ये ठेवणेसाठी १) Door Mat Duroturf Premium. (डोअर मॅट) तसेच २) Rubber Doors Mats - Hollo Mat (काळया रंगाची रबरी मॅट ) खरेदी करणेकामी रु. २,७९,०००/- ( अक्षरी रुपये दोन लाख एकोणऐंशी हजार मात्र ) चे अपेक्षीत खर्चास दि.१४/०७/२०१२ रोजीचे मा. त्रीसदस्य समितीचे सभेतील निर्णय क्र.५२८ नुसार प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे.

श्रीरामपुर व कोपरगाव येथील सदर डोअर मॅट व काळया रंगाची रबरी मॅट पुरवठाधारकांना जा.नं. एसएसएस / वशी - साईआश्रम - १ व २ / २३५३ / २०१२ दि. २५/०८/२०१२ अन्वये ८ पुरवठाधारकांना पत्र देऊन नमुन्यासह दरपत्रकाची मागणी केलेली होती.

त्यानुसार दरपत्रके पाठविण्याची मुदत दि. ३१/०८/२०१२ अखेरपर्यंत देण्यात आलेली होती. ८ पुरठाधारकांपैकी मुदतीत ५ दरपत्रके आलेली असुन त्यांचा तपशील खालील प्रमाणे

तसेच १) मे. सुदर्शन एम्पोरीयम, श्रीरामपुर २) मे.श्री चितांमणी प्लास्टिक्स, श्रीरामपुर, ३) मे. आशा एजन्सीज् , कोपरगांव यांनी दरपत्रक सादर केलेले नाही.

| अ.नं. | फर्मचे नाव | प्राप्त कोटेशन स्थिती | आवक नंबर / दिनांक |
|---|---|---|---|
| ०१ | मे. राहुल रेगझीन हाऊस, श्रीरामपुर | बंद पाकीट | ८२१३ / दि.२९/०८/२०१२ |
| ०२ | मे.काशिको ट्रेडींग प्रा.लि. कोपरगाव | बंद पाकीट | ८२१४ / दि.२९/०८/२०१२ |
| ०३ | मे.आर.के. ट्रेडर्स, श्रीरामपुर | बंद पाकीट | ८२४६ / दि.३०/०८/२०१२ |
| ०४ | मे. शिरोडे ॲण्ड सन्स्, कोपरगाव | बंद पाकीट | ८२९९ / दि.३१/०८/२०१२ |
| ०५ | मे. संदीप पेन्टस्, कोपरगाव | बंद पाकीट | ८३०१ / दि.३१/०८/२०१२ |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेले ०५ बंद कोटेशन आजचे सभेत उघडण्यात येऊन कोटेशन सादरकत्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | फर्मचे नाव | Door Mat Duroturf Premium (डोअर मॅट) साईज ७७॥ x १९॥ इंच | | Rubber Doors Mats - Hollo Mat (काळया रंगाची रबरी मॅट) साईज ५ x ३ फुट | |
|---|---|---|---|---|---|
| | | कोटेशनमधील दर प्र.नग (सर्व करांसह) | चर्चेनंतरचे दर प्र.नग (सर्व करांसह) | कोटेशनमधील दर प्र.नग (सर्व करांसह) | चर्चेनंतरचे दर प्र.नग (सर्व करांसह) |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | मे. राहुल रंगझीन हाऊस, श्रीरामपुर | ११७५/- | ११७५/- | १२४७/- | १२४७/- ७८५/- |
| ०२ | मे.काशिको ट्रेडींग प्रा.लि. कोपरगांव | १२०३/- | --- | ९७५/- | --- |
| ०३ | मे.आर.के. ट्रेडर्स, श्रीरामपुर | १६९०/- | --- | ९७५/- | --- |
| ०४ | मे. शिरोडे अॅण्ड संन्स्, कोपरगांव | १५२२.५० | ११३०/- | ७५९.३८ | ७४९/- |
| ०५ | मे. संदीप पेन्टस्, कोपरगाव | १३८५४/- | १५५०/- | ६८०/- | ७५० |

निर्णय क्र.१००७ **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम-०१ व ०२ या इमारतीचे Door Mat Duroturf Premium (डोअर मॅट) साईज ७७|| x १९|| इंचचे १८ नग खरेदीकामी मे. शिरोडे अॅण्ड सन्स्, कोपरगांव यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा.**

**तसेच Rubber Door Mats-Hollo Mat (काळ्या रंगाची रबरी मॅट) साईज ५ x ३ फुट करिता उपरोक्त निर्णय क्र.९८५ मधील श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरिता खरेदी करावयाच्या रबर मॅटसाठीचे निम्नतम दरधारक मे. श्री साई जनरल्स अॅड दिपिका लेडीज कॉर्नर, राहाता यांचेकडून प्र.नग रु.७००/- मात्र प्रमाणे २५२ नग खरेदी करणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक-साईआश्रम १ व २ )

---

**विषय नं.५६ साईआश्रम ०१ व ०२ इमारतीसाठी खरेदी केलेले साहित्य विविध ठिकाणी ठेवलेले आहे संस्थान वाहनांव्दारे वाहतूक करुन रुम व हॉलमध्ये ठेवणेकामीची हमाली व वाराईचे आलेले दरपत्रके उघडून चर्चा / वाटाघाटी करुन निर्णय घेणेबाबत. (रु.१,०५,६००/-)**

**प्रस्ताव-** साईआश्रम - १ व साईआश्रम - २ या नव्याने सुरु होत असलेल्या इमारतीमधील रुम व हॉलमध्ये ठेवावयाचे साहीत्य (उदा. क्वायर मेट्रेस फोम गादी, रबरराईज्ड टू फोल्ड गादी, फायबर उशी, स्टिल ग्लास, प्लॉस्टिक ट्रे, वॉटर जग, मग, डस्टबीन, बादली, प्लास्टीक खुर्ची, लोखंडी रॅक, गोदरेज टेबल, बेडशिट, उशीकव्हर, चादर, इत्यादी ) हे साईबाबा भक्तनिवासस्थान कडील- तिस-या, दुस-या व तळमजल्यावरील रुम, हॉल तसेच गाळ्यांमध्ये त्याचप्रमाणे साईआश्रम २ कडील हॉलमध्ये अशा विविध ठिकाणी ठेवलेले आहे.

उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे विविध ठिकाणी ठेवलेल्या रुम/ हॉलमधुन साहीत्याची संस्थान वहानाद्वारे वाहतुक करुन गाडीमध्ये ठेवणे, गाडीसोबत जाऊन साईआश्रम - १ व साईआश्रम - २ या इमारतीमध्ये उतरवुन प्रत्येक साहीत्य प्रत्येक इमारतीच्या रुममध्ये ठेवणे आहे. अशा ९ इमारतीचे ११५२ रुम (प्रत्येक इमारतीचे १२८ रुममध्ये) व साईआश्रम २ च्या ६ इमारतीचे १९२ हॉल (प्रत्येक इमारतीचे ३२ हॉलमध्ये) मध्ये ठेवणे आहे.

दि. १४/०७/२०१२ रोजीचे मा.त्रीसदस्य समितीचे सभेतील निर्णय क्र.५२५ अन्वये दरपत्रके मागविणेस व त्याकामी येणारे रुपये १,०५,६००/- (अक्षरी रुपये- एक लाख पाच हजार सहाशे मात्र ) चे अपेक्षित खर्चास प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे.

सदर हमाली व वाराईबाबत स्थानिक, श्रीरामपुर, व पोहेगाव येथील हमालांकडुन जा.नं. एसएसएस/ वशी - साईआश्रम -१ व २ / २३६१/ २०१२ दि. २७/०८/२०१२ अन्वये ५ जणांना विहीत नमुन्यात दरपत्रकेबाबत पत्र देऊन दरपत्रकाची मागणी केलेली होती.

सदर विहीत नमुन्यातील दरपत्रके पाठविणेची मुदत ०१/०९/२०१२ अखेर पर्यंत देण्यात आलेली होती. ०५ दरपत्रकधारकांपैकी ०४ दरपत्रके मुदतीत आलेली असुन त्याचा तपशील खालील प्रमाणे-

| अ.नं. | दरपत्रकधारकाचे नाव | प्राप्त दरपत्रक स्थिती | आवक नंबर / दिनाक |
|---|---|---|---|
| १) | श्री संतोष मधुकर गायकवाड, पोहेगाव | बंद पाकीट | ८२४७ / दि.३०/०८/२०१२ |
| २) | श्री महेश तुकाराम सोनवणे, शिर्डी | बंद पाकीट | ८२४८ / दि.३०/०८/२०१२ |
| ३) | श्री रंभाजी बाबाजी वाघमारे,श्रीरामपुर | बंद पाकीट | ८२९८/ दि.३१/०८/२०१२ |
| ४) | श्री राजेश प्रभाकर सोनवणे,श्रीरामपुर | बंद पाकीट | ८३००/ दि.३१/०८/२०१२ |

तरी उपरोक्त मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके मा.त्रीसदस्य समितीचे सभेपुढे समक्ष उघडणेस व संबंधीतांशी दराबाबत चर्चा / वाटाघाटी होऊन निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.१००८ **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम ०१ व ०२ इमारतीसाठी खरेदी केलेले साहित्य विविध ठिकाणी ठेवलेले असून ते साहित्य संस्थान कंत्राटी व आऊट सोर्सिंग कर्मचाऱ्यांच्या मदतीने, संस्थान वाहनांव्दारे वाहतूक करुन रुम व हॉलमध्ये ठेवणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही-अधिक्षक-साईआश्रम १ व २ )

---

**विषय नं.५७ सन २०१२-१३ करीता साईआश्रम- १ व २ विभागांसाठी पेस्ट कंट्रोल व रोडेंट कंट्रोल करणेचे कामासंबंधी पात्र निविदाधारकांसी दराबाबत चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** साईआश्रम - १ व साईआश्रम - २ करीता पेस्ट कंट्रोल व रोडेंट कंट्रोल करणेकामी इच्छुक, अनुभवी पात्र ठेकेदार / कंपनी यांचेकडुन सिलबंद निविदा मागविणेबाबत दि.०२/०७/२०१२ रोजीचे दै. सामना या वर्तमानपत्रातुन जनसंपर्क कार्यालयामार्फत निविदा विक्रीची जाहीरात प्रसिध्द करण्यात आली.

निविदा विक्री मुदत मंगळवार दि. ०३/०७/२०१२ ते मंगळवार दि.१०/०७/२०१२ अखेर दुपारी ४:०० वाजेपर्यंत होती.

शिर्डी कार्यालयात अ.नं. ०१ ते ०५ क्रमाकाच्या निविदापैकी अ.नं. ०५ या क्रमाकाची निविदा शिल्लक राहुन बाकी ०४ निविदांची विक्री झालेली आहे.

मुंबई कार्यालयात अ.नं. ०६ ते २० क्रमाकाच्या निविदापैकी अ.नं. २० या क्रमाकाची निविदा शिल्लक राहुन बाकी १४ निविदांची विक्री झालेली आहे.

निविदा भरणेपुर्वी जर कामकाजासंदर्भात काही अडी - अडचणी शंका असतील तर त्या निरसन करण्यासाठी निविदाधारकांसाठी, प्री बीड मिटींग दि. १६/०७/२०१२ रोजी सकाळी ११.०० वा. साईनिवास, जनसंपर्क कार्यालयाजवळ,शिर्डी येथे घेण्यात आली. प्री-बीड मिटींगसाठी आठ निविदाधारक उपस्थित होते. प्री-बीड मिटींगचे इतिवृत्त, नविन अटी-शर्ती व निविदेतील पा. नं. १४ (सुधारीत) नविन प्राइस बीड तक्ता १८ निविदाधारकांना ई-मेलद्वारे पाठविण्यात आले.

विक्री झालेल्यानंतर सिलबंद निविदा स्विकारणेची अंतिम तारीख २०/०७/२०१२ रोजी कार्यालयीन वेळेत मुंबई व शिर्डी कार्यालयात सादर करणेबाबत तशी प्रसिध्दी देण्यात आलेली होती.

खालील तक्यात दर्शविलेप्रमाणे साईआश्रम -१ व २ करीता पेस्ट कंट्रोल व रोडेंट कंट्रोल करणेकामी अ.नं. ०१ ते ०४ अशा चार निविदा शिर्डी कार्यालयात व अ.नं. ५ ते १२ अशा आठ निविदा मुंबई कार्यालयात कार्यालयीन वेळेपुर्वी जमा झालेल्या आहेत.

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव | आवक नंबर व दिनांक |
|---|---|---|
| ०१ | मे. पेस्ट कंट्रोल एम वॉल्स .मुंबई | शिर्डी कार्यालय<br>६२८७ / दि.१९/०७/२०१२ |
| ०२ | मे. घुगे पेस्ट कंट्रोल उद्योग, नाशिक | शिर्डी कार्यालय<br>६४०४ / दि.२०/०७/२०१२ |
| ०३ | मे. जी. टी. पेस्ट कंट्रोल प्रा. लि. नाशिक | शिर्डी कार्यालय<br>६४०५ / दि.२०/०७/२०१२ |
| ०४ | मे. आयएसएस हायजअर प्रा.लि., मुंबई | शिर्डी कार्यालय<br>६४०६ / दि.२०/०७/२०१२ |
| ०५ | मे. पेस्ट कंट्रोल एंटरप्रायजेस, अहमदाबाद (गुजरात) | मुंबई कार्यालय<br>४४० / दि.१९/०७/२०१२ |
| ०६ | मे. हिंदुस्थान इन्सेक्टीसाईडस, मुंबई | मुंबई कार्यालय<br>४४४ / दि.२०/०७/२०१२ |
| ०७ | मे. आय पी एम ॲण्ड फ्युमीगेशन इंडिया, मुंबई | मुंबई कार्यालय<br>४४८ / दि.२०/०७/२०१२ |
| ०८ | मे. हायजेनिक पेस्ट कंट्रोल, ठाणे | मुंबई कार्यालय<br>४४७ / दि.२०/०७/२०१२ |
| ०९ | मे. जान्हवी पेस्ट कंट्रोल, डोंबिवली | मुंबई कार्यालय<br>४४५ / दि.२०/०७/२०१२ |
| १० | मे. नोबेल फॅसिलिटी सर्व्हिसेस,ठाणे | मुंबई कार्यालय<br>४५० / दि.२०/०७/२०१२ |
| ११ | मे. प्रॉपर्टी सोलुशन इंडीया प्रा. लि.,मुंबई | मुंबई कार्यालय<br>४५१ / दि.२०/०७/२०१२ |
| १२ | मे. पॅरागॉन पेस्टीसाईडस, मुंबई | मुंबई कार्यालय<br>४४९ / दि.२०/०७/२०१२ |

निविदेच्या अटी शर्ती अ.नं. ०१ मध्ये दोन लिफाफे पध्दतीने निविदा कागदपत्रे मागविण्यात येत असल्याचे नमूद केले आहे. लिफाफा नं. - १ प्रथम उघडुन त्यातील अ.नं. ०७ नुसार मागणी केलेले कागदपत्र असल्यास क्र. २ चा लिफाफा उघडण्यात येईल. लिफाफा नं. - २ मध्ये मुळनिविदा सादर करावी ( प्राइस बीड तक्ता ) असे नमुद केलेले आहे.

दि २५/०७/२०१२ रोजीचे मंजुर टिपणीनुसार, लिफाफा नं. १ (टेक्नीकल बीड) दि. १०/०८/२०१२ रोजी मा.कार्यकारी अधिकारी सो. यांचे समक्ष उघडण्यात आले असुन, निविदाधारकांनी सादर केलेल्या कागदपत्रांबाबतचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आलेला असुन सोबत अवलोकनार्थ जोडला आहे. प्राप्त निविदाधारकांच्या कागदपत्रांच्या अपुर्तते बाबतची माहिती खालीलप्रमाणे-

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव | अ.नं. | सादर न केलेल्या कागदपत्रांचा तपशील | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१ | मे. पेस्ट कंट्रोल एम वॉल्शे.मुंबई | १. | सध्या इतर संस्थेत काम करत असलेल्या कामाविषयी कार्यादेशाच्या सत्यप्रती दिलेल्या नाहीत. | पात्र |
| ०२ | मे. घुगे पेस्ट कंट्रोल उद्योग, - नाशिक | १ | आय.एस.सो. (I.S.O.) मानांकन नाही. | अपात्र |
| | | २ | आय. पी. सी. ए. ( I. P. C. A ) चे सभासद नाही. | |
| | | ३ | सध्या इतर संस्थेत काम करत असलेल्या कामाविषयी कार्यादेशाच्या सत्यप्रती दिलेल्या नाहीत. | |
| ०३ | मे. जी. टी. पेस्ट कंट्रोल प्रा. लि. - नाशिक | १ | दोन वर्षापैकी एका वर्षाचे सन २०१०-११ चे वार्षिक उलाढालीचे चार्टड अकांऊटंट यांचेकडील प्रमाणपत्र नाही. | पात्र |
| ०४ | मे. आयएसएल हायकेअर प्रा.लि., मुंबई | १ | आय.एस.सो. (I.S.O.) मानांकन नाही. | अपात्र |
| | | २ | सध्या इतर संस्थेत काम करत असलेल्या कामाविषयी कार्यादेशाच्या सत्यप्रती दिलेल्या नाहीत. | |
| ०५ | मे. पेस्ट कंट्रोल एंटरप्रायजेस, अहमदाबाद ( गुजरात ) | | ------ | पात्र |
| ०६ | मे. हिंदुस्थान इन्सेक्टीसाईडस, मुंबई | १ | सध्या इतर संस्थेत काम करत असलेल्या कामाविषयी कार्यादेशाच्या सत्यप्रती दिलेल्या नाहीत. | पात्र |
| ०७ | मे. आय पी एम ॲण्ड फ्युमीगेशन इंडिया, मुंबई | | ------ | पात्र |
| ०८ | मे. हायजेनिक पेस्ट कंट्रोल, ठाणे | १ | आय.एस.सो. (I.S.O.) मानांकन नाही. | अपात्र |
| ०९ | मे. जान्हवी पेस्ट कंट्रोल, डोंबिवली | १ | आय.एस.सो. (I.S.O.) मानांकन नाही. | अपात्र |
| | | २ | आय. पी. सी. ए. ( I. P. C. A ) चे सभासद नाही. | |
| | | ३ | आयकर नोंदणी पॅन कार्ड प्रमाणपत्राची सत्यप्रत नाही. | |
| | | ४ | प्रॉव्हिडंड फंड स्वतंत्र कोड नंबर असल्यास (कोडड्रॉप्ट लेटरची) प्रमाणपत्राची सत्यप्रत नाही. | |
| | | ५ | सर्व्हिस टॅक्स रजिस्ट्रेशन प्रमाणपत्राची प्रमाणीत सत्यप्रत नाही. | |
| १० | मे. नोबल कन्सल्टी सर्व्हिसेस,ठाणे | १ | आय.एस.सो. (I.S.O.) मानांकन नाही. | अपात्र |
| | | २ | आय. पी. सी. ए. ( I. P. C. A ) चे सभासद नाही. | |
| | | ३ | Licensing Authority ची सत्य प्रमाणित प्रत नाही. | |
| | | ४ | आयकर नोंदणी पॅन कार्ड प्रमाणपत्राची सत्यप्रत नाही. | |
| | | ५ | सध्या इतर संस्थेत काम करत असलेल्या कामाविषयी कार्यादेशाच्या सत्यप्रती दिलेल्या नाहीत. | |
| | | ६ | सा २००९- १० व २०१०-११ या आर्थिक वर्षाचे वार्षिक उलाढालीचे चार्टड अकांऊटंट (Chartered Accountant) यांचेकडील प्रमाणपत्राची सत्यप्रत नाही. | |
| ११ | मे. प्रॉपर्टी सोलुशन इंडीया प्रा. लि.,मुंबई | १ | आय. पी. सी. ए. ( I. P. C. A ) चे सभासद नाही. | अपात्र |
| १२ | मे. पॅरागॉन पेस्टीसाईडस, मुंबई | | ------ | पात्र |
| | | | | ६ |

निविदेतील अटी शर्तीनुसार १२ निविदाधारकांपैकी ६ निविदाधारक अपात्र असून खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे ६ निविदाधारक पात्र ठरत आहेत. त्यापैकी अ.नं. १ ते ३ या निविदाधारकांनी त्यांचे नावासमोर दर्शविलेले कागदपत्रे सादर केलेले नाहीत. प्राइस बीडचे चर्चा / वाटाघाटीचे वेळेस त्यांचेकडुन सदर कागदपत्राची पुर्तता करुन घेता येईल.

| अ.नं. | पात्र निविदाधारकांचे नाव | अ.नं | सादर न केलेल्या कागदपत्रांचा तपशील |
|---|---|---|---|
| १ | मे. पेस्ट कंट्रोल एम वॉल्शे.मुंबई | १ | सध्या इतर संस्थेत काम करत असलेल्या कामाविषयी कार्यादेशाच्या सत्यप्रती दिलेल्या नाहीत |
**विषय नं.८५ श्री साईबाबा रुग्णालयातील कॅथलॅब विभागात वर्कशॉप करीता तातडीने केलेल्या सर्जिकल साहित्य खरेदीस व खर्चास मंजुरी मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.१०३७ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.८६ श्री साईनाथ हॉस्पिटलमधील डायबेटिक केअर सेंटर बाबत.**
**निर्णय क्र.१०३८ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.८७ २.५ मेगावॅट पवनचक्की यंत्रणेचे कॉम्प्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट देणेबाबत.**
**निर्णय क्र.१०३९ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

---

**विषय नं.८८ Capacitor खरेदी करणेबाबत.**
**निर्णय क्र.१०४० सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

---

**विषय नं.८९ वाहन विभागात स्टोअरकरीता शेड तयार करणेबाबत.**
**निर्णय क्र.१०४१ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

---

**विषय नं.९० साईआश्रम भाग- ०१ करिता हायमास्ट लॅम्प खरेदी करुन बसविणेबाबत.**
**निर्णय क्र.१०४२ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

---

**विषय नं.९१ मे.शापुरजी पालोनजी ॲण्ड कंपनी, नाशिक यांचे विद्युतीकरण कामाचे खर्चास मंजुरी मिळणेबाबत.**
**निर्णय क्र.१०४३ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

---

**विषय नं.९२ श्री साई प्रसादालयाकडील सबस्टेशनचा कॉन्ट्रॅक्ट डिमांड (विद्युत भार) वाढवून घेणेबाबतचे चार्जेस भरणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईप्रसादालय येथे महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून ११ के.व्ही.उच्च दाब विद्युत पुरवठा जोडून घेण्यात आलेला आहे. श्री साईप्रसादालय येथे साईटेक प्रोजेक्ट होण्याच्या अगोदर आपण महाराष्ट्र राज्य वीज वितरण कं.कडून ३६० केव्हीए इतका कॉन्ट्रॅक्ट डिमांड मंजूर करुन घेतलेला होता. श्री साईप्रसादालय येथे साईटेक प्रोजेक्ट झाल्यामुळे व श्री साईप्रसादालयामधील मशिनरींमध्ये वाढ झाल्यामुळे श्री साईप्रसादालय येथील सबस्टेशनच्या कॉन्ट्रॅक्ट डिमांड मध्ये वाढ झालेली असून तो ४५० केव्हीएच्या जवळपास झालेला आहे.त्यामुळे श्री साईप्रसादालय येथील कॉन्ट्रॅक्ट डिमांड वाढवून घेणे गरजेचे असल्याने आपण महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडे पत्रव्यवहार केलेला होता. महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीने कॉन्ट्रॅक्ट डिमांड ३६० केव्हीए वरुन ४५० केव्हीए इतका त्यांचे पत्र क्र.SE/ANRC/TECH/१७९३८/२०१२ /दि.५/११/२०१२ आदेशान्वये मंजूर केला असून वाढीव ९० केव्हीए इतक्या जादा कॉन्ट्रॅक्ट डिमांड चे चार्जेस आपणास महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडे भरावे लागणार असल्याचे कळविले आहेत. भराव्या लागणा-या चार्जेसचा तपशिल पुढील प्रमाणे-

| Sr.No. | Discription | Amount |
|---|---|---|
| 1 | Fixed Service connection charges. | 0,00,270/- |
| 2 | Security Deposit. | 5,44,400/- |
| 3 | Cost of Agreement | 0,00,200/- |
| 4 | Application & Registration fee. | 0,01,700/- |
| | Total Amount Rs. | 5,46,570/- |
| In word - Five lakh forty six thousand five hundered & sevnty only. | | |

उपरोक्त प्रमाणे श्री साई प्रसादालयाकडील सबस्टेशनचा कॉन्ट्रॅक्ट डिमांड (विद्युत भार) वाढवुन घेणे कामी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडे रक्कम रुपये ५,४६,५७०/- इतकी रक्कम भरावी लागणार आहे.

सदर प्रस्तावावर विचार होऊन प्रस्तावास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.१०४४ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालयाकडील सबस्टेशनचा कॉन्ट्रॅक्ट डिमांड (विद्युत भार) वाढवुन घेणेकामी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडे रक्कम रुपये ५,४६,५७०/- मात्र रक्कम भरणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

---

**विषय नं.९३ साईआश्रम भाग- १ कडील ए.सी. सिस्टीमसाठी लागणाऱ्या नवीन सबस्टेशनकरीता वीज जोडणीचे चार्जेस भरणेबाबत.**

**प्रस्ताव-** साईआश्रम भाग - १ या प्रकल्पाकडील इमारत क्र. A, B व C या तीन इमारतींमधील ३८४ रुम साईभक्त मा.रमणी सर यांचे देणगीतून A.C बनविण्यात आलेल्या आहेत. A.C.Plant चा एकुण इलेक्ट्रिक लोड ५७६ K.W.(५७६ KVA) इतका असल्याने या A.C.Plant च्या विद्युत पुरवठयाकरीता महाराष्ट्र राज्य वीज वितरण कं.कडुन स्वतंत्र उच्च दाब वीज जोडणी करुन घ्यावयाची

असून श्री. रमणी सर यांनी नेमलेल्या कॉन्ट्रॅक्टर मार्फत जनरेटर संच व सबस्टेशनची उभारणी करण्याचे काम चालु आहे.सबस्टेशनला विद्युत पुरवठा जोडुन घेणे करीता महाराष्ट्र राज्य वीज वितरण कं.कडे संस्थानने पत्रव्यवहार केला असुन महाराष्ट्र राज्य वीज वितरण कं.ने संस्थानला उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये वीज जोडणी पोटी भराव्या लागणा-या रकमेचे कोटेशन पाठविलेले आहे.कोटेशनच्या रकमेचा तपशिल पुढील प्रमाणे आहे.

| Sr. No. | Description | Amount |
|---|---|---|
| 1 | 1.3 % Fixed Service connection charges. | 00,00,280/- |
| 2 | Non refundable 1.3 % sup.charges. | 00,11,915/- |
| 3 | Security Deposit. | 29,18,800/- |
| 4 | Cost of Agreement. | 00,00,200/- |
| 5 | Application & Registration Fee. | 00,01,700/- |
| | Total Amount Rs. | 29,32,895/- |
| In Word :- Twenty nine lakh,Thirty two thousand,Eight hundered & ninty five rupees only. | | |

उपरोक्त प्रमाणे A.C.Plant सबस्टेशन च्या वीज जोडणी करीता महाराष्ट्र राज्य वीज वितरण कं.कडे रक्कम रुपये २९,३२,८९५.०० इतकी रक्कम भरावी लागणार आहे.

सदर प्रस्तावावर विचार होऊन प्रस्तावास मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.१०४५ यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम भाग- १ कडील ए.सी. **सिस्टीमसाठी सबस्टेशनच्या वीज जोडणी करीता महाराष्ट्र राज्य वीज वितरण कं.कडे रक्कम रु. २९,३२,८९५/- मात्र रक्कम भरणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

---

**विषय नं.९४ साईआश्रम भाग- ०१ व भाग- ०२ कडील मे.जॉनसन लिफ्टस प्रा.लि., पुणे लिफ्ट कामाचे फायनल बील आदा करणेबाबत.**

**निर्णय क्र.१०४६ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

---

**विषय नं.९५ रोखीने अथवा वस्तुरुपाने रुपये ५०००/- किंवा त्यापेक्षा जास्त देणगी देणाऱ्या भक्तांना संस्थानमार्फत श्री साईबाबांचा पॉकेट साईज, कृष्णधवल, दगडावर बसलेले बाबा थ्रीडी फोटो विनामुल्य भेट देणेकामी झालेला खर्च Publication Expenses खाते नांवे होणेबाबत**

**निर्णय क्र.१०४७ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक-प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.९६ मे.अजय ऑफसेट प्रा.लि., पुणे यांचे नांव प्रकाशने विभागाकडील** प्रेसधारकांचे निवडक **यादीतून कमी करणेस मान्यतेबाबत.**

**निर्णय क्र.१०४८ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक-प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.९७ संस्थान निर्मित साई मंदिरातील आरत्या व मंत्रोच्चार व्हीसीडी व ग्लीम्पसेस ऑफ श्री साईबाबा डीव्हीडी निर्मिती कामाचे खर्चास मंजुरी मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.१०४९ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक-प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.९८ श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी तर्फे मान्यवरांना श्री साई दैनंदिनी/ दिनदर्शिका- २०१३ विनामुल्य भेट देणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ कलम नं.१७ (ठ) मध्ये खालील प्रमाणे तरतूद आहे.

**<u>१७ (ठ) समितीचे कर्तव्ये व अधिकारी-</u>**

"श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या विहत व त्यांची शिकवण या बाबतच्या माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साई साहीत्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील "

श्री साईबाबांचा प्रचार व प्रसार म्हणून इतर प्रकाशना खेरीज दर वर्षी संस्थान मार्फत साई दैनंदिनी व दिनदर्शिका प्रकाशीत केली जाते.

दरवर्षी हिवाळी नागपूर अधिवेशनात विधिमंडळ सदस्यांना,व्हीआयपी, व्हीव्हीआयपी संस्थान कामा संदर्भातील विविध शासकीय कार्यालयातील अधिकारी वगैरेना तसेच मा. अध्यक्ष महोदय, मा. उपाध्यक्ष महोदय, मा विश्वस्त, मा. कार्यकारी अधिकारी, मा.उपकार्यकारी अधिकारी व प्रशासकीय अधिकारी यांचेमार्फत संस्थानच्या वतीने श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका विनामूल्य भेट म्हणून दिल्या जातात त्याची रक्कम प्रकाशने विभाग खाते (Publication expenses) खर्ची टाकली जाते.

सन.२०१३ च्या श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका संस्थानतर्फे विनामूल्य भेट देणेकामी संबंधीतांना देणेस खालील प्रमाणे मान्यता असावी.

| अ.नं. | तपशील | दैनंदिनी प्रती किंमत रु.५५/- | दिनदर्शीका १ पानी किंमत रु १०/- | श्री साई दिनदर्शीका १ पानी मोठी प्रती किंमत रु.२०/- | श्री साई दिनदर्शीका ६ पानी मोठी प्रती किंमत रु.२५/- |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | मा.विधिमंडळ सदस्य | ५०० | ५०० | - | - |
| ०२ | मा. अध्यक्ष महोदय, | १०० | १०० | १०० | १०० |
| ०३ | मा. सदस्य, त्रिसदस्य समिती | १०० | १०० | १०० | १०० |
| ०४ | मा. कार्यकारी अधिकारी महोदय | १०० | १०० | १०० | १०० |
| ०५ | मा.उपकार्यकारी अधिकारी महोदय | १०० | १०० | १०० | १०० |
| ०६ | प्रशासकीय अधिकारी / विशेष कार्य अधिकारी ४ (प्रत्येकी २५ प्रमाणे) | १०० | १०० | १०० | १०० |
| ०७ | पत्रकार | २५० | - | - | - |
| ०८ | जनसंपर्क कार्यालय तसेच विविध विभाग प्रमुख | गरजेनुसार | गरजेनुसार | गरजनुसार | गरजेनुसार कार्यालयीन वापरासाठी |

संदर्भ क्र -१ अन्वये सन्माननीय साईभक्तांना संस्थानतर्फे वेळोवेळी प्रकाशने/फोटो/दैनंदिनी/दिनदर्शिका, बाबांची मुर्ती /सी.डी.उपलब्धतेप्रमाणे सप्रेम भेट देण्याची प्रथा आहे. तसेच सन्माननीय साईभक्तांचा सत्कार करण्यात येतो. सदर पध्दतीस मा.व्यवस्थापन समितीची दि.१२.०६.२०११ रोजीच्या सभेतील निर्णय क्र.४२९ नुसार स्थायी मान्यता मिळालेली आहे.

सबब उपरोक्तप्रमाणे श्री साई दैनंदिनी/दिनदर्शिका सन-२०१३ विनामुल्य भेट देणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.१०५० यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी तर्फे मान्यवरांना श्री साई दैनंदिनी/ दिनदर्शिका- २०१३ विनामुल्य भेट देणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक-प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.९९ श्री साई चरित अनुगायन प्रकाशित करणेबाबत.**

**निर्णय क्र.१०५१ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक-प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.१०० नवीन प्रेसधारकांचे नाव निवडक प्रेसधारकांचे यादीत समाविष्ट करुन घेणेबाबत.**

**निर्णय क्र.१०५२ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक-प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.१०१ लाडू प्रसादाच्या तक्रारीबाबत चौकशीचा अहवाल.**

**निर्णय क्र.१०५३ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक-खरेदी विभाग)

---

**विषय नं.१०२ मे.बाफणा बजार, नाशिक यांचेकडून वसुल करावयाचे रकमेबाबत.**

**प्रस्ताव** दि.३०.०५.२०१२ चे मा. त्रीसदस्य समिती सभेत झालेल्या चर्चा-वाटाघाटीमध्ये मे बाफना बजार, नासिक यांचे महारतन बॅण्डचे गावरान तूप न्यूनतम दर रु.२०,७००/- + ५ % व्हॅट असे एकूण रु.२१,७३५/- प्रति क्विंटल या दराने मान्य करण्यांत येऊन त्यांना जा.नं.एसएसएस/वशी/खरेदी-प्रसाद/१४२७/१२, दि.०३.०७.२०१२ अन्वये दि.०१.०७.१२ ते ३१.१०.१२ अखेर २४३० क्विटल गावरान तूप पुरविणेबाबत पुरवठा आदेश देण्यांत आला होता. त्यानुसार मे.बाफना बजार, नासिक यांनी दि.२४.०८.२०१२ अखेर १२०४.५० क्विंटल गावरान तूपाचा पुरवठा केला असून १२२५.५० क्विंटल गावरान तुपाचा पुरवठा करणे बाकी होते.

सदर तुपापासून बनविण्यांत येणारे लाडू व सत्यनारायण पुजेसाठी बनविवण्यांत येणा-या शिरा प्रसादाची चव कडवट लागत असलेबाबत स्थानिक नागरिक व साईभक्तांच्या तकारी आल्याने व त्याबाबत वर्तमानपत्रात प्रसिध्दी आल्याने दि.२५.०८.२०१२ रोजी मा.त्रीसदस्य समितीने प्रसादालयात प्रत्यक्ष पाहाणी करुन लाडू प्रसाद बनविणेचे प्रकियेबाबत माहिती घेऊन स्वतः लाडूची चव घेतली. त्यामध्ये कडवटपणा आढळल्याने त्यांनी महारतन बॅण्डचे गावरान तूपाचा पुरवठा त्वरीत बंद करुन दुस-या कंपनीचे गावरान तूप खरेदी करणेबाबत निर्णय घेतला.

वरील निर्णया नुसार दि.२५.०८.२०१२ रोजी रात्रौ ८.१५ वा.चे दरम्यान मे बाफना बजार, नासिक यांना दूरध्वनीवरुन महारतन बॅण्डचे गावरान तूपाचा पुरवठा बंद करणेबाबत कळविण्यांत आले.

त्यानंतर तातडीचे पर्यायी व्यवस्थेबाबत यापुर्वी पुरवठा केलेल्या तुपाचे ब्रॅण्डबाबत खालील पुरवठाधारकांशी चर्चा केली. (१) प्रभात डेअरी प्रा.लि.टिळकनगर, प्रभात ब्रॅण्ड (२) मे.इंदापूर डेअरी ॲण्ड मिल्क प्रॉडक्टस. गोखळी सोनाई ब्रॅण्ड (३) मे बाफना बजार, नासिक यांचे हटसन ब्रॅण्डचे तूपाचे

उपलब्धतेबाबत दूरध्वनीवरुन विचारणा करण्यांत येऊन दराबाबत माहिती घेण्यांत आली त्याचा तपशील खालीलप्रमाणे.

| अ.नं | पुरवठाधारकाचे नांव | तुपाचा ब्रॅण्ड | दर प्रति कि लो | उपलब्धतेबाबतचा तपशील. |
|---|---|---|---|---|
| ०१ | मे.प्रभात डेअरी प्रा.लि. टिळकनगर, | प्रभात | - | मालाचा तुटवडा असल्याने किमान ०१ महिना पुरवठा करु शकत नाही. |
| ०२ | मे.इंदापूर डेअरी ॲण्ड मिल्क प्रॉडक्टस. गोखळी | सोनाई | रु.२३७ + ५ % व्हॅट | पुरवठा तातडीने करु शकतो. |
| ०३ | मे बाफना बजार, नासिक | हटसन | रु.२३७ + ५ % व्हॅट | पुरवठा करणेस सात दिवस लागतील. |

वरील दराबाबत व पुरवठयाबाबत झालेल्या चर्चेबाबतची माहिती त्रीसमिती सदस्य तथा मा. जिल्हाधिकारी याना दूरध्वनीवरुन देण्यांत आली व मे.इंदापूर डेअरी ॲण्ड मिल्क प्रॉडक्टस. गोखळी यांचे सोनाई ब्रॅण्डचे गावरान तुप रु.२३,७००/- + ५ % व्हॅट रु.११८५/- असे एकुण रक्कम रु.२४,८८५/-. (रु.चोवीस हजार आठशे पंच्याऐंशी) मात्र प्रति क्विंटल या दराने त्वरीत उपलब्ध करुन देणार असल्याने त्यांचेकडून गावरान तुपाबाबत निर्णय होईपर्यंत खरेदी करण्यांत यावे असे ठरले.

मे.बाफणा बजार, नाशिक यांचे करारनाम्यातील शर्त व अट क्र.२ मध्ये "मालासोबत मालाचे चलन व बिल असले पाहिजे. मालाच्या जातीत/दर्जात/प्रकारात काहीही कमी-जास्त आढळल्यास तो माल नाकारणेचा हक्क पार्टी नं.०१ हिस राहील. पुरविलेल्या मालात खराब व टाकाऊ माल आढळल्यास त्याची किंमत बिलातून वजावट करुन बिल आदा केले जाईल. त्याबद्दल तक्रार चालणार नाही."

शर्त व अट क्र.८ मध्ये "कराराचे मुदतीत पार्टी नं.०२ यांनी मंजूर झालेल्या दराने व नमुन्याप्रमाणे माल पुरवठा करणे बंधनकारक आहे. मान्य दरामध्ये कोणत्याही कारणास्तव भाववाढ मागविण्याचा अधिकार पार्टी नं.२ यांना असणार नाही. अथवा अशा प्रकारची दरवाढ दिली जाणार नाही. पार्टी नं.०२ यांनी माल पुरवठा करावयाचे नाकारल्यास अथवा माल पुरवठा न केल्यास त्या मालासाठी असलेली त्यांची पुर्ण सुरक्षा अनामत रक्कम दंड म्हणून संस्थान खाती जमा करणेत येईल. तसेच पार्टी नं.१ यांना बाजारभावाने अथवा फेरनिविदा मागणी करुन माल खरेदी करावा लागल्यास जादा येणाऱ्या खर्चाची नुकसान भरपाई पार्टी नं.०२ यांचेकडून वसुल केली जाईल व त्यांचे नांव काळ्या यादीत समाविष्ठ करण्यात येऊन, पुढील ३ वर्षांसाठी त्यांना पार्टी नं.०१ यांचे कोणत्याही खरेदी प्रक्रियेत सहभाग घेता येणार नाही. "

शर्त व अट क्र.९ मध्ये " पुरवठा करणेत आलेल्या मालाचे संपुर्ण बिल मालाची तपासणी करुन, त्याचा दर्जा व परिमाण योग्य असल्याची खात्री झाल्यावरच आदा करणेत येईल. मालाच्या पुरवठ्याबाबत पार्टी नं.२ यांना आगाऊ रक्कम दिली जाणार नाही. पार्टी नं.१ हे आवश्यकतेनुसार मा.अन्न आणि औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य यांचे प्रयोगशाळेत मालाची तपासणी करतील. त्यांचेकडील तपासणी अहवालानुसार पार्टी नं.२ यांना पुर्तता करावी लागेल. ", असे नमुद केलेले आहे.

मे.बाफणा बजार, नाशिक यांचे करारनाम्यातील अटी व शर्ती नुसार त्यांचेकडून वसुल करावयाचे रकमेबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे :-

मे.बाफणा बजार, नाशिक यांची संस्थानकडे जमा असलेल्या रकमेचा तपशिल खालीलप्रमाणे

१. गावरान तुप करिता जमा असलेली सुरक्षा अनामत रक्कम :- रु. ५,२८,१६०/-
(पावती क्र.७५ दि.०३.०७.२०१२ अन्वये जमा)

२. इतर किराणा माला करिता जमा असलेली सुरक्षा अनामत रक्कम :- रु. ७१,८४०/-
(पावती क्र.७५ दि.०३.०७.२०१२ अन्वये जमा)

३. लेखाशाखेकडे प्रलंबित असलेल्या गावरान तुप बिलांची रक्कम :- रु.१८,३८,७८१/-
(बिल क्र.२३/१५.०८.१२ एकुण १००० डबे पैकी ५६४ डबे तुप वापरलेले आहे.)

४. लेखाशाखेकडे प्रलंबित असलेले खाद्यतेलाचे बिलाची रक्कम :- रु.१५,३४,५००/-
(बिल क्र.२४/१८.०८.२०१२)

---------------------

एकुण जमा रक्कम :- रु.३९,७३,२८१/-

(अक्षरी रक्कम रुपये एकोणचाळीस लाख त्र्याहत्तर हजार दोनशे एक्क्याऐंशी मात्र)

(उपरोक्त अ.क्र.३ मधील बिल नं.२३ दि.१५.०८.२०१२ नुसार प्राप्त १००० डब्यांमधील ५६४ डबे गावरान तुप वापरलेले असून शिल्लक ४३१ डबे अधिक बिल नं.२५ मधील ९०० डबे याप्रमाणे एकुण १३३१ डबे अन्न औषध प्रशासन महाराष्ट राज्य, अहमदनगर यांनी सील केलेले आहेत. तसेच बिल नं.२३ दि.१५.०८.१२ मधील ५ लुज डबे मंदिर विभागाकडून भांडार विभागाकडे जमा आहे. असे एकुण १३३६ डब्यांच्या देयकाची रक्कम रु.४३,५५,६९४/- मात्र प्रलंबित आहे.)

मे.बाफणा बजार, नाशिक यांचेकडून वसुल करावयाची रकमेबाबतचा प्रसादालय विभागाने डि.पी.क्र.२७०५/ दि.२९.०८.२०१२ नुसार कळविलेला (अ.क्र.१,२,३) तपशिल खालीलप्रमाणे :-

१. नष्ट करणेचे १३५९७९ नग लाडूची होणरी रक्कम :- रु. ८,१५,८७४/-
वजा अन्न व औषध प्रशासन यांनी तपासणीकामी :- रु. २४०/-:- रु.८,१५,६३४/-
खरेदी केलेले ४० लाडूंची रक्कम.

२. तळलेली ७२२ किलो बुंदी. :- रु. १,२७,०९७/-

३. जळालेले शिल्लक ९६५ किलो तुपाची रक्कम :- रु. २,०९,७४२.५०

४. मे.इंदापूर डेअरी ॲण्ड मिल्क प्रॉडक्टस, गोखळी यांचे ६०० क्विंटल:- रु.१८,९०,०००/-
सोनाई ब्रॅण्डचे तुप खरेदी केल्याने जादा येणाऱ्या फरकाची रक्कम ------------------------

करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार वसुल करावयाची एकुण रक्कम :- रु.३०,४२,४७३.५०

(तसेच अन्न औषध प्रशासन, अहमदनगर यांनी सील केलेले महारतन ब्रॅण्डचे गावरान तुपाचे १३३१डबे तसेच मंदिर विभागाकडील लुज पाच डबे भांडार विभागाकडे जमा आहेत. असे एकुण १३३६ डब्यांच्या बिलांची देय नसलेली रक्कमः- रु.४३,५५,६९४/- (अक्षरी रुपये त्रेचाळीस लाख पंचावन्न हजार सहाशे चौऱ्यान्नव मात्र) सदर माल परत घेऊन जाण्यास तयार असलेबाबत मे.बाफणा बजार, यांनी त्यांचे दि.२७.०८.१२ चे पत्रात नमुद केले आहे.)

मे.बाफणा बजार, नाशिक यांचेकडील भांडार विभागाकडे शिल्लक असलेले महारतन ब्रॅण्डचे १३३१ डबे (१९९.६५ क्विंटल) (बिल नं.२३ मधील ४३१ डबे व बिल नं.२५ मधील ९०० डबे) गावरान तुप अन्न व औषध प्रशासन महाराष्ट्र राज्य,अ.नगर यांचेमार्फत सील करण्यात आलेले आहेत.

मे.बाफणा बजार, नाशिक यांनी दिलेल्या पुरवठा आदेशातील २४३० क्विंटल तुपापैकी वसुल करावयाचे अंदाजे रक्कम रु.३०,४२,४७३.५० मात्रस मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८.१०.२०१२ रोजीचे सभेतील निर्णयानुसार मान्यता मिळालेली आहे. सदर निर्णयाच्या ठरावाची प्रत अद्याप प्राप्त होणे बाकी आहे.

मात्र मे.बाफणा बजार, नाशिक यांचेकडून १२२५ क्विंटल गावरान तुपाचा पुरवठा होणे बाकी होते. मे.इंदापूर डेअरी ॲण्ड मिल्क प्रॉडक्टस, गोखळी यांचेकडून दि.३१.१०.२०१२ अखेर एकुण १३५० क्विंटल गावरान तुप खरेदी करण्यात आलेले आहे.

मे.बाफणा बजार, नाशिक यांचेकडून पुरवठा होणे बाकी असलेल्या १२२५ क्विंटल तुप खरेदीकामी जादा येणारी फरकाची रक्कम प्रति क्विंटल रु.३,१५०/- प्रमाणे त्यांचेकडून वसुल करावी लागेल. पैकी ६०० क्विंटल गावरान तुपाच्या फरकाची रक्कम (रु.१८,९०,०००/-) उपरोक्त वसुलीमध्ये नमुद केलेली आहे, उर्वरीत ६२५ क्विंटल गावरान तुपाची फरकाची रक्कम रु.१९,६८,७५०/- मात्र मे.बाफणा बजार, नाशिक यांचेकडून वसुल करावी लागेल.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८.१०.२०१२ रोजीचे सभेतील निर्णयानुसार रक्कम रु.३०,४२,४७३.५० व उर्वरीत खरेदी केलेल्या ६२५ क्विंटल गावरान तुपाच्या जादा आलेल्या फरकाची रक्कम रु.१९,६८,७५०/- मात्र असे एकुण पुर्णांकित रक्कम रु.५०,११,२२३/- (अक्षरी रुपये पन्नास लाख अकरा हजार दोनशे तेवीस मात्र) मे.बाफणा बजार, नाशिक यांचेकडून वसुल करावी लागेल.

मे.बाफणा बजार, नाशिक यांची सुरक्षा अनामत रक्कम व प्रलंबित ठेवलेले देयके यांची एकुण रक्कम रु.३९,७३,२८१/- मात्र एवढी रक्कम संस्थानकडे जमा आहे, उर्वरीत रक्कम रु.१०,३७,९४३/- (अक्षरी रुपये दहा लाख सदोतीस हजार नऊशे त्रेचाळीस मात्र) सबंधीत पुरवठाधारकाकडून रोख स्वरुपात वसुल करावी लागेल.

तरी मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८.१०.२०१२ रोजीचे सभेतील निर्णयानुसार रक्कम रु.३०,४२,४७३.५० व उर्वरीत खरेदी केलेल्या ६२५ क्विंटल गावरान तुपाच्या जादा आलेल्या फरकाची रक्कम रु.१९,६८,७५०/- मात्र असे एकुण पुर्णांकित रक्कम रु.५०,११,२२३/- (अक्षरी रुपये पन्नास लाख अकरा हजार दोनशे तेवीस मात्र) मे.बाफणा बजार, नाशिक यांचेकडून करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार वसुल करणेस व संस्थानकडे जमा असलेली रक्कम रु.३९,७३,२८१/- रक्कम व उर्वरीत रक्कम रु.१०,३७,९४३/- (अक्षरी रुपये दहा लाख सदोतीस हजार नऊशे त्रेचाळीस मात्र)

मे.बाफणा बजार, नाशिक यांचेकडून पुरवठाधारकाकडून रोख स्वरुपात वसुल करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.१०५४ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**विषय नं.१०३ साईआश्रम १ व २ करिता आवश्यक फर्निचर खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.१०५५ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक-खरेदी विभाग)

---

**विषय नं.१०४ श्री दत्त जयंती- २०१२ या निमित्ताने मंदिर व मंदिर परिसरात फुलांची सजावट करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री. राजेंद्र डंग, दिल्ली यांनी कळविले की, मी श्री.दत्त जयंती-२०१२ या निमित्ताने दिनांक २७/१२/२०१२ रोजी श्री दत्त मंदिर, समाधी मंदिर, व्दारकामाई, चावडी, गुरुस्थान या ठिकाणी फुलांची सजावट देणगी दाखल करुन देण्यास तयार आहे. यासाठी त्यांनी संस्थान कडे परवानगी मागीतलेली आहे. मागील वर्षी दोन वर्षापासून ते श्री दत्त जयंती निमित्त त्यांनी सजावट करतात.

संस्थान मार्फत साजऱ्या करण्यात येणाऱ्या उत्सवासाठी समाधी मंदिर,व्दारकामाई, चावडी, गुरुस्थान या ठिकाणी फुलांची सजावट करण्यात येते सदरची सजावट ही संस्थान खर्चाने किंवा कोणी साईभक्त देणगी म्हणुन सजावट करण्यास तयार असल्यास त्यांना सजावटीची परवानगी देण्यात येते.

श्री रामनवमी उत्सव-१२ साठी श्रीमती लोहिया मॅडम, नागपूर यांना, अक्षय तृतिया निमित्ताने श्री दत्तोबा बांगर,पुणे. यांना, श्री गुरुपौर्णिमा उत्सव -१२ साठी श्री. व्हि.एम. विजय रामा, बंगलोर यांना व श्री अजय रेलन, नाशिक यांना श्री पुण्यतिथी उत्सव- १२ निमित्ताने फुलांची सजावाट करणेस परवानगी देण्यात आलेली आहे.

श्री डंग, दिल्ली यांना श्री दत्त जयंती निमित्त मंदिर व मंदिर परिसरात देणगी दाखल फुल सजावट करणेस परवानगी व त्यांना दर्शनासाठी, भोजनासाठी पास व सजावटीचे सामान ठेवणेसाठी कारागीरांना मोफत हॉल देता येईल.

तरी सदरच्या प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.१०५६ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री. राजेंद्र डंग,दिल्ली यांना श्री दत्त जयंती- २०१२ या निमित्ताने श्री दत्त मंदिर, श्रींचे समाधी मंदिर, व्दारकामाई, चावडी, गुरुस्थान व मंदिर परिसरामध्ये फुलांची सजावट करणेस व त्यांना दर्शनासाठी, भोजनासाठी पास व सजावटीचे सामान ठेवणेसाठी कारागीरांना मोफत हॉल देण्यात यावा असे ठरले.** (कार्यवाही-बगीचा विभाग प्रमुख)

---

**विषय नं.१०५ संस्थानकरिता ई-टेंडर प्रक्रिया mahatenders.gov.in या संकेतस्थळावर सुरु करणेबाबत.**

**निर्णय क्र.१०५७ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-महिती तंत्रज्ञान विभाग प्रमुख)

---

**विषय नं.१०६ Setup Box (डिश) वरील श्रींचे ऑनलाईन दर्शन-तथा-आरती सुविधेबाबत.**

**निर्णय क्र.१०५८ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-महिती तंत्रज्ञान विभाग प्रमुख)

---

**विषय नं.१०७ न्युज एक्सप्रेस, नोएडा या चॅनेलवर श्रींचे ऑनलाईन दर्शन सुविधा सुरु करणेबाबत.**

**निर्णय क्र.१०५९ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-महिती तंत्रज्ञान विभाग प्रमुख)

---

**विषय नं.१०८ श्रींचे दर्शनहॉल क्र.०१ ते ०४ व मंदिर परिसरात महत्वाचे ठिकाणी सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविणेबाबत.**

**निर्णय क्र.१०६० सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-संरक्षण विभाग प्रमुख)

---

**विषय नं.१०९ द्वारावती भक्तनिवासमधील नवीन जनसंपर्क कार्यालयाच्या फर्निचरबाबत.**

**निर्णय क्र.१०६१ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-जनसंपर्क अधिकारी )

---

**विषय नं.११० साईआश्रम- १ व २ च्या एकुण १८ इमारतीचे मागील बाजुस LED (निऑन इफेक्ट) ग्लोसाईन बोर्ड बसविणेबाबत.**

**प्रस्ताव-** साईआश्रम - १ कडील इमारतीमध्ये निवास करणा-या भक्तांना ज्या इमारतीमध्ये खोली मिळालेली आहे त्या इमारतीमध्ये जाणेसाठी मार्गदर्शन व्हावे म्हणुन मार्गदर्शक बोर्ड बसविण्यात आलेले आहेत. सदरचे बसविण्यात आलेले मार्गदर्शक बोर्ड उदा. A,B,C,D,E,F,G,H,I,J,K,L हे भक्तांना समोरुन व्यवस्थित दिसतात परंतु पार्किंगची व्यवस्था ही इमारतीच्या मागे असल्याने, गाडी पार्क केल्यावर, भक्तांना सदरची इमारत कोणत्या विंगची आहे हे समजुन येत नाही. त्यामुळे भक्त गोधंळात पडतात, इमारत कोणत्या विंगची आहे हे दिसावे त्यादृष्टीने १२ इमारतीच्या मागील बाजुसही

A,B,C,D,E,F,G,H,I,J,K,Lव साईआश्रम-२ कडील ६ इमारतीच्या मागील बाजुसही A,B,C,D,E,F हे LED (निऑन इफेक्ट) ग्लोसाईन बोर्ड बसवुन घेणे आवश्यक आहे.

यासाठी मा. व्यवस्थापन समिती सभा दिनांक २५/०८/२०१२ रोजीचे निर्णयानुसार यापुर्वी मे. सोमवंशी एम.जी. राहाता यांचेकडुन साईआश्रम भाग - १ कडील १२ इमारतीचे समोरील बाजुस A,B,C,D,E,F,G,H,I,J,K,Lव साईआश्रम भाग- २ कडील ०६ इमारतीचे समोरील बाजुस A, B, C, D,E,F हे LED (निआॅन इफेक्ट) ग्लोसाईन बोर्ड प्रती नग रु. १३,३००/- या दराने तयार करुन बसविण्यात आलेले आहेत. उपरोक्त निर्देशानुसार व मा. व्यवस्थापन समिती सभा दि. २५/०८/२०१२ रोजीचे निर्णयास अधिन राहुन, १८ इमारतीचे मागील बाजुचे बोर्डही मे. सोमवंशी एम.जी. राहाता यांचेकडुन तयार करुन घेता येतील, एका बोर्डसाठी रु. १३,३००/- प्रमाणे १८ बोर्डसाठी २,४०,०००/- (अक्षरी रुपये- दोन लाख चाळीस हजार मात्र) खर्च येईल.

साईआश्रम भाग १ व २ या प्रकल्पातील इमारती भक्तांचे निवासासाठी उपलब्ध झाल्या नंतर एकुण सुमारे १५,००० भक्तांची निवासव्यवस्था याठिकाणी होणार आहे. बोर्ड तयार करण्यासाठी येणारा खर्च जादा वाटत असला तरी सुध्दा हा खर्च भक्तांकडुन निवासाबदल्यात घेण्यात येणा-या सेवाआकाराचे रक्कमेतुन वसुल होणारा आहे. त्यामुळे या इमारती त्वरीत भक्तांचे निवासासाठी उपलब्ध करुन द्यावयाच्या असल्याने कमीत कमी वेळेत गुणवत्ता ठेऊन काम व्हावे म्हणुन श्री सोमवंशी एम.जी. राहाता यांनी या अगोदर तयार करुन दिलेले बोर्ड पहाता आताही हे काम त्यांचेकडुनच करुन घेणे योग्य होईल.

तरी मे. श्री सोमवंशी एम. जी., राहाता यांचेकडुन बोर्ड तयार करुन घेण्यास व त्यासाठी येणारे रक्कम रु २,४०,०००/- चे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.१०६२ यावर सविस्तर चर्चा होऊन, मे. श्री सोमवंशी एम. जी , राहाता यांचेकडून साईआश्रम- १ व २ च्या एकुण १८ इमारतीचे मागील बाजुस बसविणेसाठी LED (निऑन इफेक्ट) ग्लोसाईन बोर्ड तयार करुन घेण्यास व त्यासाठी येणारे रक्कम रु २,४०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक-साईआश्रम १ व २)

---

**विषय नं.१११ डेडस्टॉक वस्तुंवर संगणक कोड नंबर स्टिकल पेन्टींगचे कामाबाबत.**
**निर्णय क्र.१०६३ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक-साईआश्रम १ व २)

---

**विषय नं.११२ जमा होणाऱ्या सेवाआकार रकमेच्या सुरक्षीततेसाठी दोन लोखंडी तिजोरी खरेदी विभागामार्फत खरेदी करणेबाबत.**
**निर्णय क्र.१०६४ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक-साईआश्रम १ व २)

---

**विषय नं.११३ साईबाबा भक्तनिवासस्थान इमारतीतील सोलर वॉटर हिटींग सिस्टीमव्दारे गरमपाणी वाटप मुदतवाढीबाबत.**
**निर्णय क्र.१०६५ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक-भक्निवासस्थान)

---

**विषय नं.११४ पेस्ट कंट्रोल एम वॉल्श, मुंबई यांचे करारनाम्याबाबत.**
**निर्णय क्र.१०६६ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक-भक्निवासस्थान)

---

**विषय नं.११५ दि.२९.११.२०१२ ते दि.२८.११.२०१३ अखेर द्वारावती इमारतीतील टिव्हींच्या टाटास्काय कनेक्शनची फी भरणेबाबत.**
**निर्णय क्र.१०६७ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक, ध्वनिक्षेपण विभाग)

---

**विषय नं.११६ श्री साईबाबा औ.प्र.संस्थेतील मशिनिष्ट ग्राईंडर या व्यवसायातील लेथ मशिनचा पार्ट नविन बनविणेबाबत.**
**निर्णय क्र.१०६८ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-प्राचार्य-आय.टी.आय.)

---

**विषय नं.११७ श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण केंद्रांचे आठ प्रशिक्षणार्थी ४९ व्या राज्य कौशल्य स्पर्धा परीक्षेसाठी पात्र ठरलेबाबत.**
**निर्णय क्र.१०६९ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-प्राचार्य-आय.टी.आय.)

---

**विषय नं.११८ शैक्षणिक वर्ष २०१३-१४ ज्युनिअर केजी वर्गाचे विद्यार्थी प्रवेश प्रक्रियेबाबत.**
**निर्णय क्र.१०७० सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-प्राचार्या-इं.मि.स्कुल)

---

**विषय नं.११९ वंचीत व दुर्बल घटकांतील बालकांना मोफत प्रवेश देणेबाबत.**
**निर्णय क्र.१०७१ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-प्राचार्या-इं.मि.स्कुल)

---

**विषय नं.१२० श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल शाळा दोन सत्रात भरविणेबाबत.**
**निर्णय क्र.१०७२ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-प्राचार्या-इं.मि.स्कुल)

---

**विषय नं.१२१ शिक्षक व शिक्षकेतर पदे भरणेबाबत.**
**निर्णय क्र.१०७३ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-प्राचार्या-इं.मि.स्कुल)

---

**विषय नं.१२२ संस्कृत विषय शिक्षक भरतीबाबत.**
**निर्णय क्र.१०७४ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.**
(कार्यवाही-प्राचार्या,श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर)

---

**विषय नं.१२३ कन्या विद्या मंदिराकडे प्राथमिक विभागाकरीता खुला प्रवर्ग संवर्गातील रिक्त पद भरणेबाबत.**
**निर्णय क्र.१०७५ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.**
(कार्यवाही-प्राचार्या-श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर)

---

**विषय नं.१२४ कन्या विद्या मंदिराकडील शिक्षणसेवकांच्या मुदतवाढीबाबत व जाहिरात देवून नवीन पदे भरणेबाबत.**
**निर्णय क्र.१०७६ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.**
(कार्यवाही-प्राचार्या-श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर)

---

**विषय नं.१२५ अर्धवेळ सहाय्यक शिक्षक व ग्रंथपाल सहाय्यक सानुग्रह अनुदान आदा करणेबाबत.**
**निर्णय क्र.१०७७ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-प्राचार्य-कनिष्ठ महाविद्यालय)

---

**विषय नं.१२६ कनिष्ठ महाविद्यालयात रिक्त असलेल्या अर्धवेळ शिक्षणसेवक व प्रयोगशाळा सहाय्यक यांच्या सन २०१२-१३ मधील नेमणुकाबाबत.**
**निर्णय क्र.१०७८ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-प्राचार्य-कनिष्ठ महाविद्यालय)

---

**विषय नं.१२७ श्री.रमेश रतन सोनवणे, सफाई कामगार, आरोग्य विभाग यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत.**
**निर्णय क्र.१०७९ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-कामगार अधिकारी)

---

**विषय नं.१२८ श्री.रविंद्र शिवाजी डोखे, मदतनीस, साई प्रसादालय विभाग यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत.**
**निर्णय क्र.१०८० सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-कामगार अधिकारी)

---

**विषय नं.१२९ श्री.भारत सिताराम कापसे, सफाई कामगार, आरोग्य विभाग यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत.**
**निर्णय क्र. १०८१ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-कामगार अधिकारी)

---

**विषय नं.१३० नविन भक्तनिवासस्थान येथील लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर दिलेल्या गाळयांबाबत.**
**निर्णय क्र.१०८२ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-विधी अधिकारी)

---

**विषय नं.१३१ साईप्रसाद परिसरातील गाळे / स्टॉल्स संस्थान वापरांत घेणेबाबत.**
**निर्णय क्र.१०८३ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-विधी अधिकारी)

---

**विषय नं.१३२ स्टेट बँक ऑफ इंडिया यांना संस्थानचे साईनाथ छाया इमारतीतील जागेबाबत.**
**निर्णय क्र.१०८४ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-विधी अधिकारी)

---

**विषय नं.१३३ स्टेट बँक ऑफ इंडिया यांना संस्थानचे साईनाथ छाया इमारतीतील ए.टी.एम. चे जागेस मुदतवाढीबाबत.**
**निर्णय क्र.१०८५ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-विधी अधिकारी)

---

**विषय नं.१३४ प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडिया, मुंबई यांना भाडे पट्टयाने देण्यात आलेल्या सर्व्हे नं.१४८ मधील ११४.३२ चौ.मी. बांधीव व २६६.२८ चौ.मी. मोकळया जागेस मुदतवाढ मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.१०८६ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-विधी अधिकारी)

---

**विषय नं.१३५ संस्थान परिसरात चालवित असलेल्या स्नानगृह मुदतवाढीबाबत.**

**निर्णय क्र.१०८७ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-विधी अधिकारी)

---

**विषय नं.१३६ मौजे निमगाव को-हाळे ग्रामपंचायतीची इमारत कराची चालू बाकी भरणेबाबत.**

**निर्णय क्र.१०८८ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-विधी अधिकारी)

---

**विषय नं.१३७ श्री.नारायण रावसाहेब पाडेकर, वर्ग-०४ कर्मचारी, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, शिर्डी यांची हंगेरी या देशात बॉडी बिल्डींग चॅम्पीयनशिप स्पर्धेसाठी निवड झालेली असल्याने प्रवास खर्चासाठी आर्थिक मदत मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.१०८९ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-प्रशासन शाखा-वशी-३)

---

**विषय नं.१३८ शिर्डी महोत्सव- २०१२ चे अंदाजपत्रक मान्यता व कलाकार निश्चितीबाबत.**

**प्रस्ताव-** चालू वर्षाचा शेवट व नविन वर्षाची सुरुवात चांगल्यारितीने व्हावी सदरचा दिवस श्रींच्या सान्निध्यात जावा या उद्देशाने दरवर्षी ३१ डिसेंबरला भारतातून तसेच परदेशातून प्रचंड संख्येने साईभक्त शिर्डीत साईबाबांच्या दर्शनासाठी येत असतात. श्रींच्या दर्शनापासून कोणीही वंचीत राहू नये म्हणून मा.व्यवस्थापन समितीच्या निर्णयानुसार समाधी मंदीर भक्तांना साईबाबांचे दर्शनासाठी रात्रभर उघडे ठेवण्यात येत असते. ३१ डिसेंबरच्या रात्री भजन, नृत्य,गायन वगैरे कार्यक्रम आयोजीत केले जातात. शिर्डी महोत्सव हा सन २००४ पासून सुरु झालेला आहे.

**अ) अंदाजपत्रक:** सन २०११ चे शिरडी महोत्सवा करीता झालेल्या व सन २०१२ चे शिर्डी महोत्सवासाठी अपेक्षीत खर्चाची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ. नं | तपशील | श्री शिर्डी महोत्सव २०११ | | श्री शिर्डी महोत्सव अंदाजे खर्च २०१२ |
|---|---|---|---|---|
| | | अंदाजे खर्च | प्रत्यक्ष खर्च | |
| १ | स्टेज,ड्रेसींग रुम व १००० खुर्च्यासह बैठक व्यवस्था | ५०,०००.०० | ५३,०००.०० | ६०,०००.०० |
| २ | जाहिरात, कापडी बॅनर्स व बोर्ड इत्यादी | १५,०००.०० | ११,८९५.०० | २०,०००.०० |
| ३ | कलाकार मानधन व प्रवास खर्च | १,४५,०००.०० | ५७,०५६.०० | ९०,०००.०० |
| ४ | इतर किरकोळ खर्च (मंदर सजावट, जादा कर्मचारी व इतर खर्च ) | ९०,०००.०० | ०० | ९०,०००.०० |
| | एकुण खर्च | ३,००,०००.०० | १,२१,९५१.०० | २,६०,०००.०० |

**ब) कलाकार निश्चीती :-** याहीवर्षी मागील वर्षाप्रमाणे शिर्डी महोत्सवासाठी मान्यवर गायकांचे व कलाकारांचे दि.३१/१२/२०१२ रोजी गायन व नृत्य कार्यक्रम व मानधन निश्चीत करावे लागणार आहेत. याबाबत आलेल्या अर्जांचा तपशिलवार तक्ता अलाहिदा सादर करण्यात येईल.

**क) कार्यक्रमाचे स्थळ :-** मागीलवर्षी साईनगर मैदानावर कलाकार कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते, यावर्षी देखील साईनगर परिसरात आयोजित करता येईल.

तरी उपरोक्त शिर्डी महोत्सवाकरीता **अ)** रुपये २,६०,०००/- अंदाजपत्रकास **ब)** कलाकार कार्यक्रम मानधन निश्चिती **क)** कार्यक्रमाचे स्थळ निश्चितीचे विचारार्थ व निर्णयार्थ सदरचा विषय मा.त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.१०९० यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावातील अ, ब व क प्रमाणे मान्यता देण्यात आली.**
(कार्यवाही-प्रशासन शाखा-वशी-५)

---

**विषय नं.१३९ श्री साई सतच्चरित पारायण- २०१२ खर्चाबाबत.**

**निर्णय क्र.१०९१ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-प्रशासन शाखा-वशी-५)

---

**विषय नं.१४० विविध पदावर पदस्थापना देणेकामी दि.२६.०२.२०१२ रोजी घेतलेल्या विभागीय लेखी व प्रात्यक्षिक परिक्षेत उत्तीर्ण झालेले परंतू शासन निर्णयानुसार लगतच्या पाच वर्षांचे गोपनीय अभिलेख्यांची प्रतवारी ब+ येत नसलेल्या कर्मचाऱ्यांचेबाबत.**

**निर्णय क्र.१०९२ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक-आस्थापना)

---

**विषय नं.१४१ श्री साईबाबा संस्थानमध्ये तारतंत्री (वायरमन) पदाचे काम करीत असलेल्या पी.डब्ल्यू. डी. परवानाधारक वर्ग-०४ कर्मचाऱ्यांना तारतंत्री (वायरमन) पदावर पदस्थापना देणेबाबत.**

**निर्णय क्र.१०९३ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक-आस्थापना)

---

**विषय नं.१४२ साईलिला मासिकाचे कामकाजबाबत.**

**निर्णय क्र.१०९४ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक-आस्थापना)

---

**विषय नं.१४३ महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व ग्रामिण विभाग संगमनेर, उपविभाग संगमनेर यांचेकडून संस्थानचे पाणीपुरवठा प्रतिनियुक्तीने इंजिनियर घेणेबाबत.**

**निर्णय क्र.१०९५ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक-आस्थापना)

---

**विषय नं.१४४ संस्थान कर्मचाऱ्यांना "सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना" लागू करणेबाबत.**

**निर्णय क्र.१०९६ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक-आस्थापना)

---

**विषय नं.१४५ कंत्राटी पध्दतीने सेवेची मुदतवाढ मिळणेबाबत श्री.रमेश शांताराम साबळे, विशेष कार्य अधिकारी यांचा दि.१४.११.२०१२ चा अर्ज.**

**निर्णय क्र.१०९७ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक-आस्थापना)

---

**विषय नं.१४६ फायर अॅण्ड सेफ्टी अधिकारी (कंत्राटी) पद जाहीरातीद्वारे भरणेबाबत.**

**निर्णय क्र.१०९८ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक-आस्थापना)

---

**विषय नं.१४७ कंत्राटी पध्दतीने मुदतवाढ मिळणेबाबत श्री.नारायण केशवराव कुलकर्णी, अधिक्षक, सामान्य प्रशासन विभाग यांचा दि.२९.११.२०१२ रोजीचा अर्ज.**

**निर्णय क्र.१०९९ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक-आस्थापना)

---

**विषय नं.१४८ श्री.गिरीष एकनाथ चोळके, मुकादम, बांधकाम विभाग यांना संस्थान सेवेत कायम करणेबाबत.**

**निर्णय क्र.११०० सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक-आस्थापना)

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांच्या परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा करणेत आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०१ लेखाशाखेत प्राप्त देयकांच्या पुन:मंजुरीबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानमध्ये कार्यरत असलेल्या विविध विभागातुन देयेक आदा करण्यासाठी लेखाशाखेत प्रस्तावित करण्यात येतात. यापैकी दिनांक ०३ डिसेंबर २०१२ अखेर प्रलंबित असलेल्या देयकांचा तपशील खालीलप्रमाणे-

| अ.नं | विभाग | पुरवठादाराचे नाव | तपशिल | देय रक्कम | मा.व्यवस्थापन समिती निर्णय क्रमांक व दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | विदयुत विभाग | मे.साई इंजिनिअर्स, अंबड, नाशिक. | गेट नं.३ जवळ (मारुती मंदिराजवळ), कॅश कॉउंटींग मेन गेट ते सिक्युरिटी ऑफीस, उदी काउंटर, शनिगेट (व्ही.आय.पी. दर्शन लाईन) याठिकाणी स्टील रेलींग बसविणेकामी. (मंजुर रक्कम रु १८,६२,०००=००) | १८,६२,०००=०० | ४६१<br>१४/०७/२०१२ |
| २ | विदयुत विभाग | मे.साई इंजिनिअर्स, अंबड, नाशिक. | पिपळवाडी रोड फुटपाथवर मुव्हेबल स्टील रेलींग पुरविणेकामी.. (मंजुर रक्कम रु २५,२२,०००=००) | ५,३९,७५७=०० | २८१<br>०६/०४/२०१२ |
| ३ | विदयुत विभाग | मे.साई इंजिनिअर्स, अंबड, नाशिक. | साई कॉम्प्लेक्स समोर रोडवरील मोकळया जागेत मुव्हेबल स्टेनलेस स्टील वॉकर पुरविणेकामी.. (मंजुर रक्कम रु १६,४९,०००=००) | ५,५१,१०६=०० | २८०<br>०६-०४-२०१२ |

तरी उपरोक्त देयकांची रक्कम पुरवठादारांना आदा होणेकामी निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.११०१ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- मुख्य लेखाधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०२. शिर्डी महोत्सव- २०१२ कलाकार कार्यक्रम.**

**प्रस्ताव-** चालू वर्षाचा शेवट व नवीन वर्षाची सुरुवात साईभजनाने व्हावी व सदरचा दिवस श्रींच्या सान्निध्यात जावा या उददेशाने दरवषी प्रमाणे या वर्षी ही दि.३१/१२/२०१२ रोजी समाधी मंदिर रात्रभर दर्शनासाठी खुले रहाणार आहे. तसेच सोमवार दिनांक ३१/१२/२०१२ चे रात्रौ शिर्डी महोत्सव- २०१२ मध्ये गायन व नृत्य कार्यक्रमास परवानगी मिळावी म्हणून खालील प्रमाणे विनंती अर्ज आलेले आहेत.

| अ.नं. | दाखल तारीख | कलाकारांचे नाव व पत्ता | कार्यक्रम | कलाकार संख्या | मानधन अपेक्षा |
|---|---|---|---|---|---|
| १ | १०/१०/२०१२ | श्री. पारस जैन, प्रविण महामुनी व्दारकामाई समोर, जैन अॅन्ड कंपनी, शिर्डी, ता.राहाता, जि.अहमदनगर मो.९८२२५४६८१७ शिर्डी महोत्सव २०११ मध्ये कार्यक्रम झालेला आहे. | एक शाम साई के नाम साई भजन संध्या | | विनामुल्य |
| २ | १०/१०/२०१२ | जिम्मी शर्मा, दिल्ली ३४८१/ए, राजपार्क, रानीबाग, हनुमान मंदिर के पास, दिल्ली मो.०९८९१०१९६७९,०९९१०२०७६६४ | साई स्वरांजलि ग्रुप साई भजन संध्या | ०८ | विनामुल्य |
| ३ | १३/१०/२०१२ | श्री.निशिकात सुधाकरराव ठाकरे (संगीत शिक्षक) गांधी नगर, गायत्री मंदिर समोर, आर्णी ता.आर्णी ,जि.यवतमाळ. मो.९८८१५८०९८२, ९४२१८४५५१७ | साईबाबांची भजने | | विनामुल्य |
| ४ | १५/१०/२०१२ | श्री.विजय ढोले, चंदन परांजपे रा.श्रीरामपूर मो.७५८८५४१७४३ मो.९८६०९६८००५ | भक्तीगीत कार्यक्रम | | विनामुल्य |
| ५ | २०/११/२०१२ | श्री.किरण कन्हैयालाल परिख कृष्णकुंज, राममंदिर रोड, अजमेरे हॉस्पिटल, कोपरगांव. मो.९४२०६२५५७७ श्री रामनवमी उत्सव २०१२ कार्यक्रम झाला आहे. | स्वरसाधना साईभजन संध्या व माऊथ ऑरगन | | विनामुल्य |
| ६ | २९/११/२०१२ | वनिता बजाज मो.९२१०४०४४९०, ९२८९२७६९०० | भजनसंध्या कार्यक्रम | | विनामुल्य |
| ७ | ४/१२/२०१२ | मनोहर अजमेरी ( कव्वाल ) जयजवान नगर.स.नं.१४, शिवशक्ती तरुण मंडळाजवळ, चांदणी चौक, येरवडा, पुणे.०६ श्री पुण्यतिथी उत्सव,२०१२ मध्ये कार्यक्रम झालेला आहे. | कव्वालीचा कार्यक्रम | | श्री.अजमेरी यांनी संस्थानचे इच्छेप्रमाणे बिदागी द्यावी अशी विनंती केली आहे. |

अ.नं. १ ते ६ यांनी विनामुल्य कार्यक्रम मिळावा म्हणून विनंती अर्ज केलेले आहेत. तसेच अ.नं.७ नंबरने मानधनाची मागणी केलेली आहे. अ.नं. १, ३, ७ यांचे कार्यक्रम झालेले आहेत.

शिर्डी महोत्सवाच्या निमित्ताने ३१ डिसेंबरच्या रात्री भजन संध्या आयोजित केली जाते. मागील वर्षी खालीलप्रमाणे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

| अ.नं. | दिनांक व वेळ | कलाकाराचे नांव व पत्ता | कार्यक्रमाचे स्वरुप | कलाकार संख्या | मानधन |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | दि.३१/१२/२०११ रात्रौ ७.०० ते ०९.०० | श्री हरीष ग्वाला, स्वप्न किरण अपार्टमेंट, ३०१/ए विंग, गोकुलधाम मार्केट जवळ, पिंपरी पाडा, मालाड (ई) मुंबई ४०० ०९७ मो.नं. ९८६७४९१४९९ | साई भजन संध्या | ०८ | ११,०००/- |
| ०२. | दि.३१/१२/२०११ रात्रौ ९-०० ते १०.३० | श्री पारस जैन व प्रविण महामुनी , शिरडी- ९८२२५४६८१७. | साई भजन संध्या | १० | रु.५,०००/- |
| ०३. | दि.३१/१२/२०११ रात्रौ १०.३० ते १२.०० | श्री सच्चीदानंद आप्पा, वेस्टर्न रेल्वे कॅालनी, ७७/४, माटूंगा रोड, मुंबई, ९८२०१४८६७८ | साई भजन संध्या | २० | २१,०००/- |
| ०४. | दि.३१/१२/२०११ रात्रौ १२.०० ते १.३० | शारदा संगीत विद्यालय कोपरगांव, (दिपाली केतन कुलकर्णी ) कोपरगांव ९४२२२२६८५० | साई भजन संध्या | ०८ | २०,०००/- |

यावर्षी ३१ डिसेंबर रोजी रात्री ७ ते १२ वाजेपर्यत कोणत्या कलाकारांचे कार्यक्रम आयोजित करावेत. याबाबतचा निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र. ११०२ यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी महोत्सव- २०१२ या निमित्ताने विनामुल्य सेवा करणाऱ्या कलाकारांचे कार्यक्रम ठेवणेस, मान्यता देण्यात आली.**

**तसेच, याकामी कलाकार निश्चित करण्याचे अधिकार, श्री.बी.डी.साबळे- प्रशासकीय अधिकारी व श्री.पी.बी. बोरावके- विशेष कार्य अधिकारी यांना प्रदान करणेत आले.**

(कार्यवाही- प्रशासन शाखा, वशी-०५)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०३. विश्वस्तांच्या सुचनांबाबत.**

**निर्णय क्र.११०३** मा.विश्वस्तांनी सभेत खालीलप्रमाणे सुचना मांडल्या त्या मान्य करण्यात आल्या-

**(१)** मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाने सिव्हील ॲप्लीकेशन १२६९४/ २०१२ व १२६९५/ २०१२ पी.आय.एल नं.१८/ २०११ मध्ये दि.२१.११.२०१२ रोजी साईआश्रम भाग- १ व २ कडील सर्व कामे टेक्नीकल एक्सपर्ट व फायनान्शील एक्सपर्ट यांचेकडून पडताळणी करुन घ्यावे, असा हुकुम केलेला असून त्यानुसार सदर एक्सपर्टची नेमणूक श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेचे मा.अध्यक्ष यांनी करावी, असे सदरचे केसमध्ये संस्थानचे वतीने मा.खंडपीठात काम पहाणारे ॲड. चौकीदार यांनी सांगितले आहे.

दिवसेंदिवस श्रींचे दर्शनासाठी होणाऱ्या वाढत्या गर्दीचा विचार करता, साईभक्तांच्या निवासव्यवस्थेसाठी साईआश्रम १ व २ इमारती लवकरात लवकर चालु करणेचे दृष्टीने, वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करुन उपरोक्तप्रमाणे एक्सपर्टची नेमणूक करणेसाठी जास्त कालावधी लागेल, त्यामुळे तातडीची गरज म्हणून टेक्नीकल एक्सपर्ट- श्री.अविनाश कुलकर्णी, अहमदनगर व फायनान्शीयल एक्सपर्ट- श्री.हेमंत काळे, चार्टर्ड अकाऊटंट, अहमदनगर, श्री.सुरेश डोले, चार्टर्ड अकाऊटंट, राहुरी, श्री.विशाल कोठारी, चार्टर्ड अकाऊटंट, श्रीरामपुर, श्री.अमोल दातार चार्टर्ड अकाऊटंट, पुणे यांना योग्य ती फी देऊन त्यांचेकडून साईआश्रम प्रकल्प व आवश्यकतेनुसार इतर विभागांची यासंबंधातील कामे करुन घ्यावीत.

तसेच, यापुढे मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठापुढे मान्यतेकरिता विषय सादर करताना संस्थान नियुक्त टेक्नीकल एक्सपर्ट व फायनान्सीयल एक्सपर्ट यांचे प्रमाणपत्रासह सादर करणेत यावेत.

(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी/ विधी अधिकारी/ बांधकाम विभागप्रमुख/ विद्युत विभागप्रमुख)

---

वरील निर्णय क्र. ९५३ ते ११०३ सर्वानुमते घेण्यात आले.

यानंतर सायंकाळी ०७.०० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | |
|---|---|
| (स्वाक्षरीत) | (स्वाक्षरीत) |
| (डॉ.संजीवकुमार) | (जयंत कुलकर्णी) |
| जिल्हाधिकारी, अहमदनगर | मुख्य जिल्हा न्यायाधीश |
| सदस्य | अध्यक्ष |

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी